सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४५ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## झारखंड : हेमंत सोरेन यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ



रांची, २८ नोव्हेंबर : झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन आज,गुरूवारी मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. राज्यपाल संतोष कुमार गंगवार यांनी झारखंडचे चौदावे मुख्यमंत्री म्हणून सोरेन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. झारखंडच्या इतिहासात चौथ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे ते पहिले राजकीय नेते ठरले आहेत.

रांची शहरातील मारोबाडी मैदानावर आयोजित या शपथविधी सोहळ्याला झारखंड मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिबू सोरेन, त्यांची पत्नी रुपी सोरेन, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार, शरद पवार, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, आरजेडीचे तेजस्वी यादव, काँग्रेस नेते तारिक अन्वर, समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव, तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन, अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान प्रामुख्याने उपस्थित होते. शपथविधी सोहळ्यासाठी रांची शहरात विशेष सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थाही बदल करण्यात आला होता. नुकत्याच झालेल्या झारखंड विधानसभा निवडणुकीत सोरेन यांच्या नेतृत्त्वाखालील झारखंड मुक्ती मोर्चाखालील आघाडीला ८१ पैकी ५६ जागा मिळाल्या. तर 'एनडीए' आघाडीला फक्त २४ जागांवर समाधान मानावे लागले.झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन चौथ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री होणार आहेत. राज्याचे तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेले शिबू सोरेन यांचे ते पुत्र आहेत.

# माऊलींचा समाधी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने पडला पार; हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी



पुणे, २८ नोव्हेंबर : संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावात पार पडला. तीन दिवसांपासून अलंकापुरी आळंदीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले आहेत. ग्यानबा तुकाराम, ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम या जयघोषाने आणि टाळ मृदंगाच्या गजरात अवघी आळंदी दुमदुमून गेली. मुख्य मंदिरावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली.

सकाळी माऊलींच्या समाधीवर दुग्धआरती व अभिषेक करण्यात आला. संत नामदेव महाराजांच्या हस्ते किर्तन सेवा देण्यात आली. यावेळी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर फुलांची सजावट करण्यात आली होती. योगी, तपस्वी, समाधिस्त माऊली या ओळी नुसार माऊलींचा ७२८ वा संजीवन समाधी सोहळा लाखो वारकऱ्यांच्या साक्षीने संपन्न झाला.

अलंकापुरी आळंदीत उपस्थित वारकरी हळवे झाल्याचे पाहायला मिळाले. फुलांची उधळण करत माऊलींना निरोप देण्यात आला. सकाळी नऊ ते बाराच्या दरम्यान ह.भ.प नामदेव महाराजांचे संजीवन समाधी सोहळ्याचे कीर्तन झाले. मग, घंटानाद, पुष्पवृष्टी आणि आरती करण्यात आली.

या सोहळ्यासाठी आलेल्या शेतकरी वारकऱ्यांनी महायुतीकडून अनेक अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतमालाला योग्य भाव मिळावा अशी मागणी वारकऱ्यांनी सरकारकडे केली आहे.

## पंतप्रधानांना पुन्हा जीवे मारण्याची धमकी, मुंबई पोलिसांना आला फोन!



मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला हा धमकीचा फोन आला. दरम्यान तपासाअंतर्गत अंबोली पोलिसांनी एका महिलेला आरोपाखाली ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला बुधवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास धमकीचा फोन आला. 'पंतप्रधान नरेंद्र मोदींना मारण्याचा कट सुरू असून हत्याराची तयारी झाल्याची' माहिति फोन करणाऱ्या व्यक्तीने पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने या घटनेची गंभीर दखल घेत अंबोली पोलिसांनी शितल चव्हाण (३४) नावाच्या महिलेला ताब्यात घेतले आहे. या महिलेला विचारपूस दरम्यान कोणतीही संशयित माहिती समोर आली नाही. कौटुंबिक वादातून मानसिक तणावात असलेल्या महिलेने हा फोन केल्याचे प्राथमिक पोलीस तपासात समोर आले आहे. पोलीस पुढील तपास करत आहे.

याआधीही दिली होती जीवे मारण्याची धमकी

पंतप्रधानांना याआधीही कर्नाटकमधील मोहम्मद रसूल कद्दारे नावाच्या एका व्यक्तीने मोदी यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. समाज माध्यमावर हातात तलवार घेऊन त्याने एक व्हिडीओ शेअर केला होता. केंद्रात काँग्रेसची सत्ता आल्यास मी मोदींना जीवे मारणार, अशी धमकी समाज माध्यमावर देण्यात आली होती.

हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर कर्नाटकमधील सूरपूर पोलीस ठाण्यात या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# राज्यात दुचाकीस्वारांसह सहप्रवाशांना हेल्मेट बंधनकारक!

## राज्याचे अपर पोलीस महासंचालक अरविंद साळवे यांचे आदेश

पुणे : वाढत्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर दुचाकीस्वारांचा होणारा मृत्यू आणि गंभीर दुखापत याला आळा घालण्यासाठी वाहतूक विभाग अॅक्शन मोडवर आला आहे. पुण्यासह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये आता दुचाकीस्वारांसह सहप्रवाशांनाही हेल्मेट बंधनकारक करण्याचा निर्णय राज्याच्या वाहतूक विभागाने घेतला आहे.

शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर दुचाकीस्वार विना हेल्मेट प्रवास करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यासोबतच अपघातांमध्ये अनेकांना गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांना जीव गमवावा लागला होता. त्यामुळे विना हेल्मेट दुचाकीस्वार व पाठीमागे बसलेल्या सहप्रवाशांवर कारवाईचे आदेश अपर पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

अद्यापही या आदेशाची निश्चित तारीख जाहीर केलेली नाही. मात्र नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्याविरूद्ध ई-चलान मशीनमध्ये स्वतंत्र हेड खाली कारवाई केली जाणार आहे. परंतु, या आदेशाची निश्चित तारीख जाहीर केलेली नाही.


हेल्मेटसक्तीवर पुणेकरांचा विरोध

राज्यासह अनेक महत्वाच्या शहरात हेल्मेटसक्तीला वारंवार विरोध केल्याचे दिसून आले आहे. मात्र, आता दुचाकीस्वारांचे वाढते अपघात लक्षात घेऊन संबंधितांनी हेल्मेट परिधान करण्यासाठी प्राधान्य द्यावे, यासाठी पोलीस प्रशासनाने मोहिम हाती घेतली आहे. त्यानुसार आदेशाची अमलबजावणी पुण्यातही केली जाण्याची शक्यता आहे. सध्या वाहतूक पोलीस सीसीटीव्हीच्या माध्यमातून विनाहेल्मेट दुचाकीस्वारावर कारवाई करत आहेत. दरम्यान, अपर पोलीस महासंचालकांच्या आदेशानुसार विनाहेल्मेट दुचाकीस्वार, सहप्रवाशी कारवाईच्या जाळ्यात अडकले जाणार आहे. त्यामुळे याला पुणेकरांचा विरोधही होऊ शकतो, अशी शक्यता आहे.

## प्रियंका वाड्रांनी घेतली खासदारकीची शपथ

नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर : काँग्रेस नेत्या प्रियांका वाड्रा यांनी आज, गुरुवारी खासदारकीची शपथ घेतली. केरळच्या वायनाड या मुस्लिम बहुल मतदारसंघातून त्या विजयी झाल्या आहेत. त्यांचे मोठे भाऊ राहुल गांधी यांनी वायनाडच्या खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत ६.२२ लाखांहून अधिक मते मिळवत वाड्रा विजयी झाल्या आहेत.

महाराष्ट्राच्या नांदेड येथील पोटनिवडणुकीत विजयी झालेले रविंद्र चव्हाण आणि प्रियंका वाड्रा यांचा शपथविधी एकाचवेळी झाला. यावेळी संविधानाची प्रत हातात घेऊन वाड्रा यांनी शपथ घेतली. प्रियांका वाड्रा वायनाडमधून मोठ्या मताधिक्क्याने विजयी झाल्या आहेत. त्यांना ६.२२ लाखांहून अधिक मते मिळाली आहेत. तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या सत्यन मोकेरी यांच्यापेक्षा त्यांना ४ लाखांहून अधिक आणि भाजपच्या नव्या हरिदास यांच्यापेक्षा ५.१२ लाखांपेक्षा जास्त मते मिळाली आहेत. संसदेतील गांधी घराण्यातील त्या तिसऱ्या सदस्या ठरल्या आहेत. त्यांची आई सोनिया गांधी या राजस्थानमधून पक्षाच्या राज्यसभा खासदार आहेत. तर भाऊ राहुल गांधी रायबरेलीमधून खासदार म्हणून निवडून आले आहेत.



## 'आयएनएस अरिघात'वरून क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर : भारतीय नौदलाने आण्विक पाणबुडी 'आयएनएस अरिघात'वरून के-४ बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. या क्षेपणास्त्राची मारक क्षमता ३५०० किलोमीटर असून विशाखापट्टणमच्या किनाऱ्याजवळ बुधवारी सकाळी ही चाचणी घेण्यात आल्याची माहिती पुढे आलीय.

'आयएनएस अरिघात' ही देशाची दुसरी अणुशक्तीवर चालणारी बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी आहे. ऑगस्टमध्ये भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झालेल्या आयएनएस-अरिघातवरून घेण्यात आलेली के-४ क्षेपणास्त्राची ही पहिली चाचणी आहे. आतापर्यंत केवळ सबमर्सिबल पोंटून्समधून के-४ क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली होती. विशाखापट्टणमच्या किनाऱ्याजवळ बंगालच्या उपसागरात बुधवारी ही चाचणी घेण्यात आली. के-४ क्षेपणास्त्र हे घन-इंधन आहे. या क्षेपणास्त्रांची मारक क्षमता ३५०० किमीपर्यंत आहे. त्याला ६ हजार टन वजनाच्या 'आयएनएस अरिघात' पाणबुडीतून प्रक्षेपित करण्यात आले. के-४ क्षेपणास्त्र सरावाचा एक भाग म्हणून प्रक्षेपित केले गेले. 'आयएनएस अरिघात'वरून या क्षेपणास्त्राची पहिल्यांदाच चाचणी घेण्यात आली. यापूर्वी के-४ क्षेपणास्त्राची चाचणी केवळ सबमर्सिबल पोंटून्सवरूनच घेण्यात आली होती. आता संपूर्णपणे कार्यरत पाणबुडीतून या क्षेपणास्त्राची चाचणी घेणे हे भारतीय नौदल क्षमतेसाठी मैलाचा दगड ठरला आहे.

या क्षेपणास्त्राने त्याचे इच्छित लक्ष्य भेदले आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी चाचणी परिणामांचे काळजीपूर्वक विश्लेषण केले जात आहे. बंगालच्या उपसागरात मध्यवर्ती पल्ल्याच्या क्षेपणास्त्र चाचणीसाठी सार्वजनिक इशारा जारी केल्यानंतर ही क्षेपणास्त्र चाचणी घेण्यात आली. ही क्षेपणास्त्र चाचणी भारताच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग होती. यामुळे नौदलाची ताकद वाढली आहे. देशाची दुसरी अणुशक्तीवर चालणारी बॅलेस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी 'आयएनएस अरिघात' नौदलाच्या ताफ्यात सामील झाल्याने भारताचे नौदल सामर्थ्य वाढले आहे. आयएनएस अरिघात पाणबुडीचे वजन ६ हजार टन असून, तिची लांबी ११२ मीटर आहे. 'आयएनएस'च्या आतमध्ये अणुभट्टी असून, त्यामुळे पाणबुडीला वेग मिळतो. ही पाणबुडी सागरी पृष्ठभागावर कमाल १२-१५ नॉटस् (२२ ते २८ किलोमीटर प्रतितास) आणि पाण्याखाली २४ नॉटस् (४४ किलोमीटर प्रतितास) वेग देऊ शकते. 'अरिघात'मध्ये दुहेरी हुल, बॅलास्ट टँक, दोन सहायक इंजिन आणि आपत्कालीन स्थितीत शक्ती आणि गतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी थ्रस्टर बसविले आहेत. सागरी किनार्यावर अतिशय शांतपणे गस्त घालणार्या आण्विक पाणबुडीमुळे भारताची सुरक्षा भक्कम झाली आहे.

## महाराष्ट्राचे ३ प्रमुख नेते तातडीने दिल्लीकडे रवाना

नवी दिल्ली : विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राचं सरकार कोणाच्या हाती येणार याकडे सर्वांचंच लक्ष लागून आहे. विधानसभा निवडणुकीनंतर राज्याचे राजकारण आता चांगलंच रंगले आहे. एकतर्फी निकाल महायुतीच्या बाजूने लागल्यानंतरसुद्धा लवकर सत्तास्थापनेबाबत दावा केला नाही. भाजपने १३४ जागांवर विजय मिळवून सर्वांत मोठा पक्ष असल्याचं सिद्ध केले. त्यामुळे आता मुख्यमंत्री हा भाजपचाच असावा असा दावा सर्व भाजप नेत्यांकडून केला जात आहे. मात्र आता घडामोडींना वेग आला असून राज्यातील महायुतीचे तिन्ही प्रमुख नेते तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा २३ नोव्हेंबर रोजी निकाल हाती आला. यामध्ये महायुतीचा भरघोस विजय पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. तर विरोधी पक्ष नेतापदावर दावा करण्याएवढे देखील संख्याबळ विरोधकांना मिळवता आलेला नाही. यामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला. मात्र महायुतीने संपूर्ण बहुमत हाती मिळवून देखील लवकर सत्तास्थापनेचा दावा न केल्यामुळे विरोधकांनी टीकेची झोठ उठवली होती. आता मात्र लवकरच राज्यामध्ये सरकार स्थापन होणार असून यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे व अजित पवार हे दिल्लीकडे रवाना झाले आहेत.

दिल्लीमध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतला जाणार आहे. यापूर्वी निवडणुकीच्या जागावाटप व फॉर्मुला ठरवण्यावेळी नेत्यांनी दिल्लीवारी केली आहे. भाजपचे पक्षश्रेष्ठी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी नेते भेट घेणार आहेत. त्यामुळे आता अमित शाह यांच्याशी चर्चा करुन महाराष्ट्राच्या सरकारस्थापन आणि मंत्रीपदाचे वाटप याची चर्चा होणार आहे.

यावेळी देखील महायुतीच्या पूर्वीच्या सरकारप्रमाणे एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री असणार आहेत. अजित पवार यांनी यापूर्वीच मुख्यमंत्रिपदावरील दावा सोडला होता. तर एकनाथ शिंदे यांनी देखील पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्रिपदाचा दावा सोडला आहे. यामुळे आता मुख्यमंत्री हा भाजपचाच असेल हे स्पष्ट झाले आहे. देवेंद्र फडणवीस यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी आग्रही आहे. यासाठी भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा देखील पाठिंबा आहे.

मात्र आता दिल्लीतील बैठकीमध्ये भाजप पक्षश्रेष्ठी नक्की काय निर्णय घेतात याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

### दिल्लीतील प्रशांत विहार परिसरात स्फोट

नवी दिल्ली, २८ नोव्हेंबर : नवी दिल्लीच्या प्रशांत विहार परिसरात आज, गुरुवारी दुपारी १२ वाजेच्या सुमाराला स्फोट झाला. बन्सी स्वीट्सजवळ झालेला हा स्फोट नेमका कशाचा होता, याची माहिती समजू शकलेली नाही. प्रशांत विहारमधील बन्सी स्वीटस नजीक हा स्फोट झाल्यानंतर स्थानिकांनी ही माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला दिली. दिल्ली पोलिसांनी माहिती मिळताच पोलिस दल घटनास्थळी पाठवले. त्याचवेळी अग्निशमन विभागालाही माहिती देण्यात आली. अग्निशमन दलाच्या गाड्याही घटनास्थळी दाखल झाल्या. श्वान पथक, एफएसएल टीम आणि इतर तज्ज्ञ पथकासह एनएसजी कमांडो घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास करत आहे.

# निवडणूकीत मतदानाची वेळ संपल्यावर ७.८३ टक्के मते कशी वाढली? : नाना पटोले

मुंबई, दि. २८ नोव्हेंबर : विधानसभेच्या निवडणुकीत मतांच्या टक्केवारीतील तफावत गंभीर व चिंताजनक आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता ५८.२२ टक्के मतदान झाले, त्याच रात्री ११.३० वाजता ते ६५.०२ टक्के तर दुसऱ्या दिवशी २१ नोव्हेंबर रोजी हेच मतदान ६६.०५ टक्के झाल्याचे सांगितले, यात एकूण ७.८३ टक्के वाढ झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. तब्बल ७६ लाख मतांची ही वाढ असून मतदानाचा टक्का कसा वाढला? असा प्रश्न उपस्थित करून निवडणूक आयोगाने जिथे मतदान वाढले त्या केंद्राचे व्हिडीओ फुटेज जाहीर करावे, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



काँग्रेसचे सर्व पराभूत उमेदवार व प्रमुख नेत्यांची बैठक टिळक भवन येथे झाली. त्यात बहुताश उमेदवारांनी ईव्हीएम मशीनचा घोळ असल्याचे मत मांडले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी निवडणूक आयोगाने जनतेच्या मतांवर दरोडा टाकला असल्याचा आरोप करून पटोले यांनी मतांची आकडेवारी देत निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारावार चिन्ह उपस्थित केले, ते म्हणाले की, मतदानाच्या दिवशी ५ वाजल्यानंतर मतांची टक्केवारी वाढल्याचे प्रमाण पाहता मतदारकेंद्रावर लांबच लांब रांगा लागल्या असल्या पाहिजेत. राज्यातील किती मतदार संघावर अशा रांगा लागल्या होत्या ते निवडणूक आयोगाने पुराव्यासह दाखवावे. मतदान केंद्रावर सीसीटीव्ही लावले होते, त्याचे चित्रिकरण दाखवावे. मतदान झाल्यानंतर आयोग पत्रकार परिषद घेऊन माहिती देत असते, यावेळी आयागाने पत्रकार परिषद का घेतली नाही. वाढीव मतांबद्दल देशभरातील विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींनी शंका उपस्थित केल्या आहेत. यामुळे निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून राजकीय पक्ष, उमेदवार वा इतरांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. काँग्रेस पक्षाचा पराभव झाला म्हणून नाही तर लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेस पक्ष मतदानाच्या टक्केवारीतील तफावतीचा मुद्दा लावून धरत आहे. भारतीय जनता पक्ष व निवडणूक आयोगाने संगनमताने लोकशाहीची क्रूर थट्टा केली आहे. विधानसभा निवडणुकीतील मतांच्या तफावतीसंदर्भात काँग्रेस पक्ष न्यायालयीन व रस्त्यावरची लढाई लढेल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी बैठकीला माजी मंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेश कार्याध्यक्ष व उथउ सदस्य नसीम खान, माजी मंत्री के. सी. पाडवी, यशोमती ठाकूर डॉ. विश्वजीत कदम, आ. भाई जगताप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे आदी उपस्थित होते.

## मुंबईत एअर इंडियाच्या पायलटची आत्महत्या, या कारणामुळे बॉयफ्रेंडला अटक

मुंबई: मुंबईतील अंधेरी पूर्व परिसरात एअर इंडियाच्या पायलट सृष्टी तुलीने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. २५ नोव्हेंबरला तिच्या भाड्याच्या घरात तिचा मृतदेह आढळला. पोलिसांच्या तपासात तिने ही आत्महत्या बॉयफ्रेंडसोबतच्या भांडणामुळे केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी कारवाई करताना पोलिसांनी आरोपी बॉयफ्रेंड आदित्य पंडित(२७) याला अटक केली आहे.

आदित्य गेल्या काही काळापासून तिच्या घरी येत जात असे. रविवारी रात्री १ वाजण्याच्या सुमारास भांडणानंतर आदित्य मुंबई सोडून दिल्लीसाठी रवाना झाला. यामुळे त्रस्त झालेल्या सृष्टीने त्याला फोन करून सांगितले की ती आत्महत्या करत आहे. मात्र त्याने परत येण्यास नकार दिला. दरम्यान, काही काळाने तो परतला तेव्हा सतत प्रयत्न करूनही त्याला दरवाजा खोलता आला नाही.

यावेळेस त्याने चावीवाल्याला बोलवत घराचा दरवाजा खोलून घेतला. त्यावेळी दरवाजा उघडला असता सृष्टी बेशुद्ध पडलेली असल्याचे त्याने पाहिले. त्याने तातडीने तिला मरोळच्या सेव्हन हिल्स रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. यानंतर रुग्णालयाने पोलीस तसेच कुटुंबियांना माहिती दिली. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

सृष्टी तुलीच्या कुटुंबियांनी केलेल्या तक्रारीच्या आधारावर पोलिसांनी २६ नोव्हेंबरला आरोपीविरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम १०८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. यानंतर बुधवारी आरोपीला अटक करण्यात आली. त्यानंतर न्यायालयात सादर केले असता त्याला २९ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे. पोलिसांना फ्लॅटमध्ये कोणतीही सुसाईड नोट मिळालेली नाही.

## मराठवाडा साहित्य परिषदेच्या विविध समित्यांवर नांदेडच्या साहित्यिकांची वर्णी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

दि.२८-मराठवाडा साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांची बैठक छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच पार पडली.या बैठकीत मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी परिषदेच्या अंतर्गत विविध समित्यांची घोषणा केली.या समित्यांवर नांदेड येथील साहित्यिकांना मोठ्या प्रमाणात संधी देण्यात आलेली आहे.केंद्रिय कार्यकारिणीचे सदस्य संजीव कुलकर्णी यांच्या कडे ग्रंथ पुरस्कार समितीचे अध्यक्षपद देण्यात आले असून डॉ.कमलाकर चव्हाण, डॉ.विश्वाधर देशमुख, सुचिता खल्लाळ, डॉ.राजेंद्र गोणारकर यांची समितीचे सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.देवीदास फुलारी, संजीव कुलकर्णी, योगिता पांडे सातारकर यांची निवड प्रतिष्ठानच्या संपादक मंडळावर झाली आहे.निर्मलकुमार सूर्यवंशी यांची ग्रंथ प्रकाशन समितीवर तर डॉ भगवान अंजनीकर, दत्ता डांगे आणि प्रा.नारायण शिंदे यांची बाल साहित्य समितीवर, निवड करण्यात आली आहे, मराठवाडा वाड् माय इतिहास समितीवर डॉ.पी.विठ्ठल यांना संधी देण्यात आली आहे.ग्रामीण शब्दकोश समितीवर वीरभद्र मिरेवाड आणि डॉ.वैजनाथ आनमुलवाड यांना घेतले आहे.मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन आणि ग्रंथालय समितीवर डॉ.हेमलता पाटील काम पाहणार आहेत.

मराठवाडा साहित्य परिषदेने नांदेडच्या साहित्यिकांना झुकते माप दिल्याने साहित्य वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

## 'अभिमान' चित्रपटातील बिग बींनी जया बच्चन सोबतच्या सांगितल्या पडद्यावरवरील केमिस्ट्री

छत्रपती संभाजीनगर - सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील कौन बनेगा करोडपती १६ या गेम शोमध्ये या आठवड्यात होस्ट

अमिताभ बच्चन समोर असतील जयपूरचे क्ठ व्यावसायिक विरेन्द्र शर्मा. श्री. बच्चन यांनी त्यांना

विचारले, माझ्या बाबतीत तुमचे काय मत आहे? मी स्वतःचा सी व्ही बनवला पाहिजे का? यावर विरेन्द्र यांनी गंमतीत उत्तर दिले, तुमचा सी व्ही इतका लांबलचक बनेल, त्यात काहीच कमी नसेल! हसत हसत श्री. बच्चन म्हणाले, माझ्या सी व्ही मध्ये एक गोष्ट नक्कीच असेल, काम दे दो भैय्या! या हलक्या फुलक्या गप्पा मारता मारता विरेन्द्र यांनी आपल्या कारकिर्दीविषयी, आपल्या आकांक्षा, यश आणि चिकाटी याविषयी सांगितले.या खेळादरम्यान विरेन्द्र यांनी अमिताभ बच्चन यांचा 'अभिमान' चित्रपट आपल्या आवडीचा असल्याचे शेअर केले.

या चित्रपटाचे संगीत आपल्याला खूप आवडते हे कबूल करत त्यांनी श्री. बच्चन यांना जया बच्चन सोबत काम करण्याचा त्यांचा अनुभव कसा होता हे विचारले. मंद हास्य करत श्री. बच्चन यांनी या चित्रपटामागची कहाणी सांगितली. संगीत तर अप्रतिमच होते. आणि हृषीकेश मुखर्जी सोबत काम करण्याची संधी होती. त्यावेळी माझे जयाशी लग्न झाले नव्हते. चित्रपटाचे कथानक आणि संगीत सुंदर होते. कधी कधी संगीतकार आणि मी एकत्र बसायचो, गाणी ऐकायचो आणि चित्रपटातील परिस्थितीस अनुकूल नवी गाणी रचली जायची. ते वातावरणच काही वेगळे होते. लताजी नेहमी विचारायच्या, 'हे गाणे तयार झाले आहे का आणि ते कोण गाणार आहे? त्या ते गाणे अशा प्रकारे म्हणायच्या की त्यातून त्या क्षणाची आणि गायकाची भावना अचूक व्यक्त व्हायची. लताजींचा हा गुण अद्वितीय आहे.

## जिल्ह्यात २८ फेब्रुवारीपर्यंत पशुगणना मोहीमेचे आयोजन-जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

अहिल्यानगर दि. २६- जिल्ह्यातील पशूंची गणना करण्याची मोहीम २८ फेब्रुवारीपर्यंत करण्यात येणार असून या मोहिमेत जनावरांची खरी माहिती पशुपालकांनी द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे. जिल्ह्यात करण्यात या गणनेत गायवर्ग, म्हसवर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बिल्ला मारलेल्या (टॅगींग केलेल्या) जनावरांची व भटक्या समुदायातील पशुधनाची गणनाही करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात २९५ प्रगणक व ७६ पर्यवेक्षक तर शहरी भागात ५६ प्रगणक व १८ पर्यवेक्षकांची या कामासाठी नियुक्ती केली जाणार आहे. पशुगणनेमुळे जनावरांची नेमकी संख्या स्पष्ट होते. त्यानुसार शासनाकडून धोरण, योजना आखल्या जातात. निधीची उपलब्धता केली जाते, शिवाय पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात असलेल्या पशुधनानुसार लसीकरणासाठी औषधांचा पुरवठा केला जातो. तसेच याचा फायदा त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना राबवितांना होणार असल्याने आपल्याकडील जनावरांची माहिती द्यावी, असे पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. सुनिल तुंबारे यांनी कळविले आहे.

# शिरड येथील तलाठ्याचा मनमानी कारभार

**तभा वृत्तसेवा**
**निवघा,दि. २८ नोव्हेंबर**

भागात महसूल प्रशासनाचा तलाठी आणि मंडल अधिकारी यांच्यावर अंकुश नसल्याने मोठ्या प्रमाणावर तलाठी त्यांना नेमून दिलेल्या कार्यस्थळी उपलब्ध राहत नसल्याचे दिसून येत असून तलाठी भेटत नसल्याने शेतकरी आणि विद्यार्थी यांची कामे रखडण्याचे प्रकार घडत आहेत. शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. गावांची माहिती महसूल प्रशासनामार्फत तातडीने पोहचविण्यासाठी सर्व तलाठ्यांनी नेमून दिलेल्या कार्यस्थळी उपस्थित राहण्याचे आदेश शासनाच्या वतीने देण्यात आले आहेत. परंतु असे असतानाही जिल्ह्याच्या ग्रामीण भागात मात्र वेगळीच परिस्थिती दिसून येते. महाविद्यालयीन प्रवेश तसेच विविध सवलतीचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे तत्काळ मिळणे विद्यार्थ्यांकरिता गरजेचे असते. तर, शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी सात-बारा आणि खाते उतारा आवश्यक आहे. ही सर्व कागदपत्रे विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना वेळेवर उपलब्ध व्हावीत म्हणून तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना सतर्कतेच्या सूचना महसूल विभागाकडून देण्यात आल्या आहेत. परंतु जिल्ह्याच्या ग्रामीण भागात काही अपवाद वगळता या सूचनांकडे तलाठ्यांकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. नेमून दिलेल्या गावांना तलाठी उपस्थित राहत नसल्याने शेतकरी व विद्यार्थी यांची गैरसोय होत आहे. येथील शिरड तलाठी पंधरा दिवसापासून गैरहजर असल्याने या गावातील शेतकरी पीक विमा योजनेचे चलन भरण्यापासून आणि त्याचा लाभ घेण्यापासून वंचित राहत आहेत.

अशा गावांकडे वरीष्ठ अधिकारी अचानक भेटीला येण्याची शक्यता कमी असल्याने तलाठी बिनधास्त असतात. अशा गावांमध्ये कार्यरत तलाठी आठवड्यातून एखाद्या दिवशीच ग्रामस्थांना भेटत असल्याने आणि तलाठी आल्याची माहिती सर्वांना मिळत नसल्याने ग्रामस्थ संबंधित कार्यालयात गेल्यावर तलाठी परत बाहेर गेल्याचे निरोप त्यांना ऐकावे लागतात. तलाठ्यांना गाठण्यासाठी विद्यार्थ्यांना आठवड्यातून अनेक वेळा घिरट्या घालाव्या लागतात. वरीष्ठांनी दुर्गम भागातही अचानक भेट देऊन तलाठी कार्यस्थळी आहेत कि नाही याची तपासणी केल्यास तलाठ्यांचे अनुपस्थित राहण्याचे प्रमाण कमी होऊ शकेल, असे विद्यार्थी व शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## मुबलक पाणीपुरवठा, योग्य वातावरणाचा शेतकऱ्यांना रब्बीमध्ये फायदा व्हावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा थेट बांधावर दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

यावर्षी झालेला मुबलक पाऊस, जलसाठ्यांमधील विपूल प्रमाणातील सिंचनाचे पाणी व पाऊसासोबतच योग्य प्रमाणातील थंडीचे वातावरण यामुळे रब्बीसाठी आवश्यक असणारे नैसर्गिक वातावरण आहे. त्यामुळे हा रब्बीचा हंगाम शेतकऱ्यांना चांगला जाईल यासाठी सर्व पूरक उपाययोजना करा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

जिल्ह्यातील विविध गावांचा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दौरा करून रब्बी हंगामाच्या पीक परिस्थितीची पाहणी गेली दोन दिवस केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना उत्तमपूरक उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी एलेचपूर येथील प्रशांत दुर्गादास तीर्थे यांच्या शेतावर दौऱ्या दरम्यान भेट दिली. यावेळी त्यांनी हरभरा, ज्वारी व हळद पिकांची पाहणी केली. हरभरा पिकांमध्ये जास्तीत जास्त जैविक कीड नियंत्रण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी तालुका कृषि अधिकारी संजय चातरमल, मंडळ कृषि अधिकारी सुनिल सानप, कृषि पर्यवेक्षक चिंचूवाड, कृषि सहायक श्रीमती शिंदे उपस्थित होत्या. नांदेड तालुक्यामध्ये यावेळी हरभरा, ज्वारी व गहू पिकाखाली शेकडो हेक्टर जमीन आहे. त्यामुळे व्यवस्थापनाच्या सूचना वरचेवर करण्याचे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी सज्ज व्हा; प्रधानमंत्र्यांसोबत भेटण्याची संधी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

तुमच्यामध्ये नेतृत्व गुण असेल उद्याचे नेतृत्व करण्याची इच्छा असेल तर केंद्र सरकारने सुरू केलेल्या उपक्रमामध्ये अर्थात विकसित भारत युवा नेते संवाद म्हणजेच राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र नांदेड यांनी केले आहे.

भारत सरकारने हा उपक्रम जाहीर केला असून देशभरातील २ हजार तरुण तरुणींनी १२ ते १३ जानेवारीला भारत मंडपम येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत विकसित भारताचे व्हिजन मांडणार आहेत. ही सुवर्ण संधी असून त्यासाठी वेगवेगळ्या पात्रता फेरीला १५ ते २९ वयोगटातील तरुणांना तोंड द्यावे लागणार आहे. नांदेड जिल्ह्यातील युवापिढीने यामध्ये सहभागी व्हावे. त्यासाठी क्विज२डॉटमायजिओव्हीडॉटइन (quiz2.mygov.in) या लिंकवरून सहभाग नोंदवता येतो. ही ऑनलाईन नोंदणी करून नोंदणी प्रक्रिया समजून घ्यावी किंवा नांदेड जिल्ह्याच्या नेहरू युवा केंद्र राज निवास शिवरायनगर मालेगाव रोड नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर यांनी केले आहे.

## नांदेडमधील ३३ केंद्रांवर १ डिसेंबरला एमपीएससी परीक्षा

**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर :** राज्य शासनाने नोकर भरती मोठ्याप्रमाणात सुरू केली असून याअंतर्गत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ही येत्या १ डिसेंबरला होणार आहे. नांदेडमधील सर्व प्रमुख शाळा व महाविद्यालयांमध्ये या परीक्षेचे केंद्र असून परीक्षेसंदर्भात असणारी नाकाबंदी व शंभर मिटर पर्यंत प्रवेश बंदी केली जाणार आहे. नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या या महत्त्वपूर्ण परीक्षेला लक्षात घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे. सकाळी १० ते दुपारी १२ व दुपारी ३ ते ५ याकालावधीमध्ये दोन सत्रात ही परीक्षा होणार आहे. त्यामुळे रविवारी सेंटर असलेल्या शाळा, महाविद्यालयांच्या परिसरात कोलाहल असणार नाही. कुठेही डिजे वाजणार नाही. किंवा शंभर मिटर पर्यंत मोबाईलपासून सर्व प्रकारच्या साहित्याला परिक्षा केंद्राच्या परिसरात वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये सर्व निर्बंध लादण्यात आले असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## ई-पीक पाहणी प्रक्रीया पूर्ण करा; शेतकऱ्यांना लाभ मिळवण्यासाठी आवश्यक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

शेतकऱ्यांना कोणत्याही लाभासाठी यापुढे ई - पीक पाहणी प्रक्रीया पूर्ण करणे आवश्यक होणार आहे. त्यामुळे भविष्यातील सर्व लाभ मिळण्यासाठी ही प्रक्रीया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

संपूर्ण राज्यात रब्बी हंगाम २०२४ पासून ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे मोबाईल ॲप द्वारे पीक नोंदणी करावयाची आहे. दिनांक १ डिसेंबर २०२४ पासून राज्यातील सर्व गावांमध्ये रब्बी हंगाम २०२४ सुरू करण्यात येत आहे. या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहायक स्तरावरुन मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंद करण्यात येणार आहे. तद् अनुषंगाने रब्बी हंगाम २०२४ करिता शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणी दि.१ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ हा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

त्याकरिता ई-पीक पाहणीत ३.०.३ डाऊनलोड करावे. तसेच डिजीटल क्रॉप सर्वे मध्ये गटाच्या हद्दीवर आधारित ॠशे ॠशापलळपस बंधनकारक करण्यात आलेली आहे म्हणजेच जोपर्यंत संबधित खातेदार निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाही तो पर्यंत पिकांचे छायाचित्र काढता येत नाही व पीक पाहणी करता येत नाही. तरी जिल्हयातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना आवाहन करण्यात येते कि, त्यांनी रब्बी हंगाम २०२४ साठी ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी जेणे करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास अडचण येणार नाही.

## तांड्याची लेक अनिता जाधव यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**देगलूर,दि. २८ नोव्हेंबर :** देगलूर तालुक्यातील हानेगाव च्या शेजारी असणारे चव्हाणवाडी हे एक लहानस गाव त्या गावातील अनिता जाधव लिखित ग्रामीण कथासंग्रह ' तांड्याचे पाय 'या कथासंग्रहास दत्तात्रय सांडू प्रतिष्ठान मुंबई -२०२४चा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.शेतकरी,कामगार, शेतमजूर समाजाचे चित्र उभे करणार्या या कथासंग्रहास यापूर्वी नाथोबा दहिवाळ संभाजीनगर २०२४चा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. दु:खातून बाहेर येणार्या कष्टकरी माणसाच्या जगण्याचे प्रेरणादायी वर्णन या कथा संग्रहात वाचायला मिळते. संवेदनशील मनाच्या लेखीका असलेल्या अनिता जाधव यांचे शाळाबाह्य मुले (एकांकिका),सृजन सकाळ (कथासंग्रह ),कोरडे आभाळ (कविता संग्रह ),तांड्याचे पाय (कथासंग्रह )प्रकाशित झाले आहेत. दत्तात्रय सांडू प्रतिष्ठान चा २०२४ चा राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल त्यांच्यावर सर्वस्तरातुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. एका तांद्यावरील लेकीने लिहिले तांड्याची व्यथा सत्यात उतरवले आहे.

## जळगावात २ लाचखोर पोलीस एसीबीच्या जाळ्यात

जळगाव, २८ नोव्हेंबर : पारोळा येथे खाकी वर्दीलाच काळिमा लागलीय. अपघात प्रकरणी आरोपीची अटक टाळण्यासाठी १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पारोळा येथील दोन पोलिसांना धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. पारोळा पोलीस स्टेशनला असलेले हिरालाल देवीदास पाटील (४३, रा. हरिओम नगर, गळवाडे रोड, अमळनेर) व प्रवीण विश्वास पाटील ४५, रा. पोलिस वसाहत, या दोन्ही दोन्ही पोलिसांना जेरबंद करण्यात आले आहे. तक्रारदार हे ७ नोव्हेंबर रोजी दुचाकीने पारोळ्याहून धरणगावकडे जात असताना त्याचवेळी समोरून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीची समोरा समोर धडक होऊन त्यावरील चालक ठार झाला. याबाबत तक्रारदाराविरुद्ध पारोळा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात तक्रारदाराची अटक टाळण्यासाठी संशयित दोन्ही पोलिसांनी त्यांच्याकडे ३० हजाराची मागणी केली होती. तडजोडीअंती १५ हजाराची देण्याचे ठरले. त्यानुसार पारोळा पोलीस स्टेशनचे पो. हवालदार हिरालाल विश्वास पाटील यांनी १५ हजाराची रक्कम घेतली.

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५२४/२०२४

अर्जदार : १. शिवाजी तुकाराम मिसाळ, २. तुळसाबाई तुकाराम मिसाळ, दोघेही रा.मनिषा नगर, वाळुज, ता. गंगापुर जि.छ.संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही.जे. कसाने, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पिता आणि अर्जदार नं. २ यांचे पती तुकाराम नाथा मिसाळ हे दि. ०९/०२/२०२३ रोजी मौजे वाळुज ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले आहे. मयत तुकाराम नाथा मिसाळ यांना अर्जदार नं. १ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत तुकाराम नाथा मिसाळ यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २७/११/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

### जाहीर प्रगटन

**(मौजे पखोरा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथिल गट क. ६५ मधील ० हे. ६० आर.)**

माझे पक्षकार पांडूरंग जयराम वाघ रा. पखोरा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी भागचंद नाथा गायकवाड, लता भिकचंद गायकवाड, प्रविण भिकचंद गायकवाड, पंकज भिकचंद गायकवाड, अमोल भिकचंद गायकवाड, वंदना भिकचंद गायकवाड यांच्या मालकी व ताब्यातील सामाईक क्षेत्र ८६ आर अधिक २ आर पोटखराबा क्षेत्रापैकी लागवडीयोग्य क्षेत्र १० आर जमीन

त्याचप्रमाणे केशव विश्वनाथ गायकवाड, सुभाष विश्वनाथ गायकवाड, संजय विश्वनाथ गायकवाड, सुनंदा एकनाथ पठारे, संगिता साहेबराव दाभाडे यांच्या मालकी व ताब्यातील सामाईक क्षेत्र १ हे. १५ आर अधिक २ आर पोटखराबा क्षेत्रापैकी लागवडीयोग्य क्षेत्र १० आर जमीन,

त्याचप्रमाणे चंद्रकलाबाई बन्सी गायकवाड, रुख्मनबाई केशव साळवे, चंद्रभागाबाई उर्फ चंद्रकलाबाई नामदेव दाभाडे, कमलबाई नेल्सन जगदाळे, बाबुलाल उर्फ बाबू बन्सी गायकवाड, लताबाई भाउसाहेब किर्तीशाही, ज्योती कांतीलाल गायकवाड, विशाल कांतीलाल गायकवाड, वैशाली कांतीलाल गायकवाड तसेच मयत सतीभामाबाई बन्सी दाभाडे यांच्या मालकी व ताब्यातील सामाईक क्षेत्र ० है. ५७ आगर अधिक २ आर पोटखराबा क्षेत्रापैकी लागवडीयोग्य क्षेत्र १० आर जमीन,

त्याचप्रमाणे शिवाजी दौलत गायवकाड, बाळू दौलत गायकवाड तसेच मयत दिवाकर दौलत गायकवाड व मयत हौसाबाई कनरू गायकवाड यांच्या मालकीचे सामाईक क्षेत्र ० है. ८६ आर अधिक २ आर पोटखराबा क्षेत्रापैकी लागवडीयोग्य क्षेत्र १० आर जमीन,

त्याचप्रमाणे चंद्रभान चोखा गायकवाड हे मयत असून त्याच्या नावावरील सदरील गटातील ० हे. ८६ आर जमीन असून जमीन विक्री करणार विकास विलास गायकवाड, कांता विलास गायकवाड, शीतल बाजिराव शिनगारे, उषाबाई नाना म्हस्के, योगीता रावण म्हस्के, कल्पना नंदू म्हस्के, अश्विनी भीमा चाबुकस्वार, हे त्यांचे कायदेशीर वारस असून त्या अधिकाराने त्यांनी सदर चंद्रभान चोखा गायकवाड यांच्या नावावरील ८६ आर जमीनीपैकी १० आर जमीन,

त्याचप्रमाणे आसाराम चोखा गायकवाड हे मयत असून त्यांच्या नावे सदरील गटात० हे. ८६ आर जमीन असून लक्ष्मीबाई कडूबा बोरुडे, विजय कल्याण गायकवाड, उषाबाई कल्याण गायकवाड, कडूबाई आसाराम गायकवाड, शोभा संजय बागुल, झुंबरबाई आसाराम गायकवाड, आशाबाई सूर्यभान राबडे हे त्यांचे कायदेशीर वारस असून त्या अधिकाराने त्यांनी सदर आसाराम चोखा गायकवाड यांच्या नावावरील ८६ आर जमीनीपैकी १० आर जमीन,

अशी एकूण ६० आर जमीन ही सर्व तद्भुत वस्तूसह व झाडाझुडपासह माझे पक्षकार यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचा करार केला आहे. सदरील जमीनीच्या एकत्रित चतु:र्सिमा खालिल प्रमाणे.

पुर्वस - शेती महामंडळ यांची जमीन.
पश्चिमेस - भेंडाळा धानोरा रस्ता.
दक्षिणेस - बाबू बन्सी गायकवाड यांची जमीन.
उत्तरेस - लिहून देणार यांचे उर्वरित क्षेत्र व सुखदान यांची जमीन

असे की, भागचंद नाथा गायकवाड व इतर यांनी सदरील जमीनी या दोषमुक्त व निर्विवाद असल्याची खात्री माझ्या पक्षकाराला दिली आहे. तरी देखील या जाहीर प्रगटाद्वारे तमान जनतेस कळविण्यात येते की, सदर वरील जमीनींशी कोणाचा काही एक हक्क संबंध, चोळी बांगळी गहाण, दान, बक्षिस, खरेदी-विक्री अथवा इतर कुठल्याही मागनि हक्क संबंध असल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कागदपत्रांच्या पुराव्यासह आमच्या नमूद पत्त्यावर आक्षेप नोंदवावा, मुदती आक्षेप न आल्यास माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. करीता है जाहीर प्रगटण आज दि. २८/११/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले.

**जाहिर प्रगटन देणार तर्फे**
**ॲड. दत्ता एकनाथराव पानकडे गंगापुर.**

# निवघा परीसरातबोगस बंगाली डॉक्टरचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**निवघा,दि. २८ नोव्हेंबर**

शासकीय आरोग्याची सेवा समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत नसल्याने, त्याचा गैरफायदा बोगस डॉक्टरांकडून घेतला जातो आहे. गेल्या काहीवर्षांमध्ये बोगस बंगाली डॉक्टरांनीही ग्रामीण भागात शिरकाव केला असून, गरीब-अशिक्षित जीवावरच बेतते आहे. तर दुसरीकडे यासंदर्भात तक्रारी केल्यानंतरही ढिम्म जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून कठोर कारवाई होत असल्याचे वास्तव आहे.

बोगस बंगाली डॉक्टर मात्र सहजरित्या पोहोचले आहेत. विशेषतः अत्यंत वाजवी शुल्क आकारून औषधोपचार होत असल्याने रुग्णांनाही ते आर्थिकदृष्ट्या परवडते. त्यामुळे रुग्णही नजिकचे प्राथमिक आरोग्य केंद्र वा खासगी क्लिनीककडे न जाता, बंगाली डॉक्टरांकडून उपचार घेणे पसंत करतो. वाजवीपेक्षा औषधांचा डोस जास्त होऊन, ग्रॅस्ट्रो, पित्त, उलट्यांचा त्रास होऊन बहुतांश वेळी रुग्ण दगावतात. परंतु हे रुग्ण शहरातील शासकीय वा खासगी रुग्णालयापर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे या बंगाली बोगस डॉक्टरांच्या बिंगाला वाचा फुटत नसल्याचे वास्तव आहे.

ग्रामीण भागात एखाद्या छोटेखानी घरात बोगस बंगाली डॉक्टर्सचे क्लिनीक चालते. बेकायदेशीररित्या गर्भपात, साथीच्या रोगांवर ॲण्टिबायोटिक गोळ्या व इंजेक्शनचा वापर, मूळव्याधीवर आयुर्वेदिक उपचाराच्या नावाखाली उपचार करतात. मात्र आत्तापर्यंतच्या काही कारवाईंमध्ये या बंगाली बोगस डॉक्टरांकडे असलेले प्रमाणपत्र खोटेच असल्याचे सिद्ध झाले आहे. परंतु असे असले तरी चोरीछुप्यारित्या या बोगस डॉक्टरांचा गोरखधंदा ग्रामीण भागातील अशिक्षितपणामुळे पोसला जातो आहे.

हदगांव तालुक्यातील कोळी येथे बोगस बंगाली डॉक्टर आपले बाडबिष्ठान मांडून बसले असून गावातच प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्यात नसलेल्या सुविधा पाहता गावातील तसेच परिसरातील नागरिक त्या बंगाली डॉक्टर कडे जात आहे. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी नसलेले हे डॉक्टर रुग्णांच्या जीवाशी खेळत आहेत.

### मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं./ १६४/२४

१/- भावराव दशरथ साळवे, वय ७५ वर्ष, धंदा शेती, रा. मालेगाव पिंप्री, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- प्रकाश भावराव साळवे, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३/- विकास भावराव साळवे, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४- विलास भावराव साळवे, वय ४० वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे वावत,

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अड. राजेश अ. गिरी, रा. सोमगांव, ता. सोयगांव व्डि औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भागाबाई भावराव साळवे यांचा दिनांक ०७.१२.२०२३ रोजी मौज मालेगाव पिंप्री, ता सोयगाव, मि. छ संभाजीनगरयेथे मृत्यू झालेला असून त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्र. १ तै ४ है पारस आहे, असा अर्न मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार १ ते ४ मयत भागाबाई आवराव साळवे पांचे बारस असुन त्यांना शासकिय निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या बारस प्रमाणपत्र देण्याकरीता उनर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात पोग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरांनी दिनांक २८/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. ८/१/२०२५

आदेशावरुन
क लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

### मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९२/२०२४

१/- ईश्वर रामसिंग डांगर, वय ६० वर्ष, धंदा शेती, रा. पळाशी, ता, सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- शोभाबाई ईश्वर डांगर, वय ५३ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- भगवान ईश्वर डांगर, वय २७ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध
कुणीही नाही

प्रकरण: वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने बारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनील गिरी. रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत्त रामसिंग सांडू डांगर यांचा दि. ०६.१२.१९७८ रोजी मौजे पळाशी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ३ हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क.. १ ते ३ हे मयत रामसिंग सांडू डांगर यांचे वारस असुन त्यांना मयत्त रामसिंग सांडू डांगर यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि २८/११/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. ०३/०१/२०२५

आदेशावरून,
क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## माध्यमिक आश्रम शाळेत ज्ञान उर्जा प्रकल्पातील साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. २८ नोव्हेंबर**

मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेतील प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थे चे माजी प्राचार्य किशन रतन राठोड यांच्या हस्ते शाळेतील मुलं मुलींना ज्ञान उर्जा प्रकल्प साहित्या चे वाटप करण्यात आले.

तालुक्यातील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेत इतर मागास बहुजन कल्याण विभागा अंतर्गत जिल्ह्यातील वाडी तांड्यावरील विमुक्त जाती भटक्या जमातीतील आश्रम शाळेतील वर्ग सातवी व आठवी या वर्गातील मुला- मुलींना उर्जे च्या संवर्धनाच्या कायद्या बद्दल शिकवणे आणि त्यांना वस्तू किंवा प्रणाली द्वारे दर्शविल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या ऊर्जेची ओळख करून देण्यास मदत केल्याने मुलांना ऊर्जा विज्ञानाबद्दल त्यांची समज व जागरुकता निर्माण व्हावी. या अनुषंगाने शाळेतील प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली शाळेचे मा.प्राचार्य तथा संस्थेचे संचालक किशन रतन राठोड यांच्या हस्ते. दिनांक २८.नोव्हेंबर रोजी रोज गुरुवारी सकाळी शाळेच्या भव्य प्रांगणात वर्ग सातवी ते आठवी वर्गातील सर्व मुला मुलींना ज्ञान उर्जा प्रकल्प मधील साहित्याचे वाटप करण्यात आले.

ज्ञान उर्जा प्रकल्प मधील साहित्य वाटपा वेळी शाळेचे प्राचार्य विजय कुमार देशमुख, आनंदराव सुर्यवंशी, सुर्यकांत जाधव,महेंद्र सारवले,दिपक बि-हाडे,नागनाथ वेह्ळे, सुभाष राठोड,सुभाष कदम,चिलमवाड,चतूर्थ कर्मचारी उत्तम राठोड , शरद पवार, शिवाजी नारे ,हाणमंत सिंगवाड, आदि शिक्षक वृंद व चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील मरवाळीतांडा येथील माध्यमिक आश्रम शाळे चे प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी सकाळी शाळेच्या भव्य प्रांगणात माजी. प्राचार्य किशन रतन राठोड यांच्या हस्ते.ज्ञान उर्जा प्रकल्प मधील साहित्याचे वाटप करण्यात आले.

## महात्मा फुले पुण्यतिथी साजरी



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी - नारायणराव उजळंबकर सार्वजनिक वाचनालय एन-४ सिडको येथे गुरुवार, २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी क्रांतिसूर्य महान समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ॲड. प्रमोद मयुरे, तर अध्यक्षस्थानी दत्तात्रय कृपाने होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. मान्यवरांनी फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला शिवाजी रामरुले, ज्ञानेश्वर कारंडे, उदय सुरंगळीकर, समीर दिवटे यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होते. यावेळी सहायक ग्रंथपाल राजश्री बाविस्कर यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

## शिक्षकानं पत्नी आणि मुलीसह संपवलं जीवन

परभणी : जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडली आहे. शिक्षकाने आपल्या पत्नी आणि मुलीसह आत्महत्या केल्याची खळबळजणक घटना घडली आहे. परभणीच्या गंगाखेडमध्ये ही घटना घडलीय. या तिघांनी रेल्वेखाली येत आत्महत्या केली आहे. तिघांनी आत्महत्या का केली? याचं कारण मात्र अद्यापही अपष्ट आहे. या घटनेनं परभणी जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. परभणीच्या गंगाखेड शहरात अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. शिक्षकाने आपल्या पत्नी आणि मुलीसह रेल्वेखाली येत आत्महत्या केली आहे. या घटनेने गंगाखेडसह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. नेमकी ही आत्महत्या का केली? हे मात्र अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

# ईव्हीएम विरोधातील पुरावे गोळा करण्याच्या राज ठाकरेंच्या सूचना

पुणे, २८ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून ईव्हीएम बाबत सातत्याने शंका उपस्थित करण्यात येत आहे. आता महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबतच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना देखील यंदाच्या निवडणुकीमध्ये ईव्हीएम घोटाळा झाला असल्याचा संशय आहे. त्यामुळे पुण्यातील बैठकीमध्ये राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना ईव्हीएम विरोधातील पुरावे गोळा करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीत मनसेने स्वबळाचा नारा देत २८८ पैकी १२५ जागा लढल्या मात्र मनसेला एकही जागा जिंकता आली नाही. यानंतर मनसे अध्यक्ष राज



ठाकरे यांनी पराभूत उमेदवारांच्या आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यास सुरुवात केली आहे. आज त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील पराभूत उमेदवारांची बैठक घेतली. बैठकीमध्ये पराभवाच्या कारणांबाबत चर्चा करण्यात आली.

बैठकीनंतर मनसे नेते बाबू वागस्कर यांनी बैठकीबाबतची माहिती माध्यमांना दिली बाबू वागस्कर म्हणाले, आज झालेल्या बैठकीमध्ये पराभूत उमेदवारांशी राज ठाकरे यांनी संवाद साधला यादरम्यान अनेक उमेदवारांनी ईव्हीएम बाबत शंका उपस्थित केली. राज ठाकरे यांनी देखील ईव्हीएम बाबत संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे पराभूत उमेदवारांना आणि पदाधिकाऱ्यांना ईव्हीएम संदर्भातील पुरावे गोळा करण्याच्या सूचना देण्यात आला आहेराज ठाकरे यांच्याकडून राज्यभरात झालेल्या निवडणुकांचा आढावा घेण्यात येत आहे. त्याच दृष्टिकोनातून पश्चिम महाराष्ट्रातील ही आढावा बैठक होती.

काही उमेदवारांनी मतमोजणी मध्ये देखील फेरफार झाली असल्याचा आक्षेप घेतला आहे. संदर्भातील निवडणुकीदरम्यान आलेले सर्व अनुभव पराभूत उमेदवारांनी राज ठाकरे यांच्यासमोर मांडले. आगामी निवडणुकांमध्ये मनसे जोमाने लढणार असल्याचे देखील या बैठकीत निश्चित करण्यात आलं.

# सातार्‍यात श्रीखंडोबा यात्रेची जय्यत तयारी

### २ डिसेंबरला घटस्थापना, ७ पासून 'येळकोट येळकोट'

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

सातारा खंडोबाचे येथे चंपाषष्ठीपासून भव्या यात्रा भरणार असून, जय्यत तयारी सुरू आहे. रविवारी, १ डिसेंबर २०२४ पासून सातारा परिसरात 'येळकोट येळकोट जय मल्हार.... सदानंदाचा येळकोट' चा गजर घुमणार आहे. खंडोबा षड्रात्रोत्सव सोमवारी, २ डिसेंबर रोजी असून, याच दिवशी घटस्थापना होणार आहे. मुख्य यात्रा ७ ते ९ डिसेंबर असे तीन दिवस भरणार आहे. खंडोबा यात्रेनिमित्त मंदिर परिसरात साफसफाई करण्यात येत आहे. भव्य सभामंडप उभारून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या रांगांची व्यवस्थेचीही पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आल्याची माहिती मंदिर विश्वस्त विजय धुमाळ यांनी दिली. यासोबतच यात्रेनिमित्त महापालिकेकडून फिरते स्वच्छतागृह, आरोग्य केंद्राची व्यवस्था मंदिर परिसरात करण्यात येणार आहे. भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार याची विशेष काळजी घेण्यात येत असून, यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडक पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहे. १०० पोलिसांसह खासगी सुरक्षा रक्षक, २०० स्वयंसेवकांचा यात समावेश असेल, असे विश्वस्तांनी सांगितले. एमआयटीकडून मंदिर मार्गावरील विद्युत खांबांवरील पथदिव्यांची दुरुस्तीची कामेही युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत. भाविकांची गैरसोय होणार नाही, याचे नियोजन महापालिका प्रशासन करत आहे.

**वाघ्या-मुरुळी सज्ज**

श्रीखंडोबा यात्रेनिमित्त महाराष्ट्रभरातून भक्तभाविक येतात. २० ते २५ वाघ्या-मुरुळीचे ग्रुपही आपली सेवा देण्यासाठी येथे दाखल होतात. एका ग्रुपमध्ये पाचपेक्षा जास्त सदस्य असतात. त्यात एक महिला असते. एक ग्रुप दिवसभरात ६ हून अधिक जागरण-गोंधळाचे कार्यक्रम सादर करतात.

-गोविंद भांडे, शिव मल्हार शक्तिशाली कला मंच, सातारा.

# उबाठा शिवसेनेच्या बैठकीमध्ये पराभवाचा ठपका काँग्रेस राष्ट्रवादीवर

नाशिक, २८ नोव्हेंबर : लोकसभा निवडणुकीनंतर झालेला विजय आणि विधानसभा निवडणुकीमध्ये झालेला पराभव यावर उबाठा शिवसेनेच्या बैठकीमध्ये चिंतन झाले आणि त्यामध्ये शिवसेनेने विधानसभा निवडणुकीमध्ये नासिक मध्ये झालेला पराभवाचे खापर हे काँग्रेस-राष्ट्रवादी वरती फोडून नाशिक मधील पराभवाला तेच जबाबदार असल्याचा आरोप केला गेला आहे दरम्यान होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आत्तापासून तयारी करण्याचा निर्धार या बैठकीमध्ये करण्यात आला.

उबाठा शिवसेनेच्या शालिमार येथील कार्यालयामध्ये उपनेते बबनराव घोलप सुनील बागुल सहसंपर्कप्रमुख दत्त गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या बैठकीत विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या पराभव का झाला यावर चिंतन करण्यात आले यावेळी सर्वांनीच आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांचे असहकार्य ईव्हीएम चा दाखलपणा पक्षातीलच काही लोकांनी केलेली गद्दारी प्रतिस्पर्धी उमेदवाराकडून निवडणुकीमध्ये पडलेला पैशाचा महापूर भाजपाकडून शासकीय यंत्रणांचा करण्यात आलेला पुरेपूर वापर या भाजपच्या कुटुनितीमुळे खूप त्रास झाला आणि त्यामुळेच उमेदवारांचे खच्चीकरण झाले त्यांच्या प्रचाराला अडथळे आणले गेले. पक्षाच्या उमेदवारांसाठी अनुकूल वातावरण होते उद्धव ठाकरे आदित्य ठाकरे संजय राऊत यांच्या सभा झाल्या त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याच्या वातावरण होतं कार्यकर्ते घरोघरी जाऊन प्रचार करत होते असं सर्व असताना अपयश का आले यावर चर्चा झाली आणि याचा सर्व ठपका हा काँग्रेस राष्ट्रवादी वरती पुण्यात आलेला आहे. या बैठकीमध्ये होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये आत्तापासूनच तयारी करण्याचा संकल्प देखील करण्यात आला असून आता पुढील तयारी कर्मचारी कार्यकर्त्यांना देण्यात आले. या बैठकीला लोकसभा संघटक बाळासाहेब पाठक निवृत्ती जाधव राहुल ताजनपुरे बाळकृष्ण शिरसाट वैभव जाधव येथील वाघ देवानंद बिरारी सचिन मराठे मामा राजवाडे महेश बडवे गुलाब भोये कुलदीप चौधरी बाळासाहेब कोकणे सचिन राणे सचिन बंडे संजय चव्हाण आदी उपस्थित होते.

## सोयगाव तालुक्यात हुडहुडी वाढली;-ऊबदार कपडे खरेदी करण्यावर भर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ नोव्हेंबर

सोयगावसह तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून अचानक थंडीत वाढ झाली आहे गुरुवारी थंडीचा कडाका सायंकाळी पाच वाजेपासून सुरू होता त्यामुळे शहरात सायंकाळी कमालीची शांतता पसरली होती ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्या होत्या त्यामुळे शेकोट्या सुरु झाल्याने जुन्या काळासारखी चावडी सुरू झाल्या चे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे.दरम्यान तालुक्यातील



ग्रामीण भागातही थंडीची वाढ झाली आहे त्यामुळे नागरिक उबदार कपडे खरेदी करण्यावर भर देत आहे.

सोयगाव सह ग्रामीण भागात वाढलेली थंडी रब्बीच्या पिकांना फायदेशीर ठरली आहे रब्बीच्या गहू,हरभरा, मका आदि पिकांना वाढी साठी थंडीची गरज आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात पिकांना पुरेशी थंडी मिळत आहे मात्र नागरिकांचा शुकशुकाट पहावयास मिळत आहे...ग्रामीण भागात शेकोट्याचे प्रमाण वाढलेले आहे.

## ६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्रवेशिकेस मुदतवाढ

मुंबई, २८ नोव्हेंबर - ६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्रवेशिकेस मुदतवाढ देण्यात आली असून निर्मात्यांनी २७ डिसेंबर २०२४ पर्यंत प्रवेशिका सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी केले आहे.

दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सेन्सॉर झालेल्या मराठी चित्रपटांच्या निर्मात्यांना या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे. यासाठी आवश्यक असणारी प्रवेशिका महामंडळाच्या षळश्रालळीूंीिलरळ.ीस या संकेतस्थळावर तसेच जनसंपर्क विभागात उपलब्ध आहे. त्यामुळे निर्मात्यांनी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह प्रवेशिका महामंडळाच्या जनसंपर्क विभागात सादर कराव्यात असे आवाहन महामंडळ प्रशासनाने केले आहे.

## दुचाकीची ट्रॅक्टरला जबर धडक, ३ युवकांचा मृत्यू

चंद्रपूर : दुचाकीने ट्रॅक्टरला दिलेल्या जबर धडकेत ३ युवकांचा मृत्यू झालाय. सावली तालुक्यातील बोथली-हिरापूर रोडवरील मार्कंडेय विद्यालयासमोर काल रात्री अपघात झाला होता. अपघातानंतर घटनास्थळी एका तरुणाचा झाला होता मृत्यू तर आज उपचारादरम्यान गडचिरोली येथे २ युवकांचा मृत्यू झालाय. तीनही युवक हिरापूर येथे नाटक पाहण्यासाठी जात असताना रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला त्यांच्या दुचाकीने जोरदार धडक दिली होती.

# फडणवीस मुख्यमंत्री झाले तर आनंदच होईल - छगन भुजबळ

पुणे, २८ नोव्हेंबर : अजित पवारांना मुख्यमंत्री करा अशी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची मागणी होती. अजित पवार आणि त्यांच्या पक्षानी देवेंद्र फडणवीस चालतील अशी भूमिका घेतली. एकनाथ शिंदे यांनी वरिष्ठ जो निर्णय घेतील तो मान्य असल्याचे सांगितले. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाबाबतच्या नावाचा तिढा आता सुटला आहे.

अशातच आमदार छगन भुजबळ यांनी पुण्यात बोलत असताना देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. भुजबळ म्हणाले, ओबीसी मुख्यमंत्री व्हावा यापेक्षा गोर गरिबांच संरक्षण करणारा मुख्यमंत्री राज्याला भेटावा ही अपेक्षा आहे. भाजपचाच मुख्यमंत्री होईल, देवेंद्र फडणवीस यांनी मागच्या काही वर्षांमध्ये काम केलं आहे. याआधी ते मुख्यमंत्री व्हायला पाहिजे होते. पण पक्षाने त्यावेळेस उपमुख्यमंत्री म्हणून काम दिलं त्यांनी काम केलं आणि झोकून काम केलं. मुख्यमंत्री



होण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांना आमच्या शुभेच्छा आहेत. दादा मुख्यमंत्री झाले तरी चांगलं आहे. पण यावेळी भाजपचे १३२ आमदार निवडून आले आहेत. म्हणून त्यांचा मुख्यमंत्री होईल फडणवीस झाले तरी आनंदच होईल. मनोज जरांगे पाटील यांच्यावर भुजबळ यांनी पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. ते म्हणाले, ईव्हीएम मशीन ने जिंकलो असेल. तर मला देखील एक लाख मत मिळायला हवी होती. माझं मताधिक्य वाढायला हवं होतं ते कमी झालं. मनोज जरांगे पाटील साहेब आदल्या दिवशी सकाळी दहा पासून रात्री दोन पर्यंत गावोगावी फिरले आणि जातिवाद पसरवण्याच काम केलं म्हणून माझं मताधिक्य कमी झालं असल्याचे त्यांनी यावेळी सांगितलं आहे. संजय राऊत टीका करतात याबाबत भुजबळ यांना विचारले असता ते म्हणाले, पाच वर्ष त्यांना काही कामं नाही म्हणुन टीकाच करावी लागणार आहे.

# आर्सेलर मित्तलचा प्रस्तावित पोलाद कारखाना लवकर सुरू करण्यासंदर्भात मुनगंटीवार यांचे निर्देश

मुंबई, २८ नोव्हेंबर : चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा येथे लक्ष्मी मित्तल समुहाच्या प्रस्तावित पोलाद कारखान्याच्या स्थापनेचा मार्ग अधिक प्रशस्त झाला असून कारखाना प्रशासनासमोरच्या अडचणी वेगाने सोडवून हा कारखाना लवकरात लवकर सुरू व्हावा यासाठी वेगाने पावले उचलण्याचे निर्देश आज सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाच्या विविध विभागांना दिले आहेत.

लक्ष्मी मित्तल समुहाचा हा प्रस्तावित पोलाद कारखाना आशियातील सर्वात मोठा पोलाद प्रकल्प ठरणार असून पोंभुर्ण्यातील पाच हजार एकर जमिनीवर या पोलाद प्रकल्पाची उभारणी होणार आहे. या कारखान्याच्या उभारणीच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींसंदर्भात आज मुंबईत



झालेल्या एका बैठकीत. ना. श्री सुधीर मुनगंटीवार यांनी हे निर्देश दिले.

लक्ष्मी मित्तल समुहाने पोंभुर्णा येथील या पोलाद प्रकल्पात चाळीस हजार कोटींची गुंतवणूक करण्याचे जाहिर केले असून मार्च २०२४ मधेच ॅडव्हांटेज चंद्रपूर या गुंतवणुक परिषदेत जिल्हा परिषदेसोबत तसा सामंजस्य करार केला आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे मिळून एकूण साठ हजार रोजगार या पोलाद प्रकल्पातून निर्माण होतील असा विश्वास आहे, असे ना. श्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

मोठा रोजगार उपलब्ध करून देणारा हा कारखाना लवकरात लवकर सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही श्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले. या बैठकीत वन विभागाचे प्रधान सचिव श्री वेणुगोपाल रेड्डी यांच्यासह अन्य वरीष्ठ अधिकारी तसेच आर्सेलर मित्तल उद्योग समुहाचे कंपनी सल्लागार श्री राजेंद्रजी तोंडापूरकर हे देखिल उपस्थित होते.

# नव्या सरकारमध्ये ज्येष्ठ नेत्यांचे पत्ते कट ?, भाजपच्या नियमामुळे इच्छुकांमध्ये धाकधुक

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२८ नोव्हेंबर : एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतून जाहीर माघार घेतल्यामुळे नव्या सरकारच्या मुहूर्तमेढ सुरळीत होत असताना भाजपा श्रेष्ठींनी घेतलेल्या निर्णयामुळे मंत्रिमंडळात समावेशासाठी इच्छुक असलेल्या ज्येष्ठ नेत्यांचे धाबे दणाणले आहे. वयाची साठी पार केलेले जास्त सदस्य त्यांना नवीन मंत्रिमंडळात स्थान देऊ नये असा आग्रह धरला आहे. त्यामुळे यापूर्वी कार्यरत असलेल्या काही मंत्र्यांचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे त्यामुळे भाजपासहित महायुतीतील तिन्ही पक्षातील ज्येष्ठ नेत्यांमध्ये धाकधूक वाढली आहे. विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर चार दिवस एकनाथ शिंदे यांचा पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळण्याचा आग्रह मोडून काढण्यात वेळ लागला. बुधवारी त्यांनी त्याबाबत जाहीर माघार घेतल्यानंतर सरकार स्थापनेच्या हालचाली वेगावल्या आणि आज तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते दिल्लीत त भाजपा श्रेष्ठींशी चर्चा करत मंत्रिमंडळाचा फॉर्मुला निश्चित करणार आहेत त्यासाठी देवेंद्र फडणवीस , अजित पवार आज सकाळीच दिल्लीला रवाना झाले तर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सायंकाळी उदय सामान यांच्या समवेत रवाना झाले. रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शाह , भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेणार आहे. शाह यांच्या निवासस्थानी होणाऱ्या बैठकीत मुख्यमंत्रिपदासाठीचा नेता, खातेवाटप व कोणत्या पक्षाला किती मंत्रीपदे ?याबाबत निश्चितता केली जाणार आहे त्यानंतर नेते शुक्रवारी मुंबईत परतणार असून एक किंवा दोन डिसेंबरला शपथविधी केला होणार आहे ,अशी सूत्रांची माहिती आहे.

नव्या सरकारमध्ये तरुण चेहऱ्यांना जास्तीत जास्त संधी द्यावी असे भाजपा श्रेष्ठींचा निर्धार आहे त्यामुळे वयाची ६० पूर्ण केलेल्या काही ज्येष्ठ नेत्यांचे पत्ते कट होणार आहे.

दरम्यान, आज सकाळपासून देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर आमदारांची रिघ लागली होती. अनेकजण फडणवीस यांना शुभेच्छा व अभिनंदन देण्याच्या पाहण्याने आपली फिल्डिंग लावत होते.

भाजपला सर्वाधिक २१ मंत्रिपदे

विधानसभेच्या निकालानंतर आता मुख्यमंत्रिपदापासून मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युलावर देखील महायुतीमध्ये चर्चा सुरु झाली आहे. महायुतीमध्ये मंत्रिमंडळाचा अंदाजित फॉर्म्युला २१-१२ व १० असा असू शकतो. यात भाजपला सर्वाधिक २०/२२ त्यानंतर शिवसेनेला १० ते १२ आणि राष्ट्रवादीला ९ते १०मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. ही प्राथमिक चर्चा असून यामध्ये प्राथमिक केलेली वाटाघाटी असल्याचं सांगण्यात येत आहे.

# दुचाकीवरून खाली पडलेल्या युवकाच्या अंगावरून बस गेली

वर्धा : आर्वी येथील सावळापूर गावात दोन दुचाकीचा अपघात झालाय. या अपघातादरम्यान अपघातात दुचाकीवरून खाली पडलेल्या युवकाच्या अंगावरून बस गेल्याने एकाचा जागीच मृत्यू झालाय. तर दुसऱ्या दुचाकीवरील जखमी तरुणाचा रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सावळापूर येथे दोन दुचाकीची समोरासमोर धडक झाली. यामध्ये एक दुचाकीस्वार खाली पडला, दरम्यान मागून येणाऱ्या बसचे चाक त्याच्या अंगावरून गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना प्रत्यक्ष डोळ्याने पाहणाऱ्या अपघातातील दुसऱ्या दुचाकीवरील जखमी दुचाकीस्वार रुग्णालयात दाखल झाला. पण घटना पाहूनच या दुचाकीस्वाराला धक्का बसल्याने त्याचा रुग्णालयात मृत्यू झाला आहे.

चंद्रपुरात दोन ट्रकची समोरासमोर धडक, ड्रायव्हरचा मृत्यू

चंद्रपूर जिल्ह्यात भरधाव वेगात असलेल्या दोन ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने एका ड्रायव्हरचा मृत्यू झालाय तर एक जण जखमी झालाय. कोठारी-गोंडपिपरी मार्गावरील देवई फाट्याजवळ हा अपघात झाला असून अपघातात दोन्ही ट्रकचं मोठं नुकसान झालं. या अपघातात दोन्ही ट्रकची डिझेल टँक फुटल्यामुळे रस्त्यावर सर्वत्र डिझेल पसरलं होतं, त्यामुळे दोन्ही ट्रक पेट घेण्याची शक्यता असल्याने अग्निशमन दलाचे वाहन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या अपघातामुळे अहेरी-चंद्रपूर मार्गावरील वाहतूक काही वेळ खोळंबली होती मात्र कोठारी पोलीसांनी घटनास्थळी पोहोचत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे ५ व ६ डिसेंबर रोजी आयोजन

अहिल्यानगर, दि.२८ - जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा केंद्र यांच्यामार्फत सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय येथे ५ व ६ डिसेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून महोत्सवात सहभागासाठी ३ डिसेंबर पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर यांनी केले आहे.

या जिल्हास्तर युवा महोत्सवात संकल्पना आधारित बाबींमध्ये 'विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना' हा विषय आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत समूह लोकनृत्यासाठी वेळ मर्यादा १५ मिनीटे असून सहभागी कलाकार आणि वादकांची संख्या १० असावी. लोकगीत सादरीकरणासाठी ७ मिनीटे वेळमर्यादा असून पथकातील सहभागी कलाकार आणि वादकांची संख्या १० असावी. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत कथालेखनासाठी एक हजार शब्दमर्यादा आणि १ तास वेळमर्यादा राहील. कथा पूर्वी प्रसिद्ध झालेली नसावी.

चित्रकलेसाठी वेळ मर्यादा दीड तास असून ए-३ आकाराच्या कागदावर चित्र काढण्याची मुभा राहील. वक्तृत्व स्पर्धेसाठी ३ मिनीटे वेळ असून हिंदी व इंग्रजी भाषेत आवडत्या विषयावर विचार मांडता येतील. कविता लेखनासाठी शब्द मर्यादा ५०० शब्द आणि वेळ मर्यादा एक तास राहील. साहसी उपक्रम, आरोग्य, युवकांसाठी विशेष कार्यक्रम, सामाजिक कार्यक्रम आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांची यूथ आयकॉन म्हणून निवड करण्यात येणार आहे. युवांनी या क्षेत्रातील आपल्या कार्याची माहिती २०० शब्दात पूर्ण पत्त्यासह द्यावी.

जिल्हास्तर युवा महोत्सवात प्राविण्य प्राप्त केलेला संघ आणि युवा कलाकार यांना प्रावीण्य प्राप्त केल्यानुसार विभागस्तरावर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल. त्यानुसार विभागावर प्रावीण्य प्राप्त झाल्यास राज्यस्तरावर व राज्यस्तरावरून प्रावीण्य प्राप्त केल्यास राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. तसेच प्रत्येक स्तरावर प्रावीण्य प्राप्त झाल्यास शासनाकडून प्रावीण्य प्राप्त युवा कलाकार किंवा युवा संघास रोख पारितोषिक, सहभाग व प्रावीण्य प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

जिल्हा युवा महोत्सवात १२ जानेवारीपर्यंत वय १५ ते २९ वर्षे असलेले युवक व युवती सहभागी होवू शकतील. जन्मतारखेबाबत सबळ पुरावा म्हणून जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे. तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचा रहिवासी असल्याबाबतचे आधारकार्ड किंवा रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करिता नाव नोंदणी बाब निहाय https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLScxEx3fXNasDGTMWvj-X9wS3Tq2e-HOmZVQRNfTCOXcRL-pXw/viewform या लिंकवर दि. ३ डिसेंबर पर्यंत करावी. विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाडिया पार्क, अहिल्यानगर येथे कार्यालयात प्रत्यक्ष किंवा वीरहाशवपरसरी०१सारळश्र.लो या ई-मेलवर पाठविण्यात यावा.

अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरंगे (९८३४११५२५५) व प्रा.सॅम्युअल वाघमारे (८७८८४१२७८०) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी केले आहे.

# संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# हिंदूंवरील अत्याचारांकडे बांगलादेशी डोळेझाक

बांगलादेशातील हिंदूंना प्रताडित करण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. यावरून जगभरातील हिंदूंनी आवाज उठवला आहे. भारतात तर त्याविरुद्ध आवाज उठवून, तेथील हिंदूंना न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तथापि, बांगलादेशचे विद्यमान सरकार हिंदू कसे कचाट्यात सापडतील, त्यांच्याविरुद्ध गुन्हे कसे दाखल होतील, त्यांना तुरुंगवासाची हवा कशी दाखवली जाऊ शकेल, हिंदूंना देशद्रोही कसे ठरवले जाऊ शकेल, याच प्रयत्नात आहे. खरे तर जगाच्या पाठीवर जिथे कुठे हिंदू आहेत तेथे ते अतिशय शांतपणे आपली नोकरी अथवा व्यवसाय, त्या-त्या देशातील कायद्यानुसार आणि त्या देशातील घटना प्रमाण मानून करीत आहेत. हिंदू समाजाच्या शांतता आणि सामाजिक सौहार्दतेचा गुण ध्यानात घेऊनच अनेक देशांत हिंदूंचे निरनिराळे सण मोठ्या प्रमाणात साजरे व्हायला लागले असून, हिंदूंना आपल्या धर्मानुसार पूजा पद्धतीचा अधिकार दिला गेला आहे. जगाच्या इतिहासाचा धांडोळा घेतल्यास हिंदूंचे त्या त्या देशाच्या विकासात आणि आर्थिक प्रगतीत मोलाचे योगदान असल्याचे स्पष्ट होते. पण बांगलादेशातील मुस्लिम नागरिक आणि तेथील इस्लामी शासक हिंदूंना पूजा पद्धतीचे स्वातंत्र्य देण्यास कुचराई करीत आहे. एवढेच कमी की काय, म्हणून हिंदूंवरील अत्याचारांकडे डोळेझाक करण्याचे कामही करीत आहे. अनेक प्रकरणे उघडकीस आली असून त्यातील नुकतेच घडलेले एक प्रकरण नमुन्यादाखल चर्चेला घ्यायला हवे. हिंदू समाजात जनजागृती करणारे आणि देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेले बांगलादेशमधील हिंदू नेते चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांना बांगलादेशमधील न्यायालयाने जामीन नाकारून त्यांची रवानगी तुरुंगात केली आहे. त्यांच्या अटकेविरोधात चितगाव आणि ढाक्यात आंदोलने उभी राहिली नसती तरच नवल. भारतीय आंदोलकांनी रस्त्यारस्त्यांवर धरणे आणि घोषणा देत चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांच्या सुटकेची मागणी केली आहे. भारताने या घटनेवर गंभीर चिंता व्यक्त केली असून, हिंदूंसह सर्व अल्पसंख्यकांच्या सुरक्षेची हमी बांगलादेशने द्यावी, अशी मागणी केली आहे. तथापि, त्यांच्या अटकेबाबत भारतातील धर्मनिरपेक्ष राजकीय पक्षांच्या नेत्यांनी साधलेली चुप्पी अनाकलनीय आहे. बांगलादेशात काही वावगे घडतच नाही, अशी स्वतःची धारणा त्यांनी बनवून टाकली आहे.

बांगलादेश पोलिसांनी सोमवारी चिन्मय कृष्णा दास ब्रह्मचारी यांना ढाक्यामधील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातून अटक केली. सम्मिलित सनातनी जोत या हिंदू संघटनेचे नेते असलेले दास चितगावकडे जात होते. त्यांच्यासह १८ जणांविरोधात ३० ऑक्टोबर रोजी खटला दाखल करण्यात आला आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या नेत्याने त्यांच्याविरोधात तक्रार केली आहे. २५ ऑक्टोबर रोजी हिंदू समुदायाच्या रॅलीदरम्यान बांगलादेशच्या राष्ट्रीय ध्वजाचा अपमान केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. शेख हसीना सरकार कोसळल्यापासून ५० जिल्ह्यात हिंदू अल्पसंख्यकांवर २०० हून अधिक हल्ले झाले आहेत. सध्या शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतला आहे. भारताने दास यांच्या अटकेच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त करून बांगलादेश सरकारकडून हिंदूंसह सर्व अल्पसंख्यकांच्या सुरक्षेची हमी मागितली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन प्रसिद्ध केले असून, त्यानुसार बांगलादेशात हिंदूंची कशी गळचेपी होत आहे, याकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. देशातील सत्तापरिवर्तनानंतर हिंदू आणि इतर अल्पसंख्यकांवर बांगलादेशमधील अतिरेकी घटकांकडून हल्ले करण्यात आले आहेत. अल्पसंख्यकांची घरे आणि व्यावसायिक आस्थापनांची जाळपोळ आणि लूटमारीच्या अनेक घटना नोंदविल्या गेल्या आहेत. तसेच, बांगलादेशमधील मंदिरांत चोरी आणि देवतांच्या विटंबनेच्या घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने या घटनांतील दोषी मोकाट फिरत आहेत आणि वैधानिक मार्गाने शांततापूर्ण मागणी करणाऱ्या धार्मिक नेत्यांविरुद्ध आरोप केले जात आहेत. विशेष बाब म्हणजे दास यांच्या अटकेच्या निषेधार्थ शांतिपूर्ण निदर्शने करणाऱ्या अल्पसंख्य समाजाच्या लोकांवरही हल्ले होत असून, त्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलिस प्रशासन बिचकत आहे. शांतिपूर्ण निदर्शकांवरच अवैध मागण्या करीत असल्याचे आरोप जडले जाऊ लागले आहेत. दास यांच्या अटकेबाबत इस्कॉनने भारत सरकारकडे मागणी करून त्यांच्या सुटकेचा मुद्दा बांगलादेशच्या सरकारपुढे उपस्थित करण्याची विनंती केली आहे. इस्कॉनची मंदिरे अनेक देशांत उभारली गेली असून ती वास्तुकलेचा नमुना म्हणूनही ओळखली जातात. विविध देशांतील भिन्नधर्मीय लोक इस्कॉन चळवळीशी आपले नाते जोडून, श्रीकृष्ण भक्तीतून आत्मिक सुखाचा आनंद घेत आहेत. कुठल्याच देशात इस्कॉनचा संबंध दहशतवादाशी जोडला गेल्याचे उदाहरण नाही. याउपरही बांगलादेशातील एका नेत्याने केलेल्या आरोपावरून इस्कॉनच्या एका प्रभावशाली नेत्याला अटक होणे, ही बाब दुर्दैवीच म्हटली जायला हवी.

बांगलादेश आता पाकिस्तानी आयएसआयच्या कचाट्यात पुरता सापडला असून, त्याने देशात वेगाने इस्लामी कायदे लावण्याचा सपाटा लावला आहे. स्वातंत्र्यापूर्वी या देशात अस्तित्वात असलेल्या हिंदूंची संख्या घटून काही लाखांपर्यंत मर्यादित झाली आहे. माजी पंतप्रधान शेख हसीना सत्ताच्युत झाल्यानंतर तेथील परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. देशात विकास आणि पायाभूत सुविधांची निर्मिती होण्याऐवजी त्याच्याभोवतीची जिहादी उन्मादी तत्त्वांची मगरमिठी अधिकच घट्ट होत चालली आहे. येत्या काळात पाकिस्तानप्रमाणे बांगलादेशालाही भिकेचे डोहाळे लागले तर नवल वाटून घेऊ नये. पाकिस्तानात ज्याप्रमाणे ईशनिंदेचा दानवी कायदा अस्तित्वात आहे, त्याच धर्तीवर येथेही इस्लाम आणि मोहम्मद पैगंबराबाबत टीका-टिप्पणी करणाऱ्याला मृत्यूची शिक्षा देण्याची तरतूद करण्याची तयारी सुरू झाली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे पाकिस्तानप्रमाणेच येथेही या नव्या येणाऱ्या कायद्याच्या आडून अल्पसंख्यक हिंदूंना प्रताडित केले जात आहे. बांगला सरकारच या कायद्याबाबत गांभीर्याने विचार करीत आहे, असे नसून बांगलादेश उच्च न्यायालयाच्या एका पीठानेही याबाबत एक निर्णय देऊन, कुराण तथा मोहम्मद पैगंबराबाबत विनाकारण भडकाऊ टिप्पणी करणाऱ्याला मृत्युदंड द्यायला हवा, असे मत नोंदविले आहे. संसदेने याबाबत विचार करावा, अशी शिफारस खंडपीठाने केली आहे. त्यामुळे इस्लामविरोधासाठी मृत्युदंडाचा कायदा येत्या काळात तेथे अस्तित्वात येईल, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. न्यायालयाने अशा प्रकारचे मत नोंदविणे, याकडे बांगलादेशच्या संपूर्ण इस्लामीकरणाचा घाट, या दृष्टीने बघितले जाऊ लागले आहे. युनूस यांच्या अंतरिम सरकारने यापूर्वीच इस्लामीकरण आणि शरिया कायद्याच्या अस्तित्वाचे संकेत दिलेले आहेत. यातूनच तेथील कट्टर मुस्लिम आणि पाकिस्तानी आयएसआयच्या कात्रीत सापडलेल्या सरकारलाही हिंदूंच्या रक्ताची चटक लागलेली आहे. शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकल्यानंतर देशातील जिहाद्यांनी सर्वत्र जो हैदोस घातला तो जगाने अनुभवला आहे. हिंदूंची घरे जाळून टाकणे, हिंदू कलाकारांना मारझोड करून त्यांच्या घरांची लुटालूट करणे, हिंदू मुली-बायका यांच्यावर सामूहिक अत्याचार, हिंदू परिवारांना त्यांच्या घरातून हाकलून लावत त्यांच्या संपत्तीचा कब्जा घेणे, या प्रकारांकडे हताशेने बघण्यापलीकडे भारत काहीही करू शकलेला नाही. बांगलादेशातील अंतरिम सरकारने देशात सौदी अरबमधील मदीना मशिदीप्रमाणे मोठी मशीद उभारण्याचे सुतोवाच केले आहे. त्यामुळे आता बांगलादेशात धर्मनिरपेक्षता या शब्दाचा उच्चार करणेही धोक्याचे ठरणार आहे. बांगलादेशात अमेरिकेतील वोकिझमचा पुरस्कार करणाऱ्यांचे युनूस सरकार सत्तेत असून, या सरकारने दास यांच्या अटकेच्या निमित्ताने देशाच्या पुढच्या हिंसक प्रवासाची नांदी दिली आहे. देशातील कायदे, फौजा, पोलिस, विद्यापीठे आणि प्रशासन सरकारच्या नियंत्रणात असल्याचा देखावा निर्माण केला जात असला, तरी या यंत्रणांच्या चाव्या प्रत्यक्षात इस्लामी उन्मादींच्या हाती असल्याच्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही. दास यांची अटक प्रातिनिधिक म्हणत, भविष्यात होणाऱ्या कठोर हल्ल्यास सामोरे जायची तयारी हिंदू समुदायाने ठेवायला पाहिजे.

## इतस्ततः

डॉ. विवेक राजे

# रडणे ईव्हीएमवर

हरयाणा आणि जम्मू-काश्मीर मागोमाग झारखंड, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश (पोटनिवडणूक) राज्य विधानसभा निवडणुकांचे निकाल लागले. लागलीच काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी आपला 'ईव्हीएम' राग आळवायला सुरुवात केली. २०१४ पासून काँग्रेस प्रत्येक निवडणूक पराभवानंतर हे रडगाणे नित्यनेमाने गात असते. कारण काँग्रेसला काही झाले तरी आपली धोरणे चुकताहेत; किंबहुना स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासूनच चुकताहेत, हे मान्य करायचे नाही. गांधी-नेहरू घराण्याची एकाधिकारशाही सोडायची नाही. सगळ्याच राज्यकर्त्या कुटुंबात जन्माला येणारी तिसरी-चौथी पिढी ही कर्तृत्वहीन निपजते, हे त्रिकालाबाधित सत्य मान्य करून पक्षांतर्गत खरी लोकशाही या पक्षाला स्थापित करावयाची नाही. हिंदुहिताची धोरणे वारंवार पराभूत होऊनही आखायची नाहीत आणि या हिंदुस्थानातील अस्सल हिंदू संस्कृती आपली म्हणायचीदेखील नाही. माणसाला रस्ते, वीज, पाणी, पैसा या पलीकडे सामूहिक आणि सांस्कृतिक सुरक्षा व या गोष्टींचा विकास हवा असतो, हे समजूनही घ्यायचे नाही. आपल्या पूर्वजांनी आपल्याला दिलेल्या खऱ्या वारस्याचे जतन करायचे असते, हेही लक्षात घ्यायचे नाही. गांधींनी सांगितलेल्या बेगडी तत्त्वज्ञानावरच गुजराण करायची असेल तर फारच फार दोन एक पिढ्या करू शकतात, हेही ध्यानात घ्यायचे नाही. भाकरी फिरवावी लागते हे तोंडाने फक्त बोलत राहायचे; प्रत्यक्षात कृती मात्र करायची नाही. मग दोष देण्यासाठी लोकशाही व्यवस्थेत उरते फक्त ईव्हीएम...

भारतीय निवडणुकांत ईव्हीएमचा वापर सुरू होऊन आता ४० वर्षे झाली. अनेकांनी अनेकदा या मशीन्सच्या कार्यपद्धती आणि संपूर्ण सुरक्षिततेची हमी देऊन झाली आहे. सर्वोच्च न्यायालयानेदेखील या मशीन्सचा अभ्यास करून त्या सर्व दोषांपासून मुक्त असल्याचा निर्वाळा दिला आहे. निवडणूक आयोगाने तर काही वर्षांपूर्वी ते मशीन हॅक करून दाखवावे म्हणून खुले आव्हान दिले होते. तेव्हाही या पृथ्वीवरील कोणीही माईचा लाल हे मशीन हॅक करण्याचे आव्हान स्वीकारायला पुढे आला नव्हता, हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतात अनेक वर्षे कागदी मतपत्रिकेच्या साहाय्याने निवडणुका घेतल्या गेल्या. परंतु प्रक्रिया अत्यंत खर्चीक, संथ, अपारदर्शक आणि पर्यावरणास प्रतिकूल होती. त्यामुळे भारतीय निवडणूक आयोगाने 'ईव्हीएम'चा वापर निवडणुकांत करण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला मर्यादित प्रमाणात आणि प्रायोगिक स्तरावर या मशीन्सचा वापर केल्यानंतर लोकसभा निवडणूक-२००४ पासून लोकसभा आणि राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशीन्सचा पूर्णपणे वापर सुरू झाला. २००४ च्या निवडणुकीत भाजपाचा पराभव करून काँग्रेसचे डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान झाले. त्यानंतर २००९ मध्येदेखील काँग्रेस लोकसभेच्या निवडणुकीत यशस्वी झाली. या दोन्ही वेळेस काँग्रेस वा विरोधी पक्षाला ईव्हीएम मशीन्स सुरक्षित वाटत होत्या. त्या हॅक होण्याची कोणतीही शक्यता हाच पक्ष फेटाळून लावत होता. देशात निवडणूक आयोगाचे गठन करण्यात आले तेव्हा काँग्रेस पक्षच सत्तेवर होता. निवडणूक आयुक्तांची संख्या एकवरून तीनवर नेली तेव्हादेखील काँग्रेस पक्षच सत्तेवर होता. ईव्हीएम मशीन्सचा सरसकट वापर या देशात सुरू झाला तेव्हाही काँग्रेस पक्षच सत्तेत होता, हे लक्षात घेतले पाहिजे. या ईव्हीएम मशीन्सचा जेव्हा २००४ मध्ये पहिल्यांदा लोकसभेच्या निवडणुकीत सरसकट वापर केला गेला, तेव्हा फक्त एकदा आणि एकदाच लालकृष्ण अडवाणी यांनी या मशीन्सवर संशय व्यक्त केला होता. पण त्यानंतर कधीही भाजपाचा कोणताही नेता आपल्या पराभवाचे खापर ईव्हीएम मशीन्सवर फोडताना पाहिलेला नाही. भारतातील बहुतेक राजकीय पक्षांनी विचारधारेशी बांधिलकी केव्हाच सोडून दिलेली आहे तसेच राजकीय पक्षांच्या नेत्यांना चारित्र्य या विषयाशी काहीही देणे-घेणे राहिलेले नाही. समाजजीवनात, त्यातही राजकीय भूमिका निभावताना भारतासारख्या बहुधर्मीय देशात, प्रमुख धर्मांची काही माहिती, अभ्यास असावा, असेही यांना वाटत नाही. अनेक पक्षांच्या सल्लागारांना पक्षाला या ना त्या मार्गे सत्तेवर कसे येता येईल, एवढाच विचार करता येतो, असे समजण्यास जागा आहे. कारण निवडणूक आयोगासारख्या स्वतंत्र आणि निःपक्ष संस्थेविरुद्ध आपण ईव्हीएमच्या नावे जेव्हा गळे काढतो, तेव्हा बदनाम करीत असतो, याचेही भान राहिलेले दिसत नाही. कोणतेही संघटनात्मक काम करायचे नाही. लोकांमध्ये मिसळून त्यांचे प्रश्न समजून घेऊन सनदशीर मार्गाने त्यांची सोडवणूक करण्यासाठी ही राजकीय मंडळी आणि त्यांचे संधिसाधू पक्ष प्रयत्न करताना दिसत नाहीत. म्हणजे विचारांवर निष्ठा नाही, विचारधारेशी बांधिलकी नाही, लोकांच्या प्रश्नांविषयी संवेदनशीलता नाही, समाजाप्रति उतराईची भावना नाही; मग मिळेल ती संधी साधून सत्ता पदे मिरवणारे हे राजकीय पक्ष सातत्याने सोयीस्कर पवित्रा घेत राहतात आणि ईव्हीएम मशीन्सवर आपल्या पराभवाचे खापर फोडण्यात धन्यता मानताना दिसतात. पराभूत होणाऱ्या राजकीय पक्षांनी सातत्याने घेतलेल्या आक्षेपांमुळे २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएम मशीन्सच्या वापरात कागदी चिठ्ठीचादेखील वापर करून एक प्रकारे आपण देत असलेले मत आपल्या इच्छित उमेदवारालाच मिळत असल्याची खात्री देणारी दृश्य यंत्रणा देण्याचे निवडणूक आयोगाला निर्देश दिला. त्याप्रमाणे मतदान करताच मतदाराला मतदान निर्देशक कागदी पत्रिकेद्वारे मत निश्चिती देणारी यंत्रणा (व्हीव्हीपीएटी) ईव्हीएम मशीन्सला संलग्न करण्यात आली. आता प्रत्येक मतदार आपण केलेले मतदान या मशीन्समधील छोट्या खिडकीतून पडणाऱ्या कागदी मतपत्रिकेवर पाहून खात्री करून घेऊ शकतो. जर यात गफलत किंवा काही चूक होत असेल तर मतदाता लगेच आक्षेप घेऊ शकतो. तसेच प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी एक अभिरूप मतदान सर्व मतदान केंद्रांवर विविध पक्षांच्या उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोर घेण्यात येते. भारतीय निवडणूक आयोगाने या आधीदेखील ईव्हीएम मशीन्स या दोषरहित असल्याचा निर्वाळा अनेकदा दिला आहे. तरी जर दरवेळी पराभूत होणारे पक्ष ईव्हीएम मशीन्सवर संशय घेत असतील तर याला पक्षीय अभिनिवेशातून येणारा बेजबाबदार रडीचा डावच म्हटले पाहिजे.

महाराष्ट्र, झारखंड विधानसभा निवडणूक निकाल लागताच महाराष्ट्रातील काही दरबारी राजकारण्यांनी पुन्हा ईव्हीएमच्या नावाने रडगाणे सुरू केले. झारखंडचे निकाल केंद्रातील सत्ताधारी भाजपाच्या विरोधात तर महाराष्ट्रातील निकाल भाजपा महायुतीच्या बाजूने लागले आहेत. काँग्रेस आघाडीचे ५० आमदार निवडून आले आहेत. मग जिथे काँग्रेस आघाडीचे उमेदवार निवडून आले तेथेदेखील ईव्हीएम मशीन्स हॅक केले होते, असे म्हणावे लागेल. एका नेत्याने तर पुन्हा मतपत्रिकेच्या माध्यमातून निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी केली आहे. आपल्या पक्षाची ध्येयधोरणे येथील सर्वसामान्य माणसाच्या इच्छा-आकांक्षाशी सुसंगत न बनवता, समाजमनाचा धांडोळा न घेता, पराभवाची खरी कारणे समजून न घेता, हे राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते आज दोन दशके स्वतंत्र आणि निःपक्ष असलेल्या आपल्याच देशाच्या व्यवस्थेवर संशय घेत आहेत. निःपक्ष निवडणूक आयोग आणि निर्दोष ईव्हीएम मशीन्सला धोपटण्यापेक्षा या पक्षांनी खऱ्या अर्थाने भाकरी फिरवण्याची वेळ आलेली आहे, हेच सर्वसामान्य मतदार वारंवार सांगतो आहे. पण राजकीय पक्षांच्या बौद्धिक दिवाळखोरीच्या या काळात 'लक्षात कोण घेतो?'

९८८१२४२२२४

## वेध

नीलेश जोशी

# ईव्हीएममधून उमटला 'राष्ट्रभक्तीचा हुंकार'

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे' असे म्हटले होते. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने सावरकरांच्या विधानाची विशेष आठवण होते. लोकसभा निवडणुकीत देशभर 'संविधाना'बाबतच्या खोट्या गोष्टी रेटून सांगत जनमानसात भीती निर्माण करणाऱ्यांना तेव्हा यश मिळाले. आपली क्लृप्ती खोटी का असेना, पण यशस्वी ठरल्याच्या आनंदात ही मंडळी होती. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्रात आरक्षणाच्या नावावर जाती-जातीत फूट पाडण्याचे षडयंत्र उपयोगी ठरत असल्याच्या उकळ्या सत्ताकांक्षींना फुटत होत्या. दुसरीकडे गठ्ठा मतदानासाठी तुष्टीकरणाची परिसीमा ओलांडल्याचे चित्र होते. केवळ सत्ता आणि त्यातून पैसा हाच एकमेव उद्देश असणाऱ्यांना एकसंध समाज, देव, देश याच्याशी काहीच देणे-घेणे नसल्याचे दिसून येत होते. पण ज्यांच्या जीवनात देव, देश आणि धर्म याला प्राधान्य आहे, राष्ट्र प्रथम हा ज्यांच्या जीवनाचा मंत्र आहे असा बहुसंख्य समाज या सर्व प्रकाराने अस्वस्थ होता. त्यांची ही अस्वस्थता समाजातील सजग प्रहरींनी ओळखली आणि त्यानंतर राष्ट्रभक्तीच्या निखाऱ्यावर फुंकर घालण्याच्या कामाला सुरुवात झाली. त्यातूनच उठलेला राष्ट्रभक्तीचा हुंकार म्हणजेच नुकताच लागलेला महाराष्ट्र विधानसभेचा निकाल. आता हा निकाल अनेकांना अनाकलनीय, राक्षसी बहुमत वाटत आहे. पण संविधानाबाबतच्या खोट्या गोष्टी, जाती-जातीत दुही निर्माण करणारी नीती आणि कृती तर गठ्ठा मतांसाठी तुष्टीकरणाचा कळस गाठणारे 'मी तुमच्या देवांचा बाप आहे' असे म्हणणारे या निकालासाठी जबाबदार नाहीत का?

महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांचा असल्याची उजळणी करणाऱ्या व स्वतःला तथाकथित धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्या राजकारण्यांची कृती आणि उक्ती किती फोल आहे, याचेही दर्शन या निवडणुकीच्या माध्यमातून झाले तर स्वतःला हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्यांचा खोटारडेपणा प्रकर्षाने पुढे आला. कोण कुठला तो सज्जाद नोमानी नावाचा विकृत येथे येऊन गठ्ठा मतदान एका बाजूने करा, जे असे करणार नाहीत त्यांच्यावर बहिष्कार टाका, अशी चित्रफीत प्रसारित करतो. दुसरीकडे हाच नोमानी मराठा आंदोलनाच्या प्रमुखाला भेटून एकत्र येत हिंदुत्वाला पराजित करण्याची भाषा बोलतो तर उलेमा संघटना १७ मागण्यांचे पत्र देतात. त्यात दंगलीतील गंभीर गुन्ह्यातील आरोपींना सोडून देणे, रा. स्व. संघासारख्या देशभक्त संघटनेवर बंदी आणण्यासहित विविध मागण्या होत्या. या मागण्यांबाबत सकारात्मक पाठिंब्यांची पत्रे स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या राजकीय पक्षांनी दिली. यातील कोणती बाब संवैधानिक होती? संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी जणू आमचीच असा टेंभा मिरविणाऱ्यांना येथे संविधानाच्या पावित्र्याचे भान नव्हते का? एकीकडे तुष्टीकरणासाठी मुस्लिमांसमोर गुडघे टेकविणारे दुसरीकडे मात्र, औरंगजेब, अहमद शाह यांचे उदात्तीकरण करताना अहल्यादेवी, संभाजीराजे यांनादेखील नाकारत असल्याचे दिसून आले. व्होट जिहाद, वक्फ बोर्ड आणि लव्ह जिहाद या सर्वच बाबींनी क्षुब्ध झालेला बहुसंख्य हिंदू समाज निवडणूकनिमित्ताने ईव्हीएममधून व्यक्त झाला. हिंदू आणि हिंदुत्वाशी नाळ तुटलेल्यांना मग हा निकाल अनाकलनीय वाटायला लागला.

लोकसभा निवडणुकीपासूनच खोट्या गोष्टी पसरवून भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केवळ 'हिंदुत्व' पराभूत व्हावे या हेतूने केला गेला. खरं म्हणजे निवडणूक ही राजकीय पक्षांमध्ये लढली जाते. पण असे असताना स्वतःला सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार म्हणविणारे अनेक जण केवळ हिंदू विचार संपावा म्हणून इरेस पेटले. या सर्वांनीच अक्षरशः अनेक षडयंत्र रचले. हिंदूंमधील जाती व्यवस्थेचा फायदा घेत जाती-जातीत भांडणे लावण्याचा प्रयत्न केला. संविधान नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याची खोटी आरोळी ठोकली. त्यावरही कळस म्हणजे मुस्लिमांचे गठ्ठा मतदान व्हावे असा अजेंडा राबविला. अर्थातच हा केवळ सत्ताकांक्षेसाठी केलेला डाव होता. हा डाव सर्वप्रथम हरयाणात हाणून पाडण्यात आला. यासाठी राष्ट्रभक्त समविचारी संघटना, व्यक्तींनी सूक्ष्म नियोजन केले. मनामनात असलेल्या देव, देश आणि धर्म या विचाराला फुंकर घातली. एवढेच नव्हे, तर देशहितासाठी १०० टक्के मतदान व्हावे म्हणून लाखो अराजकीय कार्यकर्ते कुठल्याही स्वार्थाशिवाय २० तारखेच्या सायंकाळपर्यंत कार्यरत होते. याचेच फलित म्हणजे ईव्हीएममधून उठलेला राष्ट्रभक्तीचा हुंकार. आता काहींना तो अनाकलनीय तर काहींना राक्षसी वाटत असेल तर त्याला सामान्यजनांचा नाईलाज आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# झारखंड निवडणूक निकालाचा अन्वयार्थ



झारखंड आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुका आटोपल्या. दोन्ही राज्यांतील निकालात काही साम्य आहे. पहिले म्हणजे दोन्ही राज्यांतील सत्ताधारी आघाड्या आपली सत्ता कायम ठेवण्यात यशस्वी ठरल्या. महाराष्ट्रात महायुतीने नेत्रदीपक यश मिळविले, तर झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वात इंडिया आघाडीने बहुमत मिळविले. दोन्ही राज्यांतील निकालाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या दोन्ही राज्यात लाडकी बहीण योजनेचा प्रभाव पडला. महाराष्ट्रात ही योजना 'लाडकी बहीण' नावाने, तर झारखंडमध्ये ही योजना 'मईया सन्मान योजना' नावाने राबविण्यात आली. झारखंडमध्ये ही योजना सुरू करताना सुरुवातीला एक हजार रुपये लाडक्या बहिणींच्या खात्यात टाकण्यात आले; निवडून आल्यानंतर ही राशी २५०० रुपये करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या सरकारने दिले. महाराष्ट्रात या योजनेतून महिलांना १५०० रुपये मिळाले. महायुतीची सत्ता आल्यानंतर ही राशी २१०० रुपये करण्याचे आश्वासन देण्यात आले.

या दोन राज्यांतील निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काँग्रेस पक्षाला दोन्ही राज्यांत प्रत्येकी १६ जागा मिळाल्या. झारखंडमध्ये २०१९ मध्येही काँग्रेसला १६ जागाच मिळाल्या होत्या. गमतीचा भाग म्हणजे दोन्ही राज्यांतील मुख्यमंत्री दाढीधारी होते. इंडिया आघाडीत असणाऱ्या राजदने या निवडणुकीत पाच जागा जिंकल्या. विशेष म्हणजे बिहारमध्ये झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीत राजदला एकही जागा जिंकता आली नाही. झारखंडमध्ये काँग्रेस असो की राजद, त्यांना जे यश मिळाले, त्यात त्यांचे फारसे कर्तृत्व नाही. झामुमोचे मित्रपक्ष म्हणून मतदारांनी त्यांना पसंती दिली. झारखंडमध्ये झामुमोचे हेमंत सोरेन यांचा शपथविधी २८ नोव्हेंबरला होत असताना महाराष्ट्रात मात्र महायुतीच्या मुख्यमंत्र्याची अद्याप निवड झाली नाही.

निवडणुकीच्या काही महिने आधी राज्यातील भूखंड घोटाळ्यात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक झाली, त्यांना तुरुंगातही जावे लागले. अटक होण्यापूर्वी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत सोरेन यांनी या पदाची प्रतिष्ठा कायम राखली. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याप्रमाणे धुळीस मिळविली नाही. पाच-सहा महिने तुरुंगात राहिल्यानंतर सोरेन यांची जामिनावर सुटका झाली. तुरुंगात जाण्याच्या अगोदर सोरेन यांनी आपल्या जागी आपल्याच पक्षातील ज्येष्ठ नेते चम्पई सोरेन यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली. जामिनावर बाहेर आल्यानंतर हेमंत सोरेन यांनी चम्पई सोरेन यांना हटवून मुख्यमंत्रिपद स्वतःकडे घेतले. यामुळे नाराज होत चम्पई सोरेन यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला होता.

झामुमोचे संस्थापक शिबू सोरेन यांचे ज्येष्ठ पुत्र दुर्गा सोरेन यांचे काही वर्षांपूर्वी आकस्मिक निधन झाले. तोपर्यंत दुर्गा सोरेन हेच शिबू सोरेन यांचे राजकीय उत्तराधिकारी मानले जात होते. दुर्गा सोरेन यांच्या निधनानंतर हेमंत सोरेन यांचा झामुमोच्या राजकारणात प्रवेश झाला. दुर्गा सोरेन यांच्या पत्नी सीता सोरेन यांना झामुमोच्या राजकारणात डावलण्यात आले. त्यामुळे दुखावलेल्या सीता सोरेन यांनीही भाजपात प्रवेश केला. भाजपाजवळ बाबुलाल मरांडी आणि चम्पई सोरेन असे दोन माजी मुख्यमंत्री तसेच सोरेन घराण्यातील सीता सोरेन होते. पण हे तिघेही हेमंत सोरेन यांचा राज्यातील विजयरथ रोखू शकले नाही.

८१ सदस्यीय झारखंड विधानसभेत हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीने ५७, तर भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला २४ जागा मिळाल्या. झारखंड मुक्ती मोर्चाने सर्वाधिक म्हणजे ३४ जागा जिंकल्या. काँग्रेसला १६ जागा मिळाल्या. राजदने ५ तर भाकपा मालेने २ जागा जिंकल्या. रालोआत भाजपाने सर्वाधिक म्हणजे २१ जागा जिंकल्या. लोजपा आणि ऑल झारखंड स्टुडंड युनियन या पक्षांना प्रत्येकी एक जागा जिंकता आली. भाजपाला राज्यात बहुमत मिळविता आले नसले, तरी भाजपाच्या मतांच्या टक्केवारीत घट झाली नाही. यावेळी भाजपाला ३३.२८ टक्के मते मिळाली. २०१९ च्या निवडणुकीत भाजपाच्या मतांची टक्केवारी ३३.२७ होती. २०१४ मध्ये भाजपाला ३१ टक्के मते मिळाली होती. इंडिया आघाडीत झारखंड मुक्ती मोर्चाला २३.२० टक्के मते मिळाली तर काँग्रेसला १५.४५ टक्के. २०१९ च्या निवडणुकीत झामुमोने १८.७२ टक्के तर काँग्रेसला १३.८८ टक्के मते मिळाली होती.

भ्रष्टाचाराच्या आरोपात आपल्याला झालेल्या अटकेचा संबंध हेमंत सोरेन यांनी आदिवासींच्या अस्मितेशी जोडला. भाजपा आदिवासी विरोधी असल्याचा तसेच आदिवासीबहुल झारखंड राज्याला केंद्र सरकार निधी देत नसल्याचा आरोप केला. दुसरीकडे भाजपाने 'रोटी, बेटी आणि माटी'ची घोषणा देत आपल्यालाही आदिवासी अस्मितेशी जोडण्याचा प्रयत्न केला. बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा उपस्थित करत राज्याच्या काही भागात लोकसंख्येत असंतुलन निर्माण झाल्याचा आरोप केला. हे बांगलादेशी घुसखोर आदिवासींचा रोजगार म्हणजे रोटी हिरावतात, त्यांच्या मुलींशी लग्न करतात म्हणजे बेटी पळवतात आणि माटी म्हणजे आदिवासींच्या जमिनींवर कब्जा करतात असा प्रचार केला, पण त्यावर राज्यातील आदिवासींनी विश्वास ठेवला नाही. भाजपाला त्याचा फटका बसला. लोकसभा निवडणुकीत आदिवासींसाठी राखीव असलेल्या राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला होता. यावेळी राज्यातील आदिवासींसाठी राखीव २८ पैकी २७ विधानसभा मतदारसंघात भाजपाला पराभवाचे तोंड पाहावे लागले. महाराष्ट्रातही लोकसभा निवडणुकीत भाजपाशी अशीच स्थिती होती. पण महाराष्ट्रात भाजपाने लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका दुरुस्त केल्या, त्याचे फळ विधानसभा निवडणुकीच्या निकालातून त्याला मिळाले, पण झारखंडमध्ये भाजपाला यात यश आले नाही. महाराष्ट्रात भाजपाचे निवडणूक प्रभारी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव आणि अश्विनी वैष्णव यांना जे जमले, ते झारखंडमध्ये केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान आणि आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांना जमले नाही. झामुमोच्या हेमंतने भाजपाच्या हिमंतावर आपल्या राजकीय कौशल्याने मात केली, असे निवडणूक निकालावरून दिसून आले. राहुल गांधी काँग्रेसला निवडणूक, मग ती लोकसभेची असो की विधानसभेची, जिंकून देऊ शकत नाही, हे आधी लोकसभेच्या तसेच नंतर हरयाणा आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून सिद्ध झाले आहे. झारखंडमध्ये काँग्रेसला जे यश मिळाले, त्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे कोणतेच योगदान नाही, ती झामुमोचे हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाची कमाल आहे.

९८८१७१७८१७

### घवघवीत यशाचे खरे श्रेय संघाचेच

२०१९ ते २०२४ दरम्यान महाराष्ट्रात घडलेल्या अनेक राजकीय घडामोडींनंतर विधानसभा निवडणूक झाली आणि महायुतीला घवघवीत यश मिळाले. भाजपाचा विजय एवढा मोठा की, यापुढे इतरांच्या कुबड्यांची फारशी गरज पडू नये आणि त्यांच्या नखऱ्यांवर नियंत्रण यावे. काहीही असो; यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी स्वतःला झोकून देऊन मतदारांमध्ये जागृती निर्माण केली आणि मतदान टक्का वाढविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. कोणी कितीही नाकारले तरी राज्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यात संघ स्वयंसेवकांनी हातभार लावला. यावेळी महायुतीचे काही उमेदवार पाच हजारांपेक्षा कमी मतांनी निवडून आले; त्याला वाढीव मतदान टक्काही कारणीभूत आहे. निवडणुकांपूर्वी काही वाचाळवीर विरोधकांनी वैयक्तिक हीन दर्जाची चिखलफेक करून वातावरणात गर्मी निर्माण करण्याचे जे प्रयत्न केले, ते धुळीस मिळाले हेही नसे थोडके.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### युती त्सुनामीचे हेही एक कारण

२३ नोव्हेंबरला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले व भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने विरोधी आघाडीला पार नेस्तनाबूत केले. सध्या याचे पृथक्करण करण्यात वृत्तपत्रे मश्गूल आहेत. त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी गयाना-डोमिनिका, ब्राझील या देशांच्या दौऱ्यावर होते व त्यांना 'ऑर्डर ऑफ एक्सलन्स अवॉर्ड' मिळाल्याची बातमी आली. यावरून लोकांना मोदींना आतापर्यंत २० च्या वर आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचे आठवले. निवडणुकीत कुठले राजकीय पक्ष जनतेची प्रामाणिकपणे सेवा करायला निवडणूक लढत आहेत, याचे उत्तर मिळाले. मोदींना जगात लोक एवढा मान देतात. त्यांचे कर्तृत्व खरंच कौतुक करण्यासारखे आहे. त्यांच्यासारखा दूरदृष्टी व कार्यक्षमता असलेला नेता सध्यातरी भारतात नाही. जे काही नावाजलेले पुढारी आहेत, ते बहुतेक राजकारण करा व घराण्याकरिता माया कमवा, याच उद्देशाने प्रेरित होऊन निवडणुकी लढतात. हे टाळण्यासाठी निर्णय पक्का झाला व मी माझे मतदान केले.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९


## वाचक पत्रे

### खरा नेताच पंतप्रधान असतो

खरा नेता कधीच स्वार्थी नसतो. तो देश, समाज यांच्या विकासासाठीच झटत असतो. देशाला शक्तिशाली बनवणे हाच एकमेव उद्देश अशा नेत्याचा असतो. म्हणून आपले पंतप्रधान म्हणतात 'सबका साथ, सबका विकास' आणि म्हणून ते तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान झाले. सत्य तेच स्वीकारावे व सत्य तेच बोलावे, असा स्वभाव नरेंद्र मोदींचा आहे. म्हणून ते जगात सर्वमान्य आहेत. खोटा नेता आपला स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी स्वदेशीला कधी जवळ करतो तर कधी दूर लोटतो, खुर्चीची स्वप्ने पाहात ती साकारण्यासाठी कोणत्याही स्तरावर जातो. सुज्ञ जनता असा खोटा नेता लगेच ओळखते आणि मतपेटीतून आपला निर्णय देते. मोदींवर व पर्यायाने भाजपावर टीका करणारे कधीच संपून जातात.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### शासकीय आरोग्य व्यवस्था बळकट करण्याची गरज



राज्यातील लोकसंख्येचा फार मोठा भाग हा ग्रामीण भागात राहतो. ग्रामीण भागाचेही दुर्गम, अतिदुर्गम, गाव, वस्त्या असे अनेक भाग असतात. या भागातील ग्रामस्थ त्यांच्या आरोग्यासाठी त्या-त्या भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून असतात. तथापि, या केंद्रातील दुरवस्था झालेल्या पायाभूत सुविधा, नादुरुस्त यंत्रसामग्री आणि कुशल मनुष्यबळाचा अभाव हा सरकारसाठी चिंतेचा विषय ठरला आहे. राज्यातील जवळपास अडीचशेपेक्षा जास्त प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. त्यांना गळती लागली आहे किंवा धोकादायक इमारत म्हणून त्या जाहीर झाल्याचा अहवाल राज्याच्या आरोग्य विभागानेच तयार केल्याचे वृत्त अलिकडेच माध्यमात प्रसिद्ध झाले. साडेतीनशेपेक्षा जास्त आरोग्य केंद्रांमध्ये पुरेसे डॉक्टर्स नाहीत. विशेष तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध नसतात. परिणामी ४० टक्के खाटांचाच वापर होतो, असे आशियाई बँकेने निदर्शनास आणले. याचाच अर्थ ६० टक्के खाटांचा वापर होत नाही. प्रसार माध्यमेही अधूनमधून या सेवेतील उणिवांचा पंचनामा करतात. महाराष्ट्रासाठी हे चित्र भूषणावह नाही. समाजमनावर अंधश्रद्धेचा विळखा अजूनही पाहायला मिळतो. शासकीय स्तरावरदेखील विविध योजना राबविल्या जातात. एवढी यातायात करून लोक आरोग्य केंद्रापर्यंत येत असतील आणि त्यांच्या हाती सेवेचा भोपळाच लागत असेल तर ते शासनाचे अपयशच ठरते. व्यवस्था बळकटीकरण ही सरकारची जबाबदारी आहे. सरकारी सेवेला डॉक्टरांची पसंती का नसावी. इमारतींची दुरवस्था आदी प्रश्नांची उत्तरे जनतेला देणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यातील अडचणी सोडवून सक्षम सेवा पुरवणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# १५ मिनिटांच्या भेटीत जुळले जन्माचे नाते

> आपल्या जीवनात त्यांनी बरेच चढ-उतार पाहिले. कारण रजनीकांतचे एकेकाळचे दारूचे व्यसन असो किंवा कुटुंबातील अन्य समस्या, सर्व स्थितीत लता यांनी संयमाने वेळ निभावली. या सर्व घडामोडींमध्ये आपल्याला आजही केवळ अध्यात्मानेच तारले असल्याचे त्या सांगतात. या जोडप्याला ऐश्वर्या आणि सौंदर्या अशा दोन देखण्या कन्या आहेत. ऐश्वर्याचे लग्न अभिनेता धनुषसोबत झाले होते. यंदा जानेवारीत दोघे विभक्त झाले. सध्या ऐश्वर्या आपल्या मुलांसह वडिलांकडेच राहते. रजनीकांत आपल्या नातवंडांमध्ये कायम रमतात. काही दिवसांपूर्वी तर ते नातवाला शाळेत सोडण्यासाठी स्वत: गेले होते. अर्थातच, त्यांच्या जाण्याची बरीच चर्चाही झाली.

दाक्षिणात्य सिनेसृष्टी आणि राजकारण हे दोन्हीही टोकाचे लोकप्रिय असणारे क्षेत्र आहेत. विशेष म्हणजे, याच लोकप्रियतेचा फायदा घेऊन तेथे अनेक सिनेकलाकार राजकारणात येतात आणि तिथेही लोकप्रियतेचे शिखर गाठतात. एक कलाकार मात्र राजकारणापासून सध्यातरी सुरक्षित अंतर ठेवून आहे आणि प्रसिद्धीच्या शिखरावर आहे. खऱ्या अर्थाने यश काय असतं आणि लोकप्रियता काय असते, याचे परिमाण म्हणजे रजनीकांत.

दक्षिणेकडील लोकांसाठी हा केवळ एक कलाकार नाही तर देव बनला आहे. कित्येक वर्षांपासून कित्येक ठिकाणी त्यांचे मंदिर उभारून तेथे त्यांची पूजा केली जाते.

एक पोलिस हवालदार रामोजीराव गायकवाड आणि त्यांची पत्नी जिजाबाई, एक गृहिणी यांचा तीन मुले आणि एक मुलगी असा परिवार. भावंडांपैकी सर्वात धाकटा, शिवाजी हा पुढे रजनीकांत म्हणून उदयास आला, त्याच्या प्रवासात त्याचा मोठा भाऊ सत्यनारायण राव यांनी मार्गदर्शन केले. हे महाराष्ट्रीयन कुटुंब मूळचे पुणे, महाराष्ट्रातील असले तरी ते बंगळुरूमध्ये स्थायिक झाले. १९५६ मध्ये रामोजीराव गायकवाड यांच्या निवृत्तीनंतर, कुटुंबाने बंगळुरूमधील हनुमंथा नगर या उपनगरात त्यांचे घर बांधले होते.

पुण्यातील पुरंदर तालुक्यात असलेले मावडी कडेपठार हे रजनीकांत यांचे वडिलोपार्जित गाव म्हणून प्रसिद्ध आहे. रजनीकांतचे आजोबा सुरुवातीला कर्नाटकातील विजयपुरा तहसीलमधील बसवण्णा बागेवाडी येथे स्थलांतरित झाले आणि अखेरीस बंगळुरूमध्ये स्थायिक झाले. रजनीकांत अर्थात शिवाजीराव हा लहानपणी अतिशय दांडगट असल्याने वडिलांनी त्याला रामकृष्ण मिशनमध्ये दाखल केले. तेथे विविध विषय शिकतानाच त्याने अभिनय सुरू केला. छोट्या छोट्या नाटकांतून अभिनय करत असल्याने त्याला अभिनयाची चटकच लागली. मात्र, वयात येत असताना घरातील परिस्थिती पाहता त्यांनी छोट्या मोठ्या नोकऱ्या सुरू केल्या. अगदी कुलीचेही काम केले. नंतर ते बस कंडक्टर झाले.

बस कंडक्टर असतानाच त्याची भेट निर्मला नामक तरुणीशी झाली. तिथे त्याला अभिनयासाठी प्रोत्साहित केले. मात्र, नंतर त्यांचे संबंध दुरावले. शिवाजीराव गायकवाडचा रजनीकांत झाल्यानंतर एका मुलाखतीदरम्यान त्यांची भेट लता रंगाचारी या विद्यार्थिनीसोबत झाली. ती मुलाखत घेण्यासाठी आली होती.

महाविद्यालयीन मासिकासाठी मुलाखत देताना अवघ्या १५ मिनिटांच्या या भेटीत रजनीला लता आवडली होती. त्यावेळी रजनीकांत 'थिल्लू मल्लू' या चित्रपटाचे चित्रीकरण करत होते. मुलाखतीदरम्यानच दोघांमध्ये गप्पा सुरू झाल्या आणि दोघेही एकाच शहरातील असल्याचे लक्षात येताच त्यांच्यात आत्मियतेने संवाद झाला. अवघ्या काही मिनिटांच्या या भेटीतच रजनीला लता इतकी आवडली होती की मुलाखत संपण्याच्या आतच त्यांनी तिला लग्नाची मागणी घातली. त्यावेळी तिने कोणतेही उत्तर दिले नाही. हा मुद्दा घरच्यांना विचारल्याशिवाय पुढे नेता येणार नाही, एवढेच बोलून ती तिथून निघाली. नंतर त्यांचे फोनवरच बोलणे होत होते. मात्र, फोनवरच लग्नाचे ठरले आणि दुसऱ्या भेटीत थेट लग्नच उरकले.



फार थोड्या लोकांना माहिती आहे की, लता रंगाचारी अर्थात मिसेस रजनीकांतचे अभिनेत्री वैजयंतीमालासोबतही नाते आहे. त्यांच्या घराण्यातही नाटक, सिनेमाचे वेड होते. चेन्नईतील एका मध्यमवर्गीय तमिळ ब्राह्मण अय्यंगार कुटुंबात त्यांचा जन्म झाला. लता या उत्तम गायिका आहेत. तमिळ सिनेमात त्यांनी पार्श्वगायिका म्हणूनही कामगिरी बजावली आहे.

### अतिशय धावपळीचा दिवस

लता रजनीकांत या एका धनकुबेर अभिनेत्याच्या पत्नी आहेत तर त्यांचे जीवन ऐशाआरामाचे असेल, असे आपल्याला वाटेल. मात्र, प्रत्यक्षात त्या अगदी सामान्य गृहिणीसारखे धावपळीचे जीवन जगतात. सकाळी उठल्यानंतर रजनीकांत यांच्या शेड्यूलनुसार त्यांचा दिनक्रम ठरतो. रजनीच्या सर्व बैठकांचे नियोजन त्यांचेच असते. नातवंडांच्या शाळेची धावपळही त्यांच्या मागे असते. घरातील ही कामे आटोपल्यानंतर त्या आपल्या स्वत: सुरू केलेल्या धर्मादाय शाळेत आणि आश्रमात जातात. त्यांनी हरवलेल्या मुलांसाठी 'प्रोजेक्ट अभयम्' सुरू केले आहे. त्या ठिकाणी दिवसातून एकदा तरी त्या भेट देतातच. तेथील कामकाजही त्या स्वत: जातीने पाहतात.

### अध्यात्मावर अतूट विश्वास

आपल्या जीवनात त्यांनी बरेच चढ-उतार पाहिले. कारण रजनीकांतचे एकेकाळचे दारूचे व्यसन असो किंवा कुटुंबातील अन्य समस्या, सर्व स्थितीत लता यांनी संयमाने वेळ निभावली. या सर्व घडामोडींमध्ये आपल्याला आजही केवळ अध्यात्मानेच तारले असल्याचे त्या सांगतात.

या जोडप्याला ऐश्वर्या आणि सौंदर्या अशा दोन देखण्या कन्या आहेत. ऐश्वर्याचे लग्न अभिनेता धनुषसोबत झाले होते. यंदा जानेवारीत दोघे विभक्त झाले. सध्या ऐश्वर्या आपल्या मुलांसह वडिलांकडेच राहते. रजनीकांत आपल्या नातवंडांमध्ये कायम रमतात. काही दिवसांपूर्वी तर ते नातवाला शाळेत सोडण्यासाठी स्वत: गेले होते. अर्थातच, त्यांच्या जाण्याची बरीच चर्चाही झाली. तरीही त्यांनी याचे भांडवल न करता शक्य तितके साधे, सरळ आयुष्य जगण्याकडे आपला कल ठेवला आहे. १९८० मध्ये त्यांचे लग्न झाले. इतक्या वर्षात लग्नाच्या प्रत्येक वाढदिवसाला हे जोडपे एकमेकांना एक विशेष गिफ्ट देत आहे. लग्नाच्या वेळी घातलेली सोन्याची चेन आणि अंगठी हे दोघे एकमेकांना प्रत्येक वाढदिवसाला घालतात. वास्तविक, ज्या व्यवसायात रजनीकांत आहेत तिथे अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी काम केले. शिवाय त्यांचे व्यक्तिमत्व असे की कोणतीही स्त्री अगदी सहजपणे त्यांच्या प्रेमात पडेल. मात्र, रजनी आणि लता या दोघांनीही आपली निष्ठा अशी काही जपली आहे की आजही त्यांचे नाते अतूट आहे. माझ्या जीवनातील सर्वात मोठी ताकत लताच असल्याचे रजनीकांत सांगतात तेव्हा या नात्यातील विश्वास आणि बळकटी स्पष्टपणे जाणवते. म्हणूनच ते एकमेकांना म्हणतात की,

**माझ्या प्रत्येक वेदनेवर औषध आहेस तू**
**माझ्या प्रत्येक सुखाचे कारण आहेस तू**
**काय सांगू माझ्यासाठी कोण आहेस तू**
**फक्त हा देह माझा**
**त्यातील जीव आहेस तू**

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/ ७८२१८१६४८५

# बहुगुणी मंडया

माणसाचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी व टिकून राहण्यासाठी विविध प्रकारच्या भाज्या, फळंफुले, तृणधान्य, कडधान्याची आवश्यकता असते. कारण, या सर्वच वस्तू दीर्घ आयुष्य जगण्याला मदत करत असतात. म्हणून आधीची माणसं या गुणकारी असलेल्या वस्तूंचे महत्व जाणून, आहारात आवर्जून समावेश करत असत आणि तीच त्यांच्या निरोगी आयुष्याची गुरूकिल्ली होती. असेच एक बहुगुणी तृणधान्य म्हणजे मंडया! हे या धान्याचं झाडीबोलीतील नाव आहे. या धान्यावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही, जास्त खतपाणी घातले जात नाही. निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेल्या या तृणधान्याची लागवड विदर्भात काही दुर्गम भागातील शेतात केली जाते. विशेषत: कोरची तालुक्यात हे धान्य लावलेले दिसून येते. जंगलाच्या बाजूला असलेल्या आणि पाण्याचा लवकर निचरा होणाऱ्या, धुरे-पार नसलेल्या मोकळ्या जमिनीवर मंडयाची लागवड केली जाते. केवळ त्या जागेची नांगरणी करून, ओलसर व कोरड्या जागेत, धानाची लागवड ज्या प्रकारे करतात त्याप्रकारे मंडयाची पेरणी केली जाते.

सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात, या तृणधान्याचे परे टाकले जातात. त्यावर कोणत्याही औषधाची फवारणी केली जात नाही. ऑक्टोबर महिन्यात मंडया तृणधान्य निसर्गाच्या सान्निध्यात राहून, सुंदरसं बहरते. त्याची पाने चिरीव व लांब असतात. नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा डिसेंबर महिन्यात या मंड्या तृणधान्याला आलेली कणसं ज्यांना गोंदे म्हणतात, ते कापून घेतात. या तृणधान्याची सहसा बाजारात विक्री होत नाही तर, केवळ आपल्या कुटूंबापुरते ते पिकविण्यावर भर असतो. शेणाने सारविलेल्या जागेवर गोंद्यांना पसरवून घेत, बैलांच्या पायाखाली ते धान्य चुरले जाते. धान्य खूपच कमी असेल तर, दोन हातांमध्ये चुरून ते बारीक केले जाते. मंडया तृणधान्य थोडे ज्वारीसारखे दिसत असले तरी त्यांचा आकार लहान पण, मोहरीच्या दाण्यापेक्षा थोडा मोठा असतो. मंडयाचा रंग लालसर पांढरा असतो. धान्य गोळा करून, त्याचे पीठ दळून घेतात. या पीठाची मंडया आंबील बनवली जाते आणि ती गुणकारी, पोषक आणि आरोग्यवर्धक असते. स्तनदा बाळंतिणीला विशेषत: ही आंबील देतात. या आंबीलीचे महत्व जाणून बांळतीनीला प्यायला देतात.



गेल्या काही वर्षांत या मंडया तृणधान्याचे महत्त्व जाणून, शेतकरी वर्ग जास्त प्रमाणात आणि जास्त जागेत लागवड करतात. शेतकरी हे बियाणे सांभाळून ठेवतात पण, आजकाल नवनवीन पीक घेण्याच्या नादात या गुणकारी असलेल्या मंडया तृणधान्याचा विसर पडल्यामुळे, आजच्या पिढीला या गुणकारी तृणधान्याविषयी माहीती मिळत नाही. आजही गावखेड्यातील लोक तांदळाच्या पिठाची, गव्हाची, बेजरा, ऐरण तसंच मंडयाची आंबील आवडीने आहारात घेतात. हिवाळ्याच्या दिवसात या आंबीलमुळे शरीराला उष्णता आणि पोषण मिळते. गुणकारी मंड्यासारख्या तृणधान्याचा विसर पडू देऊ नका. तिचा आहारात नक्कीच समावेश करा.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# 'प्रौढ' बालके!

बाळ, नाव काय तुझं ? मोबाईल चाळणाऱ्या मित्राच्या लहान मुलाला बघून त्याचा गालगुच्चा घेत, मी सहज विचारलं. ते पोर माझ्याकडे नुसतंच टकमक बघत राहिलं. 'छे...छे मराठी येत नाही हो सचिनला !' त्याच्या आईचा आतून आवाज आला. त्यानंतर, दहा-बारा वर्षांनी पुन्हा सचिनची गाठ पडली. पोरगा ताडमाड झालेला! चेहऱ्यावर कोरडे भाव! तो आत निघून गेला. चेहऱ्यावर बालसुलभ भाव दिसले नाही. नंतर, पुन्हा एकदा भेटला सचिन तेव्हाही तो फारसा बोलला नाही. चेहऱ्यावर स्मित नाही पण, खळबळ दिसली. 'हा काही बोलत का नाही?' मित्र म्हणाला, 'तो त्याच्या मित्रांसोबत बोलेल तुमच्याशी काय बोलणार हो ?'

आता काय करतो सचिन? 'यंदा दहावीला आहे. ट्युशन खूप असतात. ट्रिपल आयटीला ॲडमिशन मिळायला हवीय.' पुन्हा ७-८ वर्षांनी मित्र दिसला.

'काय करतो सचिन ?' आता मित्र उदास वाटला. फार काही बोलत नव्हता. 'अरे तो विदेशात गेला. तिकडेच स्थायिक झालाय!' हो का...लग्नाचा असेल आता ? छे छे! तिकडे तो लिव्ह इनमध्ये आहे. आपल्याला काय ! तो त्याचा आयुष्य जगतोय, आपण आपलं जगावं ! हा सचिन कधी मैदानात खेळताना बागडताना दिसला नाहीः भरभरून बोलताना दिसला नाही. मनमुराद हसताना दिसला नाही. अवांतर वाचनाचा आनंद त्यानं लुटलाच नाही. कथा-कादंबऱ्या न वाचताच हा पठ्ठा मोठा झाला, अशी बालपण हरवलेली प्रौढ बालके बघून मन विषण्ण होते. केवळ तांत्रिक आणि पोटार्थी शिक्षण घेऊन त्याचा सर्वांगीण विकास झाला, असं कसं म्हणता येईल? ही मुलं अकाली प्रौढ का झालीत? बालपण देगा देवा, बालपणीचा काळ सुखाचा, मुग्ध मधुर बाल्य ते हे सर्व काव्य इतिहास जमा झालंय की काय? थांबा! बालकांना मोठ्यांच्या बरोबरीनं जगायला भाग पडू नका. तीन वर्षांपूर्वी त्याला प्रौढ करू नका. शाळेत टाकण्याची घाई अजिबात करू नका. बालकांना त्यांचे लहानपण उपभोगू देण्याची जबाबदारी मोठ्यांची आहे. त्यांना स्वतःच्या महत्त्वाकांक्षेचे बळी होऊ देऊ नका. त्यांना अमानवी वृत्तींची जाणीव होऊ देऊ नका. अमुक भाषेची सक्ती, प्रगती पुस्तकावरून त्यांचे मुल्यांकन किंवा इतर समवयस्कांशी तुलना हे प्रकार भयावह आहेत. याऐवजी सकारात्मक उत्तेजन आणि शेअरिंगची सवय अधिक महत्वाची! रिअलिटी शोमध्ये बालकांकडून मोठ्यांसारखा अभिनय अपेक्षिला जातो. त्यांना सेलिब्रिटी वागणूक कळायला लागते. त्यांच्या अपेक्षा बेसुमार बळावतात. पण, नंतरच्या आयुष्यात जर तो पुरेसा यशस्वी झाला नाही तर मात्र एक पोकळी निर्माण होते.

बदलते बालमानस हा तसा संवेदनशील विषय आहे. आपण काय करतो? तर, त्यांना आपल्या साच्यात फीट करण्याचा आग्रह धरतो. आपल्या सोयीने लहान मुलांचे वेळापत्रक फिक्स करतो. त्यांची जीवनातील क्षेत्र निश्चित करून टाकतो. त्यांना सर्व सोयीसुविधा हातोहाती पुरवतो. वाट्टेल तो आटापिटा करून हवं ते उपलब्ध करतो. शिकवणी वर्ग लावतो. उगाच मोठ्या स्वप्नांची माळ त्यांच्या गळ्यात घालतो. तुलना आणि आपली पातळी याची जाणीव करून देतो. पाळणाघर, प्री-नर्सरीत डांबून टाकतो. भूक नसताना खायला आग्रह करतो. परिणामी त्यांचं बाल्य हिरावून घेतो. काय अधिकार आहे? तो सवंगडी मित्रांसोबत बागडत नाही. कडकडून भूक लागू देत नाही. टॉयलेट मॅनर्स, ब्रशिंग मॅनर्स, टेबल मॅनर्स आवर्जून शिकवतो. इंग्रजी हेच उच्चशिक्षण समजून आणि देवून आपण त्याला परदेशात पाठवतो. यात काही चूक आहे, असं आपल्याला वाटत नाही कारण, आपण ते आपलं कर्तव्य समजतो.

पण, हे सुद्धा ध्यानात असावे की, नकार पचवायची सवय कधीकधी प्रयत्नपूर्वक लावावी लागते. त्या नकाराचे समाधानकारक स्पष्टीकरण देता यायला हवे. ते त्याच्या बुद्धीला पटेल तेव्हा प्रक्रीया पूर्ण होते. पण, लाडक्या लेकराच्या अधीन झालेले पालक नेहमी आपण बघतो. आता हा प्रसंग बघा.

'पप्पा, मला स्केच पेनचा सेट हवाय !' छोटू म्हणाला.

'ओके बेटा, आज संध्याकाळी येताना मी घेऊन येईल.' संध्याकाळी छोटू वाट बघत होता.'पप्पा आणले स्केचपेन?' त्यांनी कपाळावर हात मारला आणि म्हणाले, 'अरेच्चा, मी विसरलो बघ...उद्या नक्की आणतो.' दुसऱ्या दिवशी जेव्हा स्केचपेन आणले नाहीत तेव्हा पप्पा म्हणाले,'अरे छोटू, आज दुकान बंद होते. मार्केट बंद असते. उद्या आणेन हं!'

तिसऱ्या दिवशी पप्पा सांगत होते,'अरे दुकानात माल नव्हता. उद्या येणार म्हणाला!' चौथ्या दिवशी पप्पांनी कारण सांगितलं,'अरे मला ऑफिसमध्येच उशीर लागला. तोवर दुकान बंद झालं होतं.' पाचव्या दिवशी जेव्हा स्केचपेन मिळाले. तेव्हा पोराला आनंद तर झालाच. पण, एक वेगळी शिकवण मिळाली. एखादी वस्तू न मिळण्यामागे किती विकल्प असू शकतात. कोणत्या तरी कारणाने ती वस्तू मिळणे दुरापास्त होऊ शकते, हे मुलांना कळतच नाही. यासाठी अनेक कारणे असू शकतात उदा. विस्मरण होऊ शकते, दुकान बंद असू शकते, दुकानातील माल संपू शकतो, आकस्मिक कारणाने शक्य होत नाही, अशी कितीतरी कारणे नकळत कळली. यातूनच कुठेतरी नकार पचवण्याची सवय अंगवळणी पडते. लगेच स्केचपेन हातात पडले असते तर हे अमुल्य शिक्षण मिळाले असते का?



निव्वळ आजीआजोबांच्या चालीरिती हे संस्कार नव्हेत. संस्कार हे सद्विचारांचे असतात. वर्तमानात जगण्याची विद्या संस्कारातून प्राप्त व्हावी. संस्कारातून सवयी आणि अनुभव येतात. त्यासाठी, वेगळे संस्कारवर्ग चालवण्याची गरज नसते. दैनंदिन वागण्याबोलण्यातून नकळत संस्कारांचे बीजारोपण युक्तीने करता येते. उदा. मुलांसमोर मोठ्यांनी मोबाईल वापरणे मर्यादित केले तर लहानपणापासून येणारा मोबाईल मेनिया येणार नाही. बालकांना एकांगी संस्कार होऊ नयेत. त्यांना विपरीत स्थितीला तोंड देण्याची आणि चौफेर विचार करण्याची क्षमता यायला हवी.

आईवडिलांनी काही वेळ टीव्हीसमोरून उठून स्वतः एखादे पुस्तक हातात घ्यावे. स्वतःला वाचनानंद मिळेल. मुलालाही समोर पुस्तक ठेवलेले बघून वाचनाची गोडी लागेल कारण, मुले हुकूम पाळत नाहीत. पण, अनुकरण नक्की करतात. तू हे वाच आणि मला समजावून सांग किंवा तू हे आता सर्वांना वाचून दाखव बघू! सर्व शक्यता आणि पर्याय पुढ्यात मांडून, सुयोग्य निवड करण्याची सवय लावा. प्रश्नोत्तराचा कार्यक्रम महिन्यातून एखादेवेळी करणे फलदायी ठरेल. एखादी सिच्युएशन सांगून या स्थितीत तू नेमकं काय केलं असतं? कसं तोंड दिलं असतं? असे स्वयंनिर्णय घेण्यास सांगून आपण त्या निर्णयाचे परीक्षण करावे.

आज तू दिवसभरात काय केलंस? कोण कोण भेटलं? टीचरने काय शिकवलं? असे प्रश्न विचारून त्यांना बोलते करणे, प्रश्नांची उत्तरे देण्याची सवय लावणे याचेच नाव संस्कार ! सर्वच स्तरातील जीवनाचा सर्वंकष विचार मुलगा करू शकतो की नाही? याची खबरदारी घेतली नाही तर मुले वयात आल्यावर एकसुरी जीवनक्रम स्वीकारतात. याचे मूळ कुठेतरी त्यांच्या बालपणात दडलेले असते. असे कर, तेवढेच कर यातून कोशातले सुरवंट कुपमंडूक वृत्तीचे झाल्यास नवल ते काय?

उशिरा प्रसंगाशी दोन हात करण्याची वेळ आल्यास, तो हबकून जाऊ शकतो अथवा टोकाचा अविचारी निर्णय घेऊ शकतो. मुलांच्या निकोप मानसिकतेसाठी मोकळीक, सवंगडी आणि मनःपूत वाचन करायला हवे. सहृदयता, सहवेदना आणि सहानुभूती जोपासायला हवी, गरजवंतांना मदतीचा हात, परोपकार आणि शेअरिंग हवे. इस्त्री केलेल्या भावनांची दडपशाही नको. त्यातून, व्यक्तिमत्व दुभंगते. परिणामी बालकसमोर एक आणि बाहेर वेगळे असे वागू लागतो. एकुलता एक मुलगा! मग, पालक हवं ते तत्परतेने हातोहाती पुरवतात. केवळ डिमांड करायचे 'देर भली की सप्लाय'ची गॅरंटी हमी असते. त्यामुळे, जीवन संघर्षापासून दुरावल्याने त्यांच्या अंगभूत गुणांचा विकास कसा होणार? केवळ समर कॅम्प, स्विमिंग, स्केटिंग, ड्रायव्हिंग आणि विविध क्लासेसच्या गोतावळ्यात त्याला अडकवून काय होणार? हल्ली संस्कारक्षम वयात संस्कार करायला मातापित्यांना सवड नसते. तशातच वाचनाचा अभाव आणि मोबाईल इंटरनेटवरील अविचारांचा दुष्प्रभाव! परिणामी, वयात आलेली मुले-मुली या विविध दुष्प्रवृत्तींना बळी पडण्याच्या घटना घडत आहेत. समजतील बाल आणि महिला यांची सुरक्षितता जपली जावी म्हणून महिला, बाल आणि वृद्ध कल्याण याचे वेगळे मंत्रालय आहे. मातापित्यांच्या उपदेशाचा अनादर करण्याची प्रवृत्ती बकाळत चालली आहे. खरं तर मातापित्यांचा सल्ला हाच मुलांसाठी लाभकारी असतो कारण, तेच त्यांचे नैसर्गिक रक्षण करणारे असतात. मुलांना हे केव्हा आणि कोण समजावून सांगणार. शालेय शिक्षणात आणि पाठ्यपुस्तकातच नैसर्गिक रक्षणकर्ते कोण? पालक आणि मातापिता हेच मुलांचे नैसर्गिक रक्षणकर्ते आहेत. त्यांच्या सल्ल्याचा अनादर करू नये, अशी शिकवण प्रकर्षाने देण्याची गरज आहे. पूर्वी नैतिक नावाचा एक विषय अभ्यासक्रमात असायचा. वृद्ध मातापित्यांचा सांभाळ अपत्यांनी करायचा असतो, ही नैतिक बाब न्यायालयाच्या कक्षेत कशी येते? ही बाब कायदा करून का सांगावी लागली ? हल्ली नैतिकतेचे धडे शिक्षणातून का देण्यात येत नाहीत? देशाचे भविष्य घडविणे हे पुढच्या पिढीच्या हातात असले तर त्या पिढीचे भविष्य घडविणे, हे आधीच्या पिढीच्या हातात आहे.

# त्या पहाटवेळा !



नुकतीच दिवाळी आटोपली तरी दिवाळीची धुंदी उतरलेली नाही. मग ही आठवणींची उजळणी मनात सुरू होते.

**'भक्तिचिया पोटी बोध, काकडा ज्योती**
**पंचप्राण जीवेभावे ओवाळू आरती...'**

दिवाळी आटोपली की, रोज सकाळी माझ्या मनात या ओळींचे तरंग उठतात. दिवाळीच्या सुट्टीत कांढळीला भल्या सकाळी पूजा आटोपत आली की, आजी हाक द्यायची. हातात तेवता काकडाज्योत घेऊन आजी देवाला ओवाळायची. त्यासाठी खास काकडवाती हाताने तयार केलेल्या असायच्या. मग मी, माझ्या चुलत-आत्ते बहिणी अशा आम्ही मुली देवाजवळ बसून, तिच्यासोबत काकडारती म्हणायचो. सोबत आणखीही पदं, भजनं आळवली जायची. एका विशिष्ट क्रमाने आणि छान छान चालींवर भजनं म्हटली जायची. तेव्हा नव्हतं कळत पण, आज त्या शब्दांमधून अध्यात्म किती सहजतेने व्यक्त झालंय ते कळतं. देह वृंदावनी एक तुळशीबीज पेरीले, स्नेह उदक घालुनिया वाढविले तरुवरा... आमच्याही मनात आपल्या परंपरेचे बीज असेच रोवले गेले. 'उठी उठी बा पुरुषोत्तमा, भक्त कामकल्पद्रुमा...' या माझ्या लाडक्या भूपाळीने सुरवात व्हायची. किती छान भूपाळी! तुका वाण्यापासून सेना न्हाव्यापर्यंत प्रत्येक भक्त त्याच्या व्यवसायानुसार भेट आणतो लाडक्या विठूसाठी! अगदी कान्होपात्रासुद्धा नाचत गात येते. इकडे यशोदामाई दुधादह्याने भिजवलेल्या पोह्याची वाटी घेऊन,'चल ये रे, तू चल ये रे' म्हणून विनवतेय.'गाई गोपाळांचा थाट, भरला यमुनेचा घाट' म्हणत गोपालकाला रंगात येतो तर कुणी प्रेमाने 'सुप्रभाती थोडे तरी रे दूध घेई प्रभूवरा' म्हणतेय. घरातले नित्याचेच प्रसंग होते. धाकट्या भावाला खाऊ घालतांना आळवणारी आईच डोळ्यासमोर उभी व्हायची. 'षडरिपुशी जाळीयले, प्रेमभरे दुध आटवले, भक्तीची शर्करा' ही कल्पना तेव्हाच आवडून गेली. आता आमची भजनयात्रा 'सख्या हरी' म्हणत दत्ताच्या जेवणापर्यंत पोहचायची. काय सुंदर वर्णन होतं त्या पदार्थांचं!

अपर्णा विचोरे-आठल्ये / ९८२२७०१०६२

लवंगा, दोड्यांनी सजवलेले बर्फी-पेढे, फिवा-फेण्यांसोबत सुधारस या मधुर पक्वान्नांसोबतच चटपटीत चवीचे वरण-कण्या आणि अंबाडीची भाजी आमची काकड आरती अधिकच रूचकर करायचे. वडीलांच्या आज्ञेने मित्रांसोबत खेळणं सोडून नाराजीने विठ्ठलासाठी नैवेद्य घेऊन जाणारा आणि विठ्ठलमूर्ती जेवतच नाही म्हणून त्याला 'आपुल्या प्राणांशी करीन घात' असा अट्टाहास करत धाक देणारा नामदेव इथेच भेटला.

कंसवधाचे पद म्हणतांना एका बहिणीचा अवखळपणा शिगेला पोहचायचा. कार्तिकातली सकाळ आठवणींची ज्योत प्रज्वलीत करत रहाते. एकाच परब्रम्हाची आळवणी होत असली तरी प्रत्येक पंचक्रोशीतल्या काकड आरतीत वेगवेगळी पदं समाविष्ट असायची. अज्ञात रचनाकारांच्या या रचना पिढ्यान्पिढ्या संक्रमित होत राहिल्या. लोकसाहित्यात मानाचं स्थान पटकावून बसल्या. एव्हाना नदीवर कार्तिकस्नान करून परतणारी दिंडी टाळवीणेच्या तालावर 'ज्ञानबा-तुकाराम'ची वर्दी देत घरासमोरून जायची. काही घरांसमोर त्यांचं पादप्रक्षालन व्हायचं.

आता पिढी पालटली, घर उठलं. आम्ही आपापल्या ठिकाणी पोहचलो. सारं सारं इतिहासजमा होऊन, फक्त आमच्या आठवणीत उरलं. पण, मला खात्री आहे या कार्तिकातल्या भल्या सकाळी आमच्यापैकी प्रत्येकाचं मन त्या 'पहाटवेळां'पाशी रेंगाळतच असेल. अथर्व लहान असताना त्याला कुशीत घेऊन मी माझ्या बालपणीच्या गोष्टी सांगायचे त्यात कांढळीच्या आठवणी अविभाज्य होत्या. भल्या सकाळी जवळच्या देवळातून काकडारतीचे सूर कानावर यायचे आणि मग माझ्याही नकळत अथर्वची शाळेची तयारी करत काकड आरतीची उजळणी व्हायची. कधी तरी हा गेलेले दिवस गौरवण्याचा वृथा अट्टाहासच वाटला. बघता बघता अथर्वचेही बालपण सरले. काकड आरती, भूपाळी-भजनं खूप मागे पडल्यागत अगदी नाहीसं झाल्यागत वाटलं. पण नाही ! परवाच अथर्व म्हणाला, 'आता तुझी ती कांढळीची काकड आरती, भूपाळी, तुळशीचं गाणं सुरू झालं असेल नं? आज काल म्हणत नाहीस तू ! म्हणत जा गं आपल्याही घरी!'

चला ! म्हणजे संस्कारांचं बीज वठलं नाही, त्याचं रोप बहरतंय.परंपरेचं, संस्कृतीचं जतन या संकल्पनेला उगाचंच खूप मोठं, कठीण केलं गेलंय. खरं तर या अशा छोट्या छोट्या गोष्टींनीच संस्कृती जपली जाते. म्हणूनच, आपण सहजतेने चांगलं ते करत रहायचं पुढची पिढी नकळत ते ग्रहण करते आणि त्याची महती पटली की, ते त्यांच्या वागण्यातून उजागर करते. म्हणूनच आपल्या परंपरांचं तुळशीबीज त्यांच्या मन वृंदावनात रूजवायचंच, सत्कर्माच्या मंजिऱ्या फुलणारच! हाच बोध घेत, आत्मज्योत उजळत त्या विठूरायाला आळवू या आणि म्हणू या,

**'भक्तिचीया पोटी बोध काकडा ज्योती,**
**पंचप्राण जीवे भावे ओवाळू आरती...'**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# घनसावंगी मतदारसंघाला मंत्रिपदाची उत्सुकता!

## युती सरकारमधील मंत्रीमंडळाच्या मंत्रीपदाच्या यादीत आ.हिकमत उढाण शर्यतीत?

**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील मविआचे मातंबर नेते माजी मंत्री राजेश टोपे यांना यावेळी महायुतीचे अधिकृत उमेदवार आ .हिकमत उढाण यांनी यंदाच्या निवडणुकीत चांगलीच धुळ चारली घनसावंगी मतदार संघातून मतदारांनी भाजप-शिवसेनेच्या उमेदवारांना प्राधान्य दिल्यामुळे यावेळी घनसावंगी तालुक्यातुन मंत्रिमंडळात स्थान मिळेल का, याकडे या मतदारसंघातील मतदार बांधवांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी यापूर्वी हिकमत दांदाना साथ दिली होती मात्र थोडक्यात त्यांचा पराभव झाला होता . यावेळी शिंदे गटाच्या शिवसे-नेच्या उमेदवार आमदार म्हणून हिकमत उठाण यांना घनसावंगी करांनी निवडून दिलेले आहे. अशाप्रकारे हिंदुत्ववादी विच-ारसरणीच्या उमेदवारांना विधानसभेत पाठविले आहे. तसेच या मतदारसंघात जिल्हा परिषद व पंचायत समिती यासारख्या निवडणुकांमध्येसुद्धा मतदार अन्य राजकीय पक्षांच्या तुलनेत भाजप व शिवसेनेच्या उमेदवारांच्या झोळीत भरभरून मतांचे दान देतील असेही मतदार संघात बोलले जात आहे . आहेत. यापूर्वी विधानसभा निवडणुकीत निकाल लागण्यापूर्वीच मंत्रिपदासाठी स्वतः मुख्यमंत्री मा . ना . एकनाथराव शिंदे यांनी भरसभेत हिकमत यांना आमदार झाल्यास पुढची जवाबदारी माझी असा गर्भित इशारा देत मंत्री पदाचे अश्वासन जणतेला दिले होते . त्यामुळे आता यंदा घनसावंगी करांनी हिकमत यांना पसंती देऊन मंत्री पदाच्या शर्यतीत शिंदे यांनी घ्यावे असे मतदार संघातुन बोलले जात आहे.



# विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' चर्चासत्रात सहभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारत सरकारने 'विकसित भारत युवा नेते संवाद' म्हणून राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या दरम्यान देशभरातून निवडलेले ३ हजार तरुण-तरुणी १२ ते १३ जानेवारी २०२५ रोजी नवी दिल्ली येथे पंतप्रधानांसमोर विकसित भारताचे त्यांचे व्हिजन मांडतील आणि सादर करतील. तरी जालना जिल्ह्यातील सर्व तरुणांनी राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ विकसीत भारत यंग लीडर्स डायलॉगमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.

चर्चासत्र काळात तरुणांना देश-विदेशातील तरुण आयकॉन्सशी चर्चा करण्याची आणि शिकण्याच्या अनेक संधी मिळणार आहेत. कार्यक्रमाचा उद्देश देशभरातील तरुण नेतृत्व प्रतिभेचा शोध घेणे आणि त्यांचे संगोपन करणे, विकसित भारताची त्यांची दृष्टी स्पष्ट करण्यासाठी तरुणांना एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांना सर्वोच्च निर्णय घेणारे आणि प्रसिद्ध जागतिक आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांशी जोडणे आणि विकसित भारताचे नेतृत्व करण्यासाठी तरुणांना सक्षम करणे, असा आहे. विकसित भारत यंग लीडर्स चर्चासत्रच्या माध्यमातून या तरुणांची चार टप्प्यांत निवड केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात, विकास भारत प्रश्नमंजुषा ऑनलाइन पद्धतीने आयोजित केली जाईल, ज्यामध्ये १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक पोर्टलवर नोंदणी करून भाग घेऊ शकतात. पहिल्या टप्प्यात निवडलेले तरुण दुसऱ्या टप्प्यातील विकास भारत ब्लॉग, निबंध स्पर्धेत सहभागी होतील. या टप्प्यातील निवडक युवक तिसऱ्या टप्प्यातील विकसित भारत राष्ट्रीय पिच डेक-स्टेट चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होतील आणि तिसऱ्या टप्प्यातील विजेते अंतिम टप्प्यातील विकसित भारत राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होतील. पहिला टप्पा २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत भारत सरकारच्या पोर्टलवर आयोजित केला जाईल. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## संक्षिप्त



माहोरा येथील दीपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माहोरा या शाळेमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी श्री लोढेसर गोराणे सर गोलटगावकर मॅडम सोन्ने सर शेजुळ सर लहाने सर गडकरी सर भिंगारे मामा आदींची उपस्थिती होती.

### रामभाऊ लांडे यांची ग्रंथ संकलन समितीवर निवड



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाच्या संकलनाकरीता स्थापन करण्यात आलेल्या समितीवर होळकरशाहीचे अभ्यासक रामभाऊ लांडे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर व अध्यासन संचालक डॉ.प्रभाकर कोळेकर यांनी नियुक्ती केली.सन २०२४-२०२५ हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंतीचे वर्षे असुन संबंध देशभर विविध उपक्रमातून अहिल्यादेवींचा इतिहास व जीवनचरित्र सर्व घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य केंद्र व राज्य सरकार तसेच विविध शैक्षणिक संस्था, संशोधन मंडळ आदी करीत आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने देखील २०२५ या वर्षात अहिल्याद-वींच्या जीवनचरित्रांचा चित्ररथ,स्मारक ग्रंथ, व्याख्याने,ऐतिहासिक सहल आदी उपक्रम आयोजित केले आहेत. रामभाऊ लांडे यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे..

### जालना कबड्डी असोसिएशन निवड चाचणी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुमार व कुमारी गट (मुले, मुली) च्या स्पर्धा डिसेंबर मध्ये घेण्याचे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने निश्चित केले आहे. या स्पर्धे साठी जालना जिल्ह्याचा कबड्डी संघाचे मुले व मुली संघ निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

या निवड चाचणीसाठ दि. ०१/०१/२००५ त्यानंतर जन्मलेले खेळाडू असावे असा निकष पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना स्पर्धे मध्ये सहभाग घेता येईल. स्पर्धेसाठी आवश्यक आधार कार्ड, जन्माचा दाखला (शाळेचा दाखला). याशिवाय खेळाडूंना स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही. तरी सर्व संघाच्या व्यवस्थापकांनी आपल्या संघाची नोंदणी दिनांक गुरूवार २८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत खालील संयोजकांशी संपर्क करून नाव नोंदणी करावी संजय येळवंतेः ९४२१६ ५४२१६, राहुल वाहूळे : ९८२३५ ५५८०२, बाबासाहेब मंडाळे ९८२३६ ६१८६१ आणि रविंद्र ढगे ९३२५२ ३९९९९ असे आव्हाण जालना कबड्डी असोसिएशन केले आहे. स्पर्धेचे ठिकाण जिल्हा परिषद शाळा, पिरपिंपळगाव राजूर रोड, तालुका जालना. स्पर्धा शुक्रवार २९ नोव्हेंबर २४ सकाळी ९ वाजता स्पर्धेला सुरुवात होणार आपले संघ त्वरित वरील सयोजकांडे नोंदणी करावे. उशीरा आलेल्या संघाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद संघ व्यवस्थापकांनी घेऊन वेळेवर नोंद करून सहकार्य करावे. स्पर्धे साठी मुला मुलींच्या संघासाठी २०० रुपये नोंदणी फी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे आव्हान कबड्डी असोसिएशनचे डॉ. अशोक हजारे, नंदकिशोर खर्डेकर, डॉ देवेश पाथ्रीकर, माधवी काळे, राहुल वाहुळे, बाबासाहेब मंडाळे, रामदास निहाळ यांनी केले आहे.

### विष्णु खरात यांचे आकस्मिक निधन



अंबड : दि २८ नोव्हेंबर अंबड शहरातील विष्णु गणपत खरात वय ६७ वर्षे यांचे आज दि.२८ रोजी दुपारी २ वा दरम्यान आकस्मिक निधन झाले त्यांचे पश्चात पत्नी, भाऊ,मुले मुलगी असुन शहरातील होळकर नगर स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शेतीपंपासाठी आवश्यक विज पुरवठा करण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

माहोरा येथील तिनगांवाच्या शेतकऱ्यांचा शेतीपंपाकरिता विज मिळत नसल्याने माहोरा येथील विज वितरण कार्यालावर चापनेर, धोंडखेडा, बेलोरा, या गांवच्या शेतकऱ्यांना ६ तास विज मिळावी अश्या मांगणीचे निवेदन माहोरा येथील विज वितरण चे अधिकारी नागरे यांना देऊन आम्हा शेतकऱ्यांचे पिके वाळु, सुरकुट असून नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या जिवाशी विज वितरण कर्मऱ्यांनी खेळु नये अश्या मागणीचे निवेदन इंजिनिअर नागरे यांना शेतकऱ्यांनी दिले व शेतकऱ्यांचे निवेदन विज वितरण अधिकारी नागरे नागरे यांनी शेतकऱ्यांची हेडसाळणी होणार नाही यांची दक्षता घेईल असेही नागरे इंजिनिअर यांनी शेतकऱ्यांचे स्विकारते वेळा सांगितले.

या वेळी सरपंच विनोद काळे, उमेश चव्हाण,गजानन चव्हाण, मारोती चव्हाण, माजी सरपंच विक्रम साळेकर, संदिप चव्हाण, बंटी फदाट, आत्माराम पा.अवकाळे, लिंबानी चव्हाण,सुनि चव्हाण, दिलीप काळे,



अनिल काळे, गणेश चव्हाण, नितिन चव्हाण, शुभम चव्हाण, ओम चव्हाण, सागर चव्हाण, प्रमोद चव्हाण, निवृत्ती चव्हाण, विठ्ठल चव्हाण, नंदु अवकाळे, गजानन काळे, स्वपनिल चव्हाण, आदी शेतकऱ्यांनी माहोरा येथील विज वितरण अधिकारी इंजिनिअर नागरे,यांना चापनेर धोनखेड़ा, बेलोरा, या तिन गांवाच्या शेतकऱ्यांना ६ तास विज मिळत नसल्याने आज दि. २७ नोव्हेंबर ला विज वितरण कार्यालय मोठा जमाव शेतकऱ्यांनी मोर्चा विज वितरण कडे वळवला , व शेतकऱ्याची मांगणी अशी होती. कि आम्ही तिन गांवचे शेतकऱ्याला १ दिवसा विज वितरण कडुन देत असत, मात्र नेहमी प्रमाणे शेतकऱ्यांचे म्हणे अशी दरोज मात्र ६ तास शेतकऱ्यांना पाहिजे असी ठाम भुमि शेतकऱ्यांनी ठेवली. असल्यामुळे, माहोरा विज वितरण इंजिनिअर नागरे यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून शेतकऱ्यांना ६ तास विज देण्यांचा आपण नक्कीच पर्यत करु असे आश्वसन माहोरा विज वितरणचे अधिकारी नागरे यांनी शेतकऱ्याशी बोलतांना सांगितले.,

शेतकऱ्यांशी आप्रेटर,लाई मन, व्यवस्थीत बोलत नाही, उडावा, उडवी, उत्तरे, व आरे रे चे भाषा शेतकऱ्यांना वापतात अशी तक्रार देखिल कर्मचाऱ्यांची शेतकऱ्यांनी विज वितरणचे अधिकारी नागरे यांचे कडे केली. या शेतकऱ्यांच्या तक्रारी अधारे इंजिनिअर नागरे यांनी विज कर्मचारी यांना चांगलीच तंब्बी देऊन कानउघडणी केली. व या पुढे असे काही शेतकऱ्यांची हेडसाळणी होणार नाही यांची काळजी विज वितरण नक्कीच दखल घेईल असे शेतकऱ्यांना विज वितरण अधिकारी नागरे यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

# श्रीक्षेत्र नांगरतास येथे पुण्यतिथी सोहळ्याची महाप्रसादाने सांगता

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



श्री क्षेत्र नांगरतास महादेव संन्यासाश्रम पंचायती आनंद आखाडा येथे महान तपस्वी महंत सद्गुरू महंत रामगिरीजी महाराज व महंत सेवागिरी महाराज यांच्या तीन दिवशीय पुण्यतिथी सोहळ्याची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. यावेळी हजारो भाविक त्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

प्रभू श्रीरामचंद्राच्या पदस्पशनि पावन झालेल्या भूमीमध्ये व महान तपस्वी सगुरु महंत रामगिरीजी महाराज यांच्या तपोभुमीमध्ये पुण्यतिथी सोहळ्यात महान तपस्वी महंत सद्गुरू महंत रामगिरीजी महाराज व महंत सेवागिरी महाराज महाराज यांच्या समाधीचे पुजन, अभिषेक, महाआरती भागवतगिरीजी महाराज व बालकगिरीजी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाली. या पुण्यतिथी सोहळ्यात हरिकीर्तन, दीपमहोत्सव, चक्रीभजन, हरिपाठ, हनुमान चालीसा पठण करण्यात आले. तसेच यावेळी हभप वामन महाराज बहेकर यांचे हरिकीर्तन संपन्न झाले. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास हजारोच्या संख्येने भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होते. महान तपस्वी परमपूज्य महंत रामगिरीजी महाराज व महंत सेवागिरीजी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा मागील ४६ वर्षापासून भक्तीमय वातावरणामध्ये श्री क्षेत्र नांगरतास येथे महंत भागवतगिरीजी महाराज व महंत बालकगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. श्री क्षेत्र नागरतास येथे पुण्यतिथी सोहळ्यास आल्यानंतर या ठिकाणी एक आत्मिक समाधान मिळते - मंठा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक वैजनाथ बोराडे

# मुख्य आगारप्रमुख यांना विविध मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**



परतूर बस आगारातील विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत मुख्य आगार प्रमुख देशमुख मॅडम यांना परतूर रेल संघर्ष समितीच्या वतीने निवेदन देण्यात आले.. यामध्ये प्रामुख्याने परतूर आगारातून अक्कलकोट, कोल्हापूर, सज्जनगड, भुसावळ, मुक्ताईनगर, सप्तशृंगी देवी वणी, त्र्यंबकेश्वर, शेगाव, तेल्हारा, माहूरगड, पुणे मार्गे पैठण शेवगाव येथे जाण्यासाठी एसटी बसेस सुरू करण्यासोबत परतूर आगाराला महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा मुख्यालयाला जोडण्यासाठी बस सेवा सुरू करण्यात यावी. तसेच परतूर आगारातील बसेस महादेव मंदीर, रेल्वे स्थानक मार्गावरून सोडण्यात याव्यात, त्यासोबतच रेल्वे स्थानकाजवळ मिनी बस स्थानक सुरू करण्यात येऊन परतूर बस आगाराकडे येणारे सर्व रस्ते दुरुस्त करण्यात येऊन आगार परिसरात सुशोभीकरण करण्यात येऊन विविध प्रवासी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावेत. यासोबतच नगरपालिकेकडून फुटलेली पाणीपुरवठा लाईन दुरुस्ती करणे व २४ तास पाणी उपलब्ध करून देणे, बस स्थानकावर वाढीव स्टाफ भरती करणे व नवीन बसेसची अधिक उपलब्धता करणे, बस स्थानक परिसरात पोलिस पेट्रोलिंग करून सुरक्षा वाढवणे आदी समस्यांवर सुद्धा दखल घेत योग्य पाऊले उचलण्यात यावेत इत्यादी मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी आगार प्रमुख यांच्या सोबत सकारात्मक चर्चा झाली आणि त्यांनी नक्कीच ह्या मागण्या पूर्ण करण्याचे प्रयत्न करू असे सांगितले. निवेदनाची प्रत परतूरचे आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर यांना सुद्धा देण्यात आली आहे. निवेदनावर डॉ. स्वप्नील बी. मंत्री अध्यक्ष परतूर रेल संघर्ष समिती, डॉ सुधीर आंबेकर, अनिल अग्रवाल, बाळासाहेब सोळंके, सखाराम कुलकर्णी, अमोल अग्रवाल, आनंद कोटेचा, अजित पोरवाल, आनंद बगडीया व सर्व समिती सदस्यांच्या सह्या आहेत.

# सदाभाऊ खोत यांना मंत्रिमंडळात स्थान द्या -जिल्हाध्यक्ष गजानन राजबिंडे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



शेतकरी नेते सदाभाऊ खोत यांना महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात स्थान देण्याची मागणी रयत क्रांती संघटनेचे जालना जिल्हाध्यक्षव नांदेड संपर्कप्रमुख गजानन राजबिंडे आणि राज्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांची सदाभाऊंना मंत्रिमंडळात स्थान मिळवण्यासाठी आग्रही आहेत रयत क्रांती संघटनेचे सर्वेसर्वा व महायुतीचे घटक पक्ष असलेल्या रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेतकरी नेते सदाभाऊ खोत गेल्या अनेक वर्षांपासून महायुतीमध्ये निष्ठेने काम केले आहे.महायुतीतील अनेक उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले हातकलंगले लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री धैर्यशीलजी माने यांना २०१९ व २०२४ या दोन्ही लोकसभेमध्ये निवडून आणण्याचे काम सदाभाऊ खोत यांचा सिंहाचा वाटा आहे त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील मोठा शेतकरी वर्ग हा सदाभाऊ खोत यांचा चाहता आहे शिवाय गेल्या अनेक वर्षापासून सदाभाऊ खोत हे महायुतीचे व महायुतीच्या सरकारची कार्य सर्वसामान्य जनतेपर्यंत व शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील रयत क्रांती संघटनेचे सर्वच पदाधिकारी व कार्यकर्ते त्याप्रमाणे शेतकरी वर्ग यांची सदाभाऊ खोत यांना पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये मंत्रीपद पाहण्याची इच्छा व उत्सुकता आहे याच पार्श्वभूमीवर रयत क्रांती संघटनेच्या महाराष्ट्र राज्यातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देवेंद्रजी फडणवीस,एकनाथजी शिंदे,अजित दादा पवार यांच्याकडे आदरणीय सदाभाऊंना मंत्रिमंडळात विस्तारामध्ये स्थान देण्याबाबत विनंती केली आहे व निश्चितपणे एका शेतकरी नेत्याला महाराष्ट्र राज्य सरकार मध्ये मंत्रीपदावर बसवून महायुतीचे सर्व माननीय नेते शेतकऱ्याच्या व रयत क्रांती संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भावनाचा आदर करतील हीच अपेक्षा असल्याचे रयत क्रांती संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष गजानन राजबिंडे यांनी केली.

## महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपा जिल्हा जालनाच्या वतीने अभिवादन

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य प्रेरणादायी -भास्कर दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारताच्या शैक्षणिक क्रांतीचे जनक, थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांच्याहस्ते भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय, जालना येथे दि.(२८) रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




या प्रसंगी भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे म्हणाले की, भारतातील समाजसुधारक, विचारवंत, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते म्हणून महात्मा फुले यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'सत्यशोधक समाज' या संघटनेची स्थापना केली होती, ज्याचा उद्देश समाजातील तळागाळातील लोकांच्या उन्नतीसाठी काम करणे हा होता. महात्मा फुले यांचे संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यात गेले. त्यांनी शेतकरी आणि मजुरांच्या हक्कांसाठीही काम केले. यासोबतच त्यांनी महिलांसाठी देखील खूप काम केले. मुलींना शिक्षण देणे, बालविवाह थांबवणे अशी कामं त्यांनी केली. ज्योतिबा फुले यांनी पत्नी सावित्रीबाई यांना स्वतः शिकवले आणि त्यांना शिक्षिका बनवले. यानंतर सावित्रीबाईंनी मुलींसाठी सुरू केलेल्या शाळेत शिकवायला सुरुवात केली होती. महात्मा फुले यांचे विचार समाजातील एका मोठ्या वर्गाला प्रेरणा देणारे आणि क्रांती निर्माण करणारे आहे असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, सोपान पेंढारकर, सिध्देश्वर हसबे, प्रा.राजेंद्र भोसले, राजेश जोशी, डोंगरसिंग साबळे, सय्यद इम्रान, सोमेश काबलिये, शाम उगले, जगदीश येनगुपटला, सागर भानुशाली विठ्ठल नरवडे, शरद आम्ले, गजानन खंडगळे आदीसह भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# निवडणुकीत जातीवाद झाला; तरीही सर्वांची साथ मिळाली : आ. चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २८ नोव्हेंबर**

विधानसभेच्या निवडणूकीत जातीवाद झाला..पण हे अतिशय धोकादायक आहे. राजकारणात ज्यांनी जातीवर केले ते पुढे यशस्वी झाले नाहीत पण कधी नव्हे इतका त्रास कार्यकर्त्यांना सुद्धा झाला. पण मला सर्व माहिती आहे कोण काय केले आहे ते दूध का दूध... पाणी का पाणी होईल आता विरोधात काम करणाऱ्यांना पुन्हा घेणे नाही. तुम्ही संयम ठेवा सर्व जाती धर्माच्या मतदारांनी तसेच बाहेरील मित्रपरिवारानी माझ्यासाठी एकजुटीने प्रयत्न केले हा एकजुटीचा सर्व जाती धर्मच्या लोकांचा विजय असून जातीवाद करणाऱ्यानी या मतदारसंघाने नाकारले ही आपला सदैव ऋणी आहे. अशी कृतज्ञता नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली आहे.

नवनिर्वाचित आमदार प्रतापराव विजयी झाल्या नंतर पहिल्यांदा लोह्यात आले त्याचे उत्स्फूर्त उत्साहात ..अभूतपूर्व स्वागत लोहा शहर वासीयांनी केले. व्यंकटेश गार्डन येथे मतदारांचे जाहीर आभार सोहळा आयोजित करण्यात आला होता.व्यासपीठावर जिल्ह्याध्यक्ष दिलीप धर्माधिकारी ,माजी नगराध्यक्षा कल्याणराव सूर्यवंशीसंध्याताई राठोड , माणिकराव मुकदम किरण वट्टमवार, प्राणितात‍ाई देवरे चिखलीकर, प्रवीण पाटील, आनंदराव पाटील, हंसराज पाटील बोरगावकर, मनोहर पाटील , केशवराव मुकदम ,छत्रपती धुतमल , नाना तिडके, करीम शेख, सचिन पाटील चिखलीकर, शोभाताई बगडे, जफारोद्दीन बहोद्दीन, हरिभाऊ चव्हाण, दता वाले, नरेंद्र गायकवाड, दीपक पाटील, अविनाश



सूर्यवंशी, भगवान हाके , सचिन मुकदम, हरिभाऊ चव्हाण यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी कार्यकर्त्यांचे मतदारांचे आभार मानताना त्याचा कंठ दाटून आला होता.जातीवाद मोठ्या प्रमाणात झाला सर्व उमेदवारानी माझ्या वाट्टेल ते बोलले ज्याची लायकी नव्हती तेही बोलले पण मी संयम ठेवला शांत होतो.आता येणाऱ्या काळात माझट निवडणूकीत ज्यांनी मला मदत केली माझ्या साठी ज्यांनी प्रामाणिकपणे काम केले त्याना मी दूर करणार नाही. केंद्रात राज्यात आपली सत्ता आहे. प्रामाणिक कार्यकर्ता माझ्यासाठी गावात प्रयत्नशील राहिला.जातीवाद प्रचंड झाला पण एका जातीवाद निवडणूक होत नाही आणि ज्यांनी जातीवर मते मागितली त्यांना इतर जातीच्या लोकांनी नेहमीच धडा शिकवला आहे.ज्यांनी ज्यांनी सोबत राहून दगा दिला त्याची माझ्याकडे नोंद आहे.माझ्या सारख्या कार्यकर्त्यांना तुम्ही नेहमीच साथ दिली आडचणीच्या काळात एकजुटीने राहिलात आणि हा विजय सर्व जातीधर्मचा लोकांचा आहे मतदारांचा आहे मतदारसंघात एखादाउद्योग आणण्याचा माझ्या प्रयत्न राहणार आहे.आपले सर्वांचे आभार मानतो असा शब्द प्रतापरावांनी कृतज्ञता व्यक्त केली संचालन व आभार बी डी जाधव, भास्कर पाटील यांनी केले.

**प्रचंड उत्साह..... अभूतपूर्व स्वागत**

कंधार मार्गे लोह्यात आगमन झाल्या नंतर नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर याच्यावर सहा जेसीबी मधून फुलांची उधळण करण्यात आली .छत्रपती शिवाजी महाराज डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर ,पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवाद केले पुण्यश्लोक अहिल्यादेवी चौक यास त्यांनी पुष्पहार अर्पण केला

शहरात अभूतपूर्व . उत्साहात स्वागत करण्यात आले कोण आला रे..कोण आला..मन्याड चा वाघ आला ..असा घोषणानी परिसर दुमदुमला

**प्रतापराव पाटील चिखलीकर गहिरवले**

जातिवादात ही निवडणूक झाली पण जनतेनी माझ्यावर प्रेम केले आणि एकजुटीने विजय मिळवून दिला हे मी कधी विसरणार नाही असे मतदारांचे आभार व्यक्त करताना प्रतापरावांचा कंठ दाटून आला. ते गहिरवले.विरोधात काम करणाऱ्याना माफी नाही असा शब्दात त्यांनी संकेत दिले.

## संक्षिप्त वृत्त

### कु.रागिणी चौदंते या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत निवड



**मुदखेड**-मुदखेड शहरातील सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल ची विद्यार्थिनी कु.रागिणी राजरत्न चौदंते हीने शालेय स्तरावरील कराटे स्पर्धेत लातूर विभागात प्रथम आली, तसेच विभागीय कराटे स्पर्धेत ३८ ते ४२ वजन गटात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्यामुळे धुळे येथे होणाऱ्या शालेय स्तरावरील राज्य पातळीवरील कराटे स्पर्धेत कु. रागिणी चौदंते या विद्यार्थ्यांनीची निवड झाली.या यशाबद्दल मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे, क्रीडाशिक्षक माधव गाडेगावकर, ज्ञानेश्वर बायेस, टि बि पवार, डी जी धनगरे, जी बी गुजरवाड, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता लाटकर, शिक्षिका हेमलता व्यास, यासह आई, वडिल, व चौदंते परिवारासह आदिंनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

### तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचा आत्मदहनाचा प्रयत्न

**नवीन नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथील तासिका तत्त्वावरील कार्यरत आसलेल्या प्राध्यापकांचा कुलसचिवांच्या कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न करण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथील प्रस्तुत विद्यापीठात स्त्री अध्ययन केंद्र येथे तासिका तत्वावर काम करणाऱ्या सहाय्यक प्राध्यापक गजानन इंगोले व मेघनाथ खडके यांनी चार महिने केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला वेळोवेळी मागणी करूनही न मिळाल्यामुळे संचालकाच्या त्रासाला कंटाळून कुलसचिवांच्या कार्यालयात जाऊन अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

### उमरीत सतं दासगणू महाराज यांना साईबाबा संस्था तर्फे वस्त्र अर्पण



**उमरी**-महाराष्ट्रातील संताची भुमी म्हणून गोरठा येथिल दासगणू महाराज यांचे नाव अग्रेसर असून त्यांच्या पुण्यतिथी निमित्त गुरू सद्गुरू साईबाबा संस्थानं तर्फे समाधीस वस्त्र अर्पण करण्यात आले आहे. उमरी तालुक्यातील मौजे गोरठा येथे दरवर्षीप्रमाणे संत दासगणु महाराज पुण्यतिथी निमित्य साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या वतीने श्रीसाई मंदिर प्रमुख विष्णू थोरात, पुजारी उपेंद्र पाठक , नवणाथ मते जनसंपर्क कार्यालय प्रतिनिधी, नामदेव डोमे ( चोपेदार) संत दासगणु महाराज समाधीला यांचे कडून वस्त्र अर्पण करण्यात येते यंदा ही गोरठा संस्थान कडून सर्व शिर्डी हुन आलेल्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला असून साईधर्म परमपंरा कायम ठेवली आहे. तसेच श्री संत दासगणू महाराज संस्थानं विश्वस्त विक्रम महाराज, गोविंद काका शिरूरकर, सुभाष देसाई, कवतीकवार, यांना श्विष्णू थोरात, उपेंद्र पाठक महाराज यांचे वतीने साई प्रसाद देण्यात आला. यावेळी गोविंद नलबलवार, नगरसेवक प्र .अशोक मामीडवार, विष्णू अट्टल, गोपाळ राठोड नरसिंग मुक्कावार, शिवा गोडगे व सर्व साईभक्त गण हजर होते.

### मुदखेड येथे ज्ञानेश्वर माऊली समाधी सोहळा

**मुदखेड**-मुदखेड शहरात श्री विठ्ठलेश्वर मंदिर येथे ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा व सद्गुरु संतकवी श्री दासगणू महाराज यांच्या स्मरण दिनानिमित्त हरिभक्त परायण श्री भास्कर महाराज कामारीकर यांचे कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कीर्तनकार भास्कर महाराज कामारीकर यांनी दासगणू महाराज यांच्या चरित्रातील परोपकारी संत पृथ्वीवर जे अवतार घेतात त्यामध्ये श्री ज्ञानेश्वर माऊली व दासगणू महाराज हे संत आपल्याला मार्गदर्शनासाठी वैकुंठा होऊन आले अशा सद्गुरु पुरुषांची पुण्यतिथी मुदखेड शहरात विठ्ठल मंदिरात मोठ्या भक्तिभावाने साजरी केली जाते ही परंपरा कायम आहे. या पुण्यतिथीनिमित्त मागील नऊ दिवसापासून येथील विठ्ठल मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण नंदकुमार मामीडवार यांनी वाचन केलं या पारायण सोहळात येथील असंख्य महिला भगिनींनी सहभाग घेतला. दि. २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी व पारायण सोहळा तसेच काल्याचे किर्तन संपल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल मंदिराचे अध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, देविदास राव कवळे, हरिश्चंद्र काळे, शंकरराव आरेवाड, डॉ सुरेश मेगदे, पुजारी अरुण मानवतकर महाराज, गोविंदराव काळेकर, बालाजी काळे, गिरीश काळे, शरद कवळे, राम जोशी, आनंदा ढगे, गोविंद राठोड, दत्तात्रेय मोडवान यांच्या सह श्री दासगणू महाराज भक्त मंडळ व विठ्ठलेश्वर संस्थान तसेच युवकांनी परिश्रम घेतले.

### सोनखेड पोलीस स्टेशन तर्फे व्यसनमुक्ती आणि आरोग्य शिबिराचे आयोजन

**सोनखेड**-सोनखेड येथील बाजार मैदानावर १ डिसेंबर रोजी सकाळी ०९ वाजता भव्य असे व्यसनमुक्ती शिबिर तसेच नेत्र तपासणी शिबिर व मोफत रक्त तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरात सोनखेड पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गावचे पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष आणि ग्रामरक्षक दलाचे सदस्य तसेच सरपंच, उपसरपंच व गावातील सामाजिक कार्यात रस असलेल्या सर्व नागरिकांना या सामाजिक कार्यात सहभाग घेण्याचे आवाहन सोनखेड पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे. सोनखेड येथे जास्तीत जास्त लोकांना हजर ठेवावे जेणेकरून व्यसनामुळे होणारे नुकसान तसेच मोफत नेत्र तपासणी आणि मोफत रक्त तपासणी व त्यावरील औषधे नागरिकांना मिळतील व त्यांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांना होईल. यादृष्टीने गावचे पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष व ग्राम रक्षक दलाचे सदस्य यांनी गावातील कमीत कमी २० लोकांना हजर ठेवायच आहे आणि त्यांनी स्वतःही सक्रिय सहभाग सदर शिबिरामध्ये नोंदवायचा आहे.

## मंत्रीमंडळात आ. डॉ. तुषार राठोड यांची वर्णी लागण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. २८ नोव्हेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मंत्रीमंडळ गठीत होणार असल्याने. आलेल्या माहिती नूसार राज्य मंत्री मंडळात जेष्ठ नेत्यांचा पत्ता कट होणार असल्याने मंत्री मंडळात मूखेड चे तरुण आ.डॉ. तूषार राठोड यांचा समावेश होण्याची दावेदारी मजबूत झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता सर्वांना वेध लागले ते मंत्रीमंडळाचे.मूखेड येथील जाहीर सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मतदारांना आवाहन करतांना म्हणाले होते की,आ.डॉ. तूषार राठोड यांना आमदार करा मि 'नामदार 'करतो.त्या प्रमाणे निवडणुकीत विजयाची हॅट्रिक करत दिमाखदार विजय मिळवला.सोबत महायूतीला बंपर यश मिळाले असल्याने मंत्री पदाचे अनेकांना वेध



लागले असल्याने रस्सीखेच सूरु झाली. मिळालेल्या माहितीनुसार मंत्रीमंडळात जेष्ठ नेत्यांचा पत्ता कट होणार असल्याने तरुण आमदारांचा मंत्रीमंडळात समावेश होण्याची शक्यता बळावली आहे. मूखेड चे आ.डॉ. तूषार राठोड यांना जाहीर सभेत दिलेल्या मंत्री पदाच्या आश्वसनाची पूर्ती करण्याची मागणी जोर धरत आहे.आ.तूषार राठोड यांना मंत्री पद दिल्यास जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष अधिक मजबूत होईल व बंजारा समाज हा भाजपच्या पाठिशी अधिक मजबुतीने उभा राहील याचा फायदा येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूत होईल अशी अटकळ बांधली जात आहे. जिल्हात आ.डॉ.तूषार राठोड हे सलग तिन वेळा विजयी झाले व मंत्री मंडळ तरुण असल्याच्या शक्यतेने मंत्रीपदावर दावेदारी अधिक मजबुत झाली आहे.

## २ डिसेंबरला लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

जिल्हा प्रशासनाच्यावतीने सोमवार २ डिसेंबरला नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये आपल्या तक्रारीसह उपस्थित व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

दणीची सुरूवात दुपारी १२ वा. होणार आहे. त्यानंतर लगेच प्राप्त झालेल्या अर्जावर सुनावणी घेण्यात येणार आहे. नागरिकांनी दुपारी १ ते ३ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात उपस्थित रहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे.

## जंतनाशक अभियान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

राज्यात ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येत असून याअंतर्गत १ ते १९ वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी दिली जाणार आहे. ही गोळी चावून खाणे गरजेचे आहे किंवा पाण्यात घेता येईल. या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांनी केले आहे.

## नगरपालिकेच्या बचतीकडे विशेष लक्ष देणार : मुख्याधिकारी गौरव वांडेकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २८ नोव्हेंबर**

हदगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदी गौरव वांडेकर यांनी काही दिवसांपूर्वीच मुख्याधिकारी पदाचे सूत्रे हाती घेतल्यानंतर निवडणुकीच्या आलेली जबाबदारी पार पडत आपले लक्ष आता नगरपालिकेच्या बचतीकडे राहणार असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आपले मत व्यक्त केले तर पाणीपुरवठा या ठिकाणी सोलार योजना बसवून आर्थिक बचत कशी होईल याकडे पण आपले विशेष लक्ष राहणार असल्याचे सुद्धा त्यांनी सांगितले.



काही दिवसापूर्वीच हदगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकारी पदी गौरव वांडेकर हे रुजू झाले असून ते यापूर्वी छत्रपती संभाजीनगर मनपात सह आयुक्त या महत्त्वाचे पदावर कार्यरत होते त्या ठिकाणीचा कामाचा अनुभव या ठिकाणी नक्कीच येणार असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले पुढे बोलताना म्हणाले की, हदगाव शहरातील जनतेला मूलभूत सुविधा व भौतिक सुविधा यांच्याशी संबंधित असणाऱ्या समस्यांना आपले प्राधान्य राहणार असून स्वास्थ, स्वच्छता, कचऱ्याचे प्रश्न, सुशोभीकरण, वाचनालयाचे प्रश्न असो विशेष म्हणजे पाणीपुरवठा करणाऱ्या ठिकाणी सोलार योजना राबवून महावितरणाचे येणारे बिल वाचून नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ कशी करता येईल याची व्यवस्था करण्यात येईल. डम्पिंग ग्राउंड व हदगाव शहरातील ड्रेनेज लाईन यासाठी विशेष पाठपुरावा करून त्यासाठी निधी उपलब्ध करून या समस्यांचे कायमस्वरूपी निराकरण करण्यात येईल. नगरपालिकेतील सर्वच विभागाचे कर्मचारी यांची बैठक घेतली असून शहराच्या विकासाच्या बाबतीत अपूर्ण राहिलेल्या सर्व प्रश्नांवरती विशेष लक्ष देऊन लवकरात- लवकर मार्गी लावण्यात येतील असेही शेवटी म्हणाले.

## भाजप महायुतीला आंबेडकरी मतदारांची साथ : बापूराव गजभारे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २८ नोव्हेंबर**

राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत आंबेडकरी मतदारांनी प्रथमच भाजप शिवसेना राष्ट्रवादी रिपब्लिकन महायुतीला मोठ्या प्रमाणात मतदान केले आहे.असा दावा पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राज्य महासचिव बापूराव गजभारे यांनी केला आहे.बहुसंख्य आंबेडकरी समाजाचे मतदार असलेली शहरी व गावखेड्यांच्या बूथवर महायुतीच्या उमेदवारांचा मतांचा टक्का वाढल्याचे दिसून येते



मागील दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जागतिक पातळीवर उचित सन्मान आणि दलित आदिवासी बहुजन समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध कल्याणकारी योजना लागू केल्याचा परिणाम हे एक मतदारांना आकर्षित करण्याचे कारण आहे. तसेच महाराष्ट्रात महायुती सरकारने अडीच वर्षात सर्व घटकांसाठी अनेक कल्याणकारी योजना मंजूर केल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने लोकप्रिय लाडकी बहीण ,लाडका भाऊ,शेतकरी सुशिक्षित बेरोजगारनां मानधन मुख्यमंत्री कौशल्य विकास प्रशिक्षण, रुग्णांना तात्काळ अर्थसाह्य सर्व समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ,पत्रकार ते ऑटो रिक्षा चालकांसाठी आर्थिक विकास महामंडळ बार्टीच्या धर्तीवर अर्टीची स्थापना केली.

सर्व समाजाच्या महापुरुषांचे स्मारक,वारकऱ्यांसाठी आर्थिक तरतूद तीर्थ यात्रा दर्शन योजना असे निर्णय घेऊन ताबतोब अंमलात आणले. योजना लागू करतांना कुठलाही भेदभाव केला नाही.

१८ - १८ तास जनतेची सेवा करणारा मुख्यमंत्री महाराष्ट्राने पहिल्यांदाच पाहिला दोन्ही उपमुख्यमंत्री यांची योग्य साथ आणि समन्वयामुळे राज्याची भक्कम प्रगतीकडे वाटचाल पाहून आंबेडकरी समाजातील अधिकारी,कर्मचारी ,कार्यकर्ते व सुशिक्षित लोकांनी दलित मतदारांमध्ये महायुती सरकार बद्दल सकारात्मक विचाराची पेरणी केल्यामुळे हे परिवर्तन दिसून आले. सातत्याने आंबेडकरी मतांची विभागणी करणाऱ्या नेतृत्वाला शहरी आणि ग्रमीण भागातील समाजाने यावेळी नाकारले आहे.या निवडणुकीत एकूण झालेल्या मतदाना पैकी बसपाने २३७ उमेदवार उभे करून ०.४८ टक्के मते घेतली तर वंचितने २०० उमेदवार उभे करून ३.१ मते घेतली इतर आंबेडकरी संघटनांनी जवळपास ७०० उमेदवार उभे केली होती त्यांच्या मताची संख्या नग्न आहे .जातीची व्होटबँक या नितीमुळे केवळ उमेदवारांचे आर्थिक व राजकीय चांगभलं होत असून समाजाचे नुकसान होत असल्याचे बापूराव गजभारे म्हणाले.

## लाडक्या बहिणींचा आशिर्वाद यामुळेच माझा विजय : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २८ नोव्हेंबर**

अडीच वर्षांच्या अल्पशा कालावधीत मतदारसंघात केलेल्या तब्बल २५०० कोटींच्या विविध विकासकामांमुळेच जनता जनार्दनाने माझ्यावर पुन्हा विश्वास दाखवला असून,लाडक्या बहिणींचा आपल्या जबाबदार भावाला मतदान रुपाने भरभरून मिळालेला आशीर्वाद हा सोने पे सुहागा ठरुन माझा विजय सुकर झाला असल्याचे कृतज्ञतापूर्ण मत किनवट/माहुर विधानसभा मतदारसंघात दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार भीमराव केराम यांनी आमच्या प्रतिनीधीजवळ व्यक्त केले.

किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघात लगातार तीन निवडणुकीत विजय मिळवत हॅटट्रिक रचलेले प्रदीप नाईक यांना २०१९ ला मी पराभूत करत,विजयी चौकार मारण्यापासून रोखले.परंतू, त्यानंतर कोरोना महामारीचे जागतिक संकट कोसळले, देशात लॉकडाऊनची भयंकर परिस्थिती निर्माण झाल्याने सर्व व्यवहार ठप्प होऊन आर्थिक मंदी आली.परिणामी मतदारसंघात प्रथम अडीच वर्षांच्या कालावधीत कुठलीही विकास कामे करता आली नाही.मात्र, पुढील अडीच वर्षांच्या अल्पशा कारकिर्दीत



राज्य सरकारकडून २५०० कोटी रुपयांचा भरघोस विकास निधी खेचून आणला. त्यातून, मतदारसंघात रस्ते,पुल, पैनगंगा नदी पात्रात उच्च पातळी बंधारे,लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या दत्तशिखर येथील प्रसादालयाचे बांधकाम, दत्तशिखर ते अनुसयामाता मंदिराकडे जाणारा रस्ता, अनेक गावात समाज मंदिराचे बांधकाम,यासह विविध विकास कामे करण्यात आली.

विशेषतः केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी विकास योजनांची माझ्या मतदारसंघात अंमलबजावणी करुन त्याचा जनतेला लाभ मिळवून दिला.राज्यात लोकप्रिय होऊन सुपरहिट ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मतदारसंघातील जवळपास ९५हजार लाडक्या बहिणींना लाभ मिळवून दिल्याने या निवडणुकीत लाडक्या बहीणी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या याचे करावेत तेवढे कौतुक कमीच आहे.लाडक्या बहीणींचा भक्कम आशिर्वाद आणि मतदारसंघात केलेल्या अभूतपूर्व विकासकामांची दखल घेऊन मतदारांनी मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन दुसऱ्यांदा निवडुन देत मी राबविलेल्या योजना व केलेल्या विविध विकास कामांची विजयाचा ठसा मारलेली जणू पोच पावतीच दिली असल्याचे सांगतानाच त्याला भक्कम जोड मिळाली ती माझ्या महायुतीचे विशेषतः भाजपाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व समर्थक यांनी घेतलेल्या जिवापाड परीश्रमाची

त्याला भक्कम जोड मिळाल्याने माझा विजय आणखी सुकर व सुनिश्चित झाला असल्याची आमदार भीमराव यांनी महत्त्वाची पुष्टी जोडत मतदारसंघातील तमाम मतदारांचे आभार मानले.मतदारांच्या या विश्वासाला मी कदापी तडा जाऊ देणार नसल्याचे सांगत निश्चितच या संधीचे सोने करीन !अशी ग्वाही देखील यावेळी आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधतांना दिली.

## देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर भीमराव केराम मंत्री बनावे यासाठी मारोतीरायाला महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २८ नोव्हेंबर**

भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी तसेच किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे यासाठी किनवट येथील भारतीय जनता पार्टीच्या शहर कार्यकारिणीने येथील पुरातन मारोती मंदिरात महाआरती करून साकडे घातले आहेत.



८३ किनवट विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे भीमराव केराम यांनी ऐतिहासिक विजय प्राप्त केला.भीमराव केराम यांनी महायुतीकडून या मतदारसंघात दुसऱ्यांदा विजयश्री खेचून आणल्याने त्यांना मंत्रिपद मिळणार असल्याची चर्चा आहे. मागील काळात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भीमराव केराम यांनी किनवट माहूर मतदारसंघात दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त विकास निधी खेचून आणला. किनवट माहूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी अशी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भावना आहे तर यावेळेस किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे अशी किनवट माहूर तालुका वाशीयांची मागणी आहे. दरम्यान भाजपा शहर कार्यकारणीच्या वतीने सतीश बिराजदार,प्रा. विश्वास कोह्वारीकर, माजी नगरसेवक शिवा आंधळे,जगदीश तीरमनवार, नरसिंग तक्कलवार,कृष्णा कलकुंटलावार,गजानन शिवणकर नागेश येनाबत्ती,गणेश कोल्हे, शंकर कोल्हे, विशाल पाम्पटवार, रमेश शिंगेवार, हरिओम संतोष, पिंटू पांडे व जगदीश तीरमनवार यांनी दिनांक २७ नोव्हेंबर रोजी येथील पुरातन मारोती मंदिरात जाऊन महामारती केली असून यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागावी व भीमराव केराम यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे यासाठी देवाला साकडे घातले आहेत.


## ग्रामपंचायत कर्मचारी भरती जाहिरात

**जाहीर प्रगटन**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ६१ अन्वये ग्रामपंचात दिवशी (बु) ता. भोकर जि. नांदेड यांच्याकडून ग्रामपंचायत पंप ऑपरेटर (एकुण ०१ पद) या पदासाठी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील पात्र उमेदवाराकडून दिनांक २९/११/२०२४ ते दिनांक ०७/१२/२०२४ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत अर्ज मागविण्यात येत आहे.

हे पद हंगामी असून प्रथम ०३ महिन्याची नेमणूक दिली जाईल. त्या नंतर कामाचा आढावा घेऊन काम समाधानकारक असल्यास पुढील नेमणूक आदेश देण्यात येईल. नेमणुक पुढे चालु ठेवणे अथवा रद्द करणे हे ग्रामपंचायत ठरवील. अर्ज केलेल्या उमेदवारातून नियमानुसार पात्र उमेदवाराची निवड केली जाईल. तसेच मुलाखत घेण्यात येईल. त्या बाबत स्वतंत्र सूचना ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर लावण्यात येईल.

**अर्ज करण्यासाठी नेमणुकीच्या अटी व शर्ती**

**पदाचे आरक्षण** : मागासवर्गीय उमेदवार तसेच संबंधीत कामाचा तांत्रीक अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
**शैक्षणिक पात्रता** : किमान ७ वी पास
**कामाचे स्वरुप** : ग्रामपंचायत पंप ऑपरेटर या पदासाठी शासनाने व ग्रामपंचायतीने वेळोवेळी नेमण दिलेली सर्व कामे
**मासिक मानधन** : ग्रामपंचायतीच्या नियमानुसार. (०३ महिन्याचा कालावधी समाधानकारक असल्यास पुढील नेमणुक आदेश देण्यात येईल. शासन किमान वेतन प्रमाणे व भत्ते देय राहील)
**वयोमर्यादा** : १) सर्वसाधारण (खुला) प्रवर्गातील उमेदवारासाठी-१८ ते ३८ वर्ष
२) मागासवर्गीय उमेदवारासाठी १८ ते ४३ वर्ष

**स्वाक्षरित /-**
ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय दिवशी (बु) ता. भोकर जि. नांदेड

**स्वाक्षरित /-**
सरपंच ग्रामपंचायत कार्यालय दिवशी (बु) ता. भोकर जि. नांदेड

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# महामार्गांमुळे विकासाला चालना मिळेल

## खा.बजरंग सोनवणेंनी घेतली नितीन गडकरींची भेट

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२७ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्याच्या विकासासाठी राष्ट्रीय महामार्गांचे जाळे निर्माण होणे नितांत गरजेचे आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना मंजुरी देवून बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांचा केंद्राकडे पाठपुरावा सुरु आहे. त्या अनुषंगाने खा.सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे.

बीड जिल्ह्याचा म्हणावा तेवढा विकास झालेला नाही. त्यामुळे बीडच्या भोवताली राष्ट्रीय महामार्गांचे जाळे तयार झाल्यास शेतकरी, उद्योगधंदे, व्यवसायीक, नागरिकांना दळणवळण सोपे होवून त्यांच्या विकासात आणखीन भर पडेल. यासह महत्त्वपूर्ण मागण्या संदर्भात खा. बजरंग सोनवणेंची मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत चर्चा झाली.

यावेळी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग ५० हा, उमापुर फाटा-धोंडराई-उमापुर - बोधेगाव-शेवगाव ते नेवासा हा रस्ता राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट करण्यात यावा. तसेच राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी व ५४८ सी वरील प्रमुख शहरांच्या भोवती नवीन बाह्य वळण रस्ता मंजूर करण्यात यावा. बीड शहरासाठी राष्ट्रीय महामार्ग-५२ च्या जंक्शनपासून पालवण, तळेगाव, वासनवाडी, रामनगरपर्यंतचा बायपास रस्ता मंजूर करण्यात यावा. राष्ट्रीय महामार्ग १६ पिठ्ठी पिंपळगाव धस - गारमाथा - डोंगरकिन्ही - अंमळनेर - धामनगांव- टाकळी काझीपर्यंतचा रस्ता राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट करण्यात यावा. बीड शहरालगतच्या राष्ट्रीय महामार्गाच्या वळण रस्त्यालगत सर्व्हिस रोड आणि व्हीयुपी कामास मंजुरी देण्यात यावी. सदरी कामे मंजूर झाल्यास बीड जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल.त्यामुळे नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होती.अशी मागणी निवेदनातून केली.



यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मागण्या संदर्भात सकारात्मक चर्चा करून, येत्या काळात बीड जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी निधी मंजूर केला जाईल. असा शब्द केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी खा. बजरंग सोनवणे यांना दिला. त्यामुळे आगामी काळात बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग आणि इतर विकासाची कामे निश्चितच जलद गतीने मार्गी लागणार आहेत. सदरील विकास कामासंदर्भात आपण केंद्राकडे सतत पाठपुरावा करत राहणार आहोत. अशी माहिती खा. बजरंग सोनवणे यांनी प्रसार माध्यमातून दिली.

# जवळगाव, पुस शिवारात बिबट्याचा वावर; शेतकऱ्यांत भितीचे वातावरण

## वनपाल अधिकाऱ्यांची या भागात भेटी शेतकऱ्यांना केले बिबट्या दिसताच वनविभागाला संपर्क साधण्याचे केले आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ नोव्हेंबर**

अंबाजोगाई परिसरातील मुकूंदराज परिसरात गेल्या दहा वर्षापुर्वी बिबट्याचा वावर होता अशी शेतकर्यांची समजूत होती. परंतु वनविभागाने त्याला पिंजर्यात जेरबंद करण्यात यश आले होते. दहा वर्षानंतर तालुक्यामध्ये बिबट्या दिसल्याची चर्चा नव्हती परंतु बुधवार रात्री जवळगाव, पुस शिवारात बिबट्या ऊसाच्या फडातुन बाहेर निघाल्याची दृष्य अनेक शेतकर्यांनी पाहिले. त्यामुळे या गावात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तर तेलघणा परिसरात बिबट्याच्या पावलांचे ठसे हरभर्याच्या पिकात उमटल्याचे चित्रफित व्हिडीओ व्हायरल झाल्याने तालुक्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अंबाजोगाई तालुक्यात बालाघाटच्या डोंगरदर्यां मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे वन्य प्राण्यांचा वावर असतो.गेल्या दहा वर्षापुर्वी बुट्टेनाथ परिसरात जनावरांचा फडशा पाडणारा बिबट्या वनविभागाने जेरबंद केला होता. परंतु नंतर येल्डा परिसरात वनविभागाने जाळे लावून त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या तावडीतून देखील तो सुटला आणि तेलघणा परिसरात वनविभागाने त्याला जेरबंद करण्यात यश मिळविले. या घटनेला दहा वर्षाचा काळ लोटल्यानंतर पुन्हा एकदा अंबाजोगाई तालुक्यात बिबट्या सक्रिय झाल्याचे शेतकर्याच्या निदर्शनास आले.

त्यानंतर त्यांनी वनविभागाला दुरध्वनीवरून संपर्क साधून बिबट्याच्या वावराची कल्पना दिली. त्यानूसार अंबाजोगाईचे वनपाल अधिकारी विजया शेंगोटे यांनी त्यांच्या



पथकासह पुस व जवळगाव परिसरात जावून त्या भागाची पाहणी केली. तसेच तेथील शेतकर्यांना भितीचे कारण नाही असे सांगुन बिबट्या दिसताच वन विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी दोन्ही गावातील शेतकऱ्यांना केले.

शेतकऱ्यांनी शेतात कामे करताना स्वरक्षणासाठी साहित्य वापरावे

पुस व जवळगाव शिवारात बिबट्याच्या पावलाचे ठसे उमटल्याचे निदर्शनास आले आहे. या भागात बिबट्या असण्याची दाट शक्यता आहे. शेतकर्यांनी स्वरक्षणासाठी शेतात जाताना कुर्हाड, विळा, गोफण, कोयता, काठ्या या वस्तुंचा वापर करावा. तसेच बिबट्या दिसताच वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन वनपाल अधिकारी विजया शिंगोटे यांनी केले आहे.



स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.यावेळी विभाग प्रमुख श्री. सचिन सानप सर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



आ. विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी आज मुंबई येथून आगमन होताच... श्रीक्षेत्र नारायण गड, श्री संत वामनभाऊ यांची जन्मभूमी फुलसांगवी, श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड निमगाव मायंबा आणि श्रीक्षेत्र भगवानगड येथे जाऊन दर्शन घेतले.

# कृषी औद्योगिक क्रांती ही यशवंतराव चव्हाण यांच्या काळात झाली-डॉ.मोहनराव पाटील

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ नोव्हेंबर**

यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या निमित्त होणारी ही शेतकरी परिषद खर पहाता यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा जागर असून,ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीचे ज्ञान मिळावे या साठी ही परिषद महत्वाची आहे,हे मार्गदर्शन कृषी महाविद्यालयात धाराशिव चे माजी सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ. मोहनराव बी.पाटील यांनी केले.आंबाजोगाई मध्ये सुरू असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाच्या वतीने आयोजित शेतकरी परिषदेत ते बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर आंबेजोगाई तालुक्यातील आवाड शिरपूर येथील प्रगतशील शेतकरी व ऊस उत्पादक मा. पांडुरंग आवाड होते.या परिषदेच्या अध्यक्षस्थानी मुबंई येथील यशवंतराव चव्हाण केंद्राचे मानद कार्यक्रम व्यवस्थापक दत्ता बाळ सराफ हे होते.या शेतकरी परिषदेचे आयोजन आंबाजोगाई चे प्रगतशील शेतकरी व यशवंतराव स्मृती समारोहाचे कोषाध्यक्ष सतिष लोमटे यांनी केले होते. या परिषदेचे प्रस्ताविक सतिष लोमटे यांनी केले.गेल्या ४० वर्षांपासून अविरत पणे चालू असलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहा निमित्त ही शेतकरी परिषद सुद्धा आयोजित केली जाते.

१९८५ पासून या व्याससपीठावर शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवर मार्गदर्शन व पीक प्रदर्शन आयोजित करण्यात येते.सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी ही परिषद माहिती देण्याचे काम करते असे सतिष लोमटे म्हणाले.डॉ. मोहनराव पाटील यांनी ' फळबाग पीक-लागवड पद्धती,संवर्धन व बाजारपेठ' या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रगतशील शेतकरी पांडुरंग आवाड यांनी 'ऊस लागवड पद्धत स्वानुभव व शेतकऱ्यांना झालेला फायदा' या विषयावर



मार्गदर्शन केले.

डॉ. मोहनराव पाटील पुढे म्हणाले की २०२३ मध्ये पृथ्वी चे तापमान अत्यंत झपाट्याने वाढत आहे.पृथ्वी तापमान वाढी मुळे होरफळत आहे.हे शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे.याच कारण सांगताना ते म्हणाले की दक्षिण आफ्रिकेतील अमेझॉन नदी ही पृथ्वी चे फुफ्फुस आहे.परंतु येथील जंगलांना लागलेली आग व अमेझॉन नदीच्या किनाऱ्यावरील वनराई नष्ट होत चालल्यामुळे वाढते तापमान सर्व सजीवांसाठी घातक आहे.फळ बागांच्या लागडीत लिंबू वर्गीय मोसंबी, आंबा,सीताफळ व ड्रगण फ्रुट ही फळे आपल्या हवामानात जोमाने वाढणारी आहेत.आंब्याचा जन्म भारतातील असल्याने इस्राईल देशाचे मार्गदर्शन घेण्याची गरज नाही.धाराशिव केसर आंब्याच्या उत्पादनात अग्रेसर आहे. त्या नंतर संभाजी नगर सुध्दा पुढे आहे.ग्लोबल विकास ट्रस्ट सिरसाळा फळबागा करिता ५०% सबसिडी देते त्याचा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा.माती तपासूनच पीक लागवड करावी.फळबागा तील फळांचे प्रोसेसिंग करून लोणचे, पल्प,रस,वड्या, आईस्क्रीम,रबडी, पावडर साठी मार्केटिंग करता येते.ड्रगण सारखे फळ अँटीऑक्सिडंट म्हणून आरोग्यासाठी चांगले आहे.पांडुरंग आवाड यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले.उसाची लागवड योग्य रितीने केल्यास व ठिबकद्वारे पाणी दिल्यास एकरी शंभर टना पेक्षा जास्त उत्पादन घेता येते.ऊस या पिकां मध्यें जगाला चालविण्याची क्षमता आहे.कारण मानवी शरीरासाठी साखर महत्वाची आहेच, परंतु ४ हजार मेगावाट विद्युत ऊर्जा,इथेनॉल,सीएनजी,ग्रीनहायड्रेजन,विमानाचे इंधन या सारखी इंधने उसापासून मिळवता येतात.परंतु शेतकऱ्यांनी माती,पाणी परीक्षण करून स्वतः शेतकरी शेतात उतरला पाहिजे, केवळ बांदावर उभे राहून शेती करता येत नाही.

जग बंद पाडण्याची क्षमता शेतकऱ्यांमध्ये आहे. परंतु शेतकऱ्यांला त्याची शक्ती समजली पाहिजे.अध्यक्षीय समारोपात दत्ता बाळ सराफ यांनी दोन्ही मार्गदर्शकांची स्तुती करुण. खरे विश्वगुरू तर ही माणसे आहेत.जे आपल्या शेतीला व जगण्याला विज्ञानाची जोड देत आहेत.महाराष्ट्र मध्ये देशाला मार्गदर्शन करण्याची क्षमता आहे.फक्त डेटा वर बारकाईने काम करता आले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रा पेक्षा मराठवाडा प्रगत होईल फक्त मार्केटिंग मध्ये शेतकरी पुढे आला पाहजे.ऑर्गणीक विचारवंत निर्माण झाले पाहिजेत.हा महाराष्ट्र यशवंतराव चव्हाणांच्या मॉडेल वर चालतो आहे.या कार्यक्रमाचे संचलन राजेंद्र क्षीरसागर यांनी केले.आभार श्याम शिंदे यांनी मानले. या वेळी ऊस उत्पादक शेतकरी गोविंद भाऊ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

# महायुती सरकारने दिलेला शब्द पाळावा ; धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी

### - धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांची मागणी


**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ नोव्हेंबर**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रमुख मागणीला घेऊन मागील चार महिन्यांपूर्वी लातूरसह महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप केला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी शिंदे सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे महायुती सरकारने दिलेला शब्द पाळून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करीत आरक्षणाचा तिढा संपवावा. अशी मागणी धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी केली आहे. आश्वासनाची अंमलबजावणी केली नाही तर पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा ही हजारे यांनी दिला आहे.

धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलने, उपोषणे करण्यात आली. यात 'धनगड' जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करून धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द केले. याबाबत अधिक माहिती देताना धनगर समाजाचे नेते चंद्रकांत हजारे यांनी सांगितले की, धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ मिळावा, या प्रामुख मागणीला घेऊन मी व माझ्या सहकाऱ्यांनी मागील चार महिन्यांपूर्वी लातूर येथे उपोषण, विविध आंदोलने झाली. समाज बांधवांनी संविधानामध्ये अनुसूचित जमातीच्या सूचित धनगर जमात समाविष्ट असल्याचे सांगून अंमलबजावणी केली जात नसल्याचा आरोप केला होता. यावर धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा लाभ देण्यासाठी शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यामुळे आता महायुती सरकारने आम्हाला दिलेला शब्द पाळून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करून आरक्षणाचा तिढा संपवावा. कारण, धनगर समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यावर राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन व उपोषण करण्यात आली. यात धनगड जमातीच्या एका कुटुंबातील सहा जणांचे धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द करण्याची मागणी केली होती. यावर राज्य सरकारने ही मागणी पूर्ण करुन धनगड जमातीचे प्रमाणपत्र रद्द ही केले. पुढे आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुद्दा उपस्थित झाला असून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्याने तो तसाच राहिला. आता निवडणुका झाल्या आहेत. त्यामुळे धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी आम्ही पुन्हा करीत आहोत. असे हजारे यांनी सांगितले.

अन्यथा धनगर समाज पुन्हा आंदोलन करणार :

राज्यात धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी ही गेली काही महिन्यांपासून जोर धरून होती. त्यामुळे राज्यातील महायुतीच्या सरकारने मागणी संदर्भात सकारात्मक असल्याचे सांगितले. याप्रश्नी दोन वेळा मंत्रालयात बैठका ही झाल्या. त्यात आचारसंहिता लागली. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा पुढे ढकलण्यात आला. त्यामुळे धनगर समाजाने आरक्षण मिळावे यासाठी राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणले आहे. त्यामुळे सरकारने समाजाला



दिलेला शब्द पाळावा, अन्यथा धनगर समाज पुन्हा रस्त्यावर येऊन आंदोलन करण्यासाठी तयार आहे याची नोंद घ्यावी.

- चंद्रकांत हजारे
(धनगर समाजाचे नेते)

# अंबाजोगाई येथे राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ नोव्हेंबर**

श्री अंबाजोगाई क्रीडा ,सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्यावतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या पुरुष एकेरी आणि पंधरा वर्षा खालील मुले एकेरी बॅडमिंटन स्पर्धेला गुरुवारी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला .

या स्पर्धेचे उद्घाटन मानवलोक सामाजिक संस्थेचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी दीप प्रज्वलन करून केले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाजार समितीचे अध्यक्ष राजेश्वर चव्हाण होते . या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस उपअधिक्षक अनिल चोरमले , तहसीलदार विलास तरंगे , शिवाजी सिरसाट, बबन लोमटे , डॉ राजेश इंगोले, प्राचार्य शिवदास सिरसाट , शिवकुमार निर्मळे , अविनाश मुडेगावकर यांची उपस्थिती होती.या वेळी तहसीलदार विलास तरंगे, डॉ राजेश इंगोले, अनिल चोरमले, अनिकेत लोहिया, राजेश्वर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले . त्यानंतर बॅडमिंटन मैदानावर मान्यवरांनी



श्रीफळ वाढऊन आणि बॅडमिंटन खेळून स्पर्धेला सुरुवात केली.

सुरुवातीला प्रा प्रविण दिग्रसकर यांनी प्रास्ताविक केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत आरसुडे यांने केले . शेवटी संयोजक प्रविण देशमुख यांनी सर्वांचे आभार मानेले.या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी दीडशे स्पर्धकांनी सहभाग घेतला आहे. पंच म्हणून कैलास शेटे, चेतन पाडे व इतरांनी काम पाहिले.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी रणजीत लोमटे, प्रविण देशमुख,श्रीनिवास मोरे, राहुल देशमुख, नितीन कातळे, अनंत मसने , महेश लोमटे, किरण सेलमुकर, शरद लोमटे, ज्ञानेश्वर गित्ते , तुषार जोशी, संतोष कदम, राहुल राख, वसंत कांबळे , दत्ता सावंत, श्रीपाद देशमाने व इतरांनी काम पाहिले.

# महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा ०१ डिसेंबरला २१५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ नोव्हेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२४ दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १० उपकेंद्रामधून सकाळच्या सत्रात १० ते १२ वाजता व दुपारच्या सत्रात ०३ ते ०५ वाजता अशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण तीन हजार ५१ उमेदवार बसलेले आहेत. ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १० उपकेंद्र प्रमुख, ११ मदतनीस, ४७ पर्यवेक्षक, १४७ समवेक्षक असे एकूण २१५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्रप्रमुख शिवकुमार स्वामी यांनी या परीक्षेच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांना २६ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण दिले.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांचेकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू व अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाता येणार नाही. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डब्बा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन येण्यास परवानगी देण्यात येत आहे. दोन पेपरच्या मधल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास सक्त मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेले परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील. तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेशपत्रासोबतच त्यांचे स्वतः चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणतेही एक ओळखपत्र व प्रत्येक सत्राकरीता त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांना त्यांचे परीक्षा उपकेंद्रावर पेपर क्रमांक ०१ सकाळ सत्रामध्ये सकाळी ०८.३० वाजता व पेपर क्रमांक ०२ दुपार सत्रामध्ये दुपारी ०१.३० वाजता उपस्थित रहावे. सकाळचे सत्रात ९.३० वाजता नंतर व दुपार सत्रात २.३० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही सबबी खाली प्रवेश देण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असेही निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी कळविले आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर २०२४


## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल येथे संविधान दिन साजरा



तभा वृत्तसेवा बिडकीन दि २८ नोव्हेंबर,

पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल ब्लु माउंटन प्री स्कुल मध्ये संविधान दिन उत्सहात साजरा करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. शाळेतील शिक्षकांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण केले. विद्यार्थी व शिक्षकांनी भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन केली. यावेळी वर्षा चव्हाण, भारती जाधव, कृष्णा भालेराव, अंकिता चव्हाण, प्रकाश सर, काजल देशमुख, सोनाली खोंड, अनिता धर्मे,शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थीती होती.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मधील यशोधन घुगे यास कराटे स्पर्धेत यश



बिडकीन दि २८ नोव्हेंबर क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व परभणी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित झालेल्या कराटे स्पर्धेत ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मधील विद्यार्थी यशोधन पवण घुगे जिल्हात प्रथम क्रमांक मिळवले. दि.२६ नोव्हेंबर रोजी जिल्हा परभणी येथे विभागीय कराटे स्पर्धेत सुद्धा तिसरे स्थान मिळवुन विजय प्राप्त केला. तसेच तो पुढील किक -बॉक्सींग या स्पर्धेसाठी पात्र झाला आहे. शाळेतील क्रिडा शिक्षक पवन घुगे यांनी मार्गदर्शन केले, यशोधन च्या या यशाबद्दल शाळेचे संस्थापक सतिश तोतला सर,शाळेच्या मुख्यध्यापिका सविता सतिश तोतला मॅडम, शाळेतिल सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी यशोधनचे अभिनंदन केले आहे

# वाढत्या हुडहुडीत शेकोट्यांची धग कमाल तापमान २

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

उत्तरेकडील थंड वाऱ्याच्या प्रवाहामुळे छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्याचा पारा घसरला आहे. किमान तापमान हंगामात प्रथमच ८ अंशांवर पोहोचले आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी येथे हुडहुडी वाढली आहे. बुधवारी, २७ रोजी किमान तापमानात घट झाली आहे. नोव्हेंबरपर्यंत थंडीची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. दरम्यान, मंगळवारी, २६ रोजी छत्रपती संभाजीनगरचे किमान तापमान २८.६, तर बुधवारचे २८.४ अंश सल्सिअस एवढे होते. हुडहुडी वाढल्यामुळे जनजीवन गारठले असून, जागोजागी शेकोट्या पेटू लागल्या आहेत.

शहरात गारठा कमी असला तरी ग्रामीण भागात शेतिमालाला पाणी सुरू असल्यामुळे पैठण धरणाच्या पाणलोट क्षेत्रालगतच्या गावांमध्ये एक प्रकारे थंडीची जोरात लाट असल्यामुळे जागोजागी शेतकऱ्यांसह अनेकजण शेकोट्यावर शेक घेताना दिसून येत आहेत.

देशाच्या उत्तरेकडे थंडीचा कडाका तीव्र होऊ लागला आहे. परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठामध्ये राज्याचे यंदाच्या हंगामातील ८ अंश तापमानाची नोंद झाली आहे. अनेक ठिकाणी किमान तापमान १३ अंशांपेक्षा खाली आहे. उर्वरित राज्यात किमान तापमानाचा पारा घसरू लागला आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी कमाल तापमानाचा पारा ३० अंशांच्या खाली आला आहे.

बुधवारी, २७ रोजी सकाळी ८.३० वाजेपर्यंतच्या २४ तासांमध्ये विविध ठिकाणी नोंदविले गेलेले कमाल तापमान, कंसात किमान तापमान (अंश सेल्सिअसमध्ये) : छत्रपती संभाजीनगर २८.४ (१२.२), धाराशिव (१६), परभणी २८.५(१२), परभणी कृषी विद्यापीठ २८.३ (८). मराठवाड्यात किमान तापमानात आणखी घट होत गारठा वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

## सिल्लोड रजिस्टरी कार्यालयात सावळा गोंधळ

सिल्लोड : सिल्लोडच्या रजिस्ट्री कार्यालयात सुरू असलेला काळाबाजार थांबवून संबंधित अधिकारी व दलालांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन सय्यद हरून अली सय्यद जहुर अली यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे. सय्यद यांनी दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की शासनाने तुकडा बंदी कायदा लागू केलेला असताना देखील शहर व तालुक्यातील अनेक प्लॉट व गुंठेवारी जमिनीची अनधिकृत दस्त नोंदणी सुरू आहे. यासाठी संबंधित अधिकारी पन्नास हजार रुपयाची लाच घेत असल्याचा थेट आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.यामुळे जनतेची मोठ्या प्रमाणात लूट सुरू असून याबाबतची वरिष्ठ कार्यालयाने तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकारी व या दस्त नोंदणीसाठी परिसरात फिरणारे दलाल यांचे वर कायदेशीर कारवाई करावी. याशिवाय परवानाधारक बॉन्ड विक्रेते शासनाने ठरवून दिलेल्या किमतीपेक्षा जास्तीचे पैसे घेऊन बॉन्ड विक्री करीत आहेत व सर्वसामान्य नागरिकांची लूट केल्या जात आहे याचीही तात्काळ चौकशी होऊन अशा जास्तीच्या किमतीत बाँड विक्री करणाऱ्या परवानाधारकांचे परवाने निलंबित करावे अशी मागणी ही सय्यद यांनी त्यांच्या निवेदनात केली आहे या निवेदनाच्या प्रती विभागीय आयुक्त कार्यालय महसूल मंत्री आदी ठिकाणी पाठविण्यात आले आहेत.

## क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी उत्साहात साजरी



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२८, थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त सिल्लोड शहरातील ना. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. सेना भवन येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार,शकुंतलाबाई बनसोड , शिवसेना तालुकाप्रमुख मारुती वराडे, समता परिषदेचे नारायण फाळके, राजेंद्र बनसोड , नॅशनल सूतगिरणी चे संचालक राजेंद्र ठोंबरे, विठ्ठल सपकाळ, सयाजी वाघ, माजी उपनगराध्यक्ष संजय आरके ,जितू आरके ,प्रशांत शिरसागर, जगन्नाथ कुदळ, संतोष धाडगे, राजेश्वर आरके , मनोहर आरके ,शिवा टोम्पे, गणेश शेलार, दिलीप वाघ , फहिम पठाण , रवी आरके ,सुपडू कुरेशी, सुनील पांडुरंग दुधे, संदीप पाटील, मंजीतराव भाग्यवंत, संतोष खैरणार, सोमीनाथ जंजाळ ,दत्ता चव्हाण, रवी गायकवाड, दिलीप जाधव, राजू साठे, शालिक गवळे ,माधव गुंजाळ आदींची उपस्थिती होती.

## श्री क्षेत्र जैनगिरी (जटवाडा) येथे अमावस्या निमीत्त पंचामृत अभिषेक व महाप्रसादाचे आयोजन.

औरंगाबाद प्रतिनिधी - शहरापासुन १२ कि.मी. अंतरावरील असलेल्या हजारो जैन बांधवांचे श्रध्दास्थान श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक १ डीसेबर २०२४ रोजी अमावस्या निमीत्त

सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस अ‍ॅड. विनोद श्रीपालसा साहुजी, सौ. वसंतमाला विनोद साहुजी. श्री पुष्पदंत, पराग, अभिनंदन व कु. नव्या, चि. अर्हम, चि. अर्हत साहुजी. प्रवीण व सुनील श्रीपालसा साहुजी, श्री विरकुमार व अक्षय रमेश साहुजी, मधुबन परिवार, छ.संभाजीनगर यांचा वतीने महाप्रसाद दिला जाणार आहे.

अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे

श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

## नारायण विद्यालयात संपन्न माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा १८ वर्षानंतर एकत्र आले विद्यार्थ्यांनी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२८ नोव्हेंबर - तालुक्यातील जैतखेडा येथील नारायण विद्यालय शाळेतील सण २००५-०६ च्या माजी विद्यार्थ्यांचा सुमारे १८ वर्षानंतर सर्व विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता,

विविध क्षेत्रात कार्यरत राहून या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्नेहमेळावा आयोजित केला होता. यावेळी सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र आले होते. जुन्या शालेय आठवणींना उजाळा देताना विद्यार्थी आणि शिक्षकांनी शालेय अनुभव कथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नारायण विद्यालयाचे मुख्याध्यापक अविनाश पाटील होते यावेळी संस्थेचे अध्यक्ष कृष्णा नलावडे,सहशिक्षक राजेंद्र पाटील,मकरंद भातखेडकर,राजु पुर्भी,सुरेश परदेशी,रमेश वेताळ, अंबादास खिल्लारे आदी उपस्थित होते. माजी विद्यार्थी भगवान मोरे यांनी सुत्रसंचलन केले, शाळेसाठी गरजु वस्तु व मदत लागेल तेव्हा हजर राहु अशी ग्वाही माजी विद्यार्थ्यांनी दिली. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी भगवान मोरे,दीपक वेताळ ,दगडू खिल्लारे ,योगेश बडक ,ईश्वर पांडे ,निवृत्ती वेताळ,संदीप वेताळ ,गोकुळ वेताळ ,संतोष वेताळ, रामधन राठोड अर्जुन जाधव ,बाळासाहेब आळंसकर,सुनील खिल्लारे, सुदर्शन वेताळ, श्रीराम वेताळ ,गोविंद आडे ज्ञानेश्वर राठोड, गोरख राठोड, उज्वला वेताळ ,सोपान वेताळ ,पोपट वेताळ सीमा खिल्लारे, छाया डेडवाल मुक्ता वेताळ कावेरी वेताळ,सिमा वेताळ आदी उपस्थित होते.

# रोहित्र अन् कृषिपंपांचे नुकसान टाळण्यासाठी कॅपॅसिटर बसवा

### महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर : कृषिपंप तत्काळ सुरू करण्याच्या उद्देशाने ग्राहक ऑटोस्विच बसवतात. त्यामुळे परिसरातील सर्व कृषिपंप एकाच वेळी सुरू होऊन रोहित्रावरील भार अचानक वाढतो. परिणामी रोहित्र जळणे, वीजवाहिन्या बंद वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढते. यातून होणारी गैरसोय व नुकसान टळावे तसेच सुरळीत व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळावा, यासाठी शेतकर्यांनी कृषिपंपांना ऑटोस्विचऐवजी कॅपॅसिटर बसवून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणनच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने केले आहे.

प्रत्येक कृषिपंपास क्षमतेनुसार कॅपॅसिटर बसवणे हा रोहित्र जळणे वा नादुरुस्त होण्याचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी एक सोपा उपाय आहे. कॅपॅसिटरमुळे कमी दाबाचा वीजपुरवठा, रोहित्र जळाल्यास वा नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती कालावधीतील खंडित वीजपुरवठा या समस्या सुटण्यास मदत होणार आहे. मात्र बहुतांश ग्राहकांनी कृषिपंपांना कॅपॅसिटर बसविलेले नाहीत. बसविलेल्यांपैकी काहींचे बंद तर काहींनी थेट जोडणी केली असल्याने ज्यांनी कॅपॅसिटर बसविले नाहीत त्यांनी ते बसवून घ्यावेत आणि कॅपॅसिटर बंद किंवा थेट जोडणी असल्यास ते दुरुस्त करून घ्यावेत, असे आवाहनही महावितरणतर्फे करण्यात आले आहे. कृषी क्षेत्रातील कार्यक्षम ऊर्जा वापरात कॅपॅसिटर हे उपकरण महत्त्वाचे आहे. कृषिपंपास कॅपॅसिटर बसवल्यामुळे विद्युत केबल जळण्याचे प्रमाण कमी होते. योग्य विद्युतदाब, केव्हीए मागणी, वीज वापरात बचत आदी फायदे होतात.

ऑटोस्विचचा वापर टाळा

महावितरणकडून कृषिपंपांना दिवसा व रात्री अशा चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यात येतो. वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर शेतात जाऊन कृषिपंप चालू करण्याचा त्रास वाचवण्यासाठी काही ठिकाणी शेतकरी कृषिपंपांना 'ऑटोस्विच' लावतात. त्यामुळे वीज येताच कृषिपंप आपोआप चालू होतो. परिणामी रोहित्रांवरील भार एकाच वेळी वाढत असल्याने रोहित्र जळण्याचे किंवा नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढत आहे. ऐन हंगामात रोहित्र जळाल्यास त्याची झळ शेतकऱ्यांनाही सोसावी लागते. त्यामुळे कृषिपंपांना कॅपॅसिटर बसवून ऑटो स्विचचा वापर टाळावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## 'नर्मदा बचाव आंदोलना'च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा माहितीपट 'लकीर के इस तरफ' चे शनिवारी प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ : यशवंतराव चव्हाण सेंटर, एमजीएम वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रपट चावडीचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत 'नर्मदा बचाव आंदोलना'च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा 'लकीर के इस तरफ' चित्रपटाच्या विशेष शोचे आयोजन शनिवार, दि. ३० नोव्हेंबर २०२४ रोजी सायं. ६ वा. एमजीएम येथील व्ही. शांताराम प्रेक्षागृहात करण्यात आले आहे. यावेळी या माहितीपटाच्या दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

'नर्मदा बचाव आंदोलना'च्या ३५ वर्षांचा आढावा घेणारा माहितीपट म्हणजे - लकीर के इस तरफ. ९० मिनिटांच्या या माहितीपटात, आंदोलनाचं यश-अपयश याची मांडणी तर आहेच, पण त्यापेक्षा मनात भरतात त्या आंदोलनानं सुरू केलेल्या आदिवासी मुलांसाठीच्या, नर्मदेच्या कुशीतल्या जीवनशाळा!!! लडाई - पढाई साथ साथ म्हणत, संघर्ष आणि निर्माण एकत्र कसं साधायचं याचा वास्तूपाठ यात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या समाजशास्त्र विषयाच्या पुस्तकात, लकीर के इस तरफ या माहितीपटाचा उल्लेख केला आहे. सामाजिक चळवळी या प्रकरणात संदर्भ म्हणून विद्यार्थ्यांना ही फिल्म सुचवली गेली आहे. चित्रपट प्रदर्शनानंतर दिग्दर्शिका शिल्पा बल्लाळ उपस्थितांशी संवाद साधणार आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला असून जास्तीत जास्त रसिक, विद्यार्थी, अभ्यासक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बँक ऑफ महाराष्ट्र बनोटी शाखेचे गावाबाहेरील बिल्डींगमधे स्थलांतर करण्याच्या हालचाली सुरू

### खातेदारकांमध्ये असंतोष; शेतकरी, वृद्धांसह शालेय विद्यार्थीची गैरसोय होणार

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२८ नोव्हेंबर : बँक ऑफ महाराष्ट्र बनोटी (ता. सोयगांव) शाखेचे गावाबाहेरील दोन किलोमीटर अंतरावरील बिल्डींगमधे स्थलांतर करण्याच्या हालचाली सुरू झाल्याने खातेदारकांमध्ये असंतोष निर्माण झाला.त्यामुळे शेतकरी, वृद्धांसह शालेय विद्यार्थीची गैरसोय होणार आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र बनोटी ही शाखा जिल्ह्यातील सर्वात मोठी शाखा आहे.या बँकेला बनोटी परिसरातील जवळपास वीस गावे जोडली आहेत.वीस गावातील जवळपास पंचवीस ते तीस हजार खातेदार सभासद असून



निराधार, ज्येष्ठ नागरिक,विद्यार्थी व शासकीय कर्मचाऱ्यांचे खाते आणि विशेष करून सर्व शेतकऱ्यांची खाती या शाखेत जोडलेली आहेत.बँक ही ग्रामीण भागातील एकमेव शाखा असून गावाच्या मधोमध,बनोटी स्थानकावर असल्याने गावासह परिसरातील गावातील खातेधारकांसाठी सोयीची आहे.जुनाट झालेल्या बिल्डींगच्या नावाखाली बँक प्रशासनाने शाखा स्थलांतराची हालचालींना सुरुवात केल्याने बनोटी ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन बँक स्थलांतरास विरोधात ठराव पास करीत,जवळील उपलब्ध जागेत स्थलांतर करण्यास पर्याय देऊन देखील बँक प्रशासन मनमानी करीत स्थलांतरावर ठाम असल्याने ग्रामस्थांनी बँकेच्या वरिष्ठ अधिकार्यांना निवेदन देऊन कळविले आहे.तरीही बँक स्थलांतर झाल्यास ग्रामस्थ बॅंकेसमोर आंदोलन करणार आहे. वेळप्रसंगी सामुहीक उपोषण देखील करणार आहेत तरी बँक प्रशासनाने स्थलांतर थांबवून ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत स्थलांतर करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांकडुन होत आहे.बँक ऑफ महाराष्ट्र बनोटी शाखा स्थलांतर झाली तर परीसरातील खातेधारक,ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांना दोन किलोमीटर अंतर पायपीट करीत जावे लागणार आहे.

यामुळे खातेदारकांना वेळ व आर्थिक नुकसान होईल व ज्येष्ठ नागरिक आणि शेतकऱ्यांचे हाल होतील.त्यामुळे बनोटी बँक आहे येथेच असावी.बँक स्थलांतरित करू नये, व जोपर्यंत बँक स्थलांतरितचा निर्णय रद्द होत नाही,तोपर्यंत आम्ही आंदोलन मागे घेणार नाही,असा निर्णय बनोटी परिसरातील खातेदार व नागरिकांनी घेतला आहे.



श्री.गुरुगोविंद सिंग जी स्टेडियम येथे विभागीय विभागीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा २०२४ २५ जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड पार पडल्या, त्यामध्ये चुडावा तालुका पूर्णा येथील अभिनील बालाजी राजभोज यांनी प्रथम क्रमांक मिळवून धुळे येथे होणाऱ्याह राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे .

## वित्तीय संस्था चालविताना काळजी घ्यावी : ॲड. कृष्णा पा. जाधव

तभा वृत्तसेवा

कन्नड:-दि.२८ नोव्हेंबर - सध्याच्या काळात कोणतीही वित्तीय संस्था असो, त्यात प्रामुख्याने सहकारी बँक, सहकारी पतसंस्था, पतपेढी व अन्य वित्तीय संस्था चालविणे अत्यंत कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे वित्तीय संस्था चालवताना अत्यंत काळजी घेणे नितांत गरजेचे आहे. कर्ज देताना ग्राहकाला पूर्णपणे आवश्यक त्या कागदपत्रा सह तसेच शोध अहवाल सह सादर करण्याबाबत सूचना देऊन त्याची पूर्तता करून घेणे गरजेचे आहे. तसेच कर्जदार नोकरीला असेल तर त्याचे कार्यालयाकडून हमीपत्र व पगार पत्रक घेणे अत्यंत गरजेचे आहे, संरक्षित कर्ज व नियमित वसुली केल्यास वित्तीय



संस्था निश्चितपणे भरभराटीला येते असे प्रतिपादन ॲड.कृष्णा पाटील जाधव यांनी माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी शाखा कन्नड येथे बोलताना केले.

नुकताच माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी ग्रुप ने १०० कोटी ठेवी गोळा करण्याचा उच्चांक व उद्दिष्ट गाठले असून त्यानिमित्ताने कन्नड येथील शाखेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक चेअरमन जगन्नाथ खैरनार, संचालक विलास जाईबहार, नितीन ढोले, अतुल खैरनार, संचालिका सौ. निर्मला अहिरे,वसंतराव अहिरे आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे व्यवस्थापक श्रीयुत निलेश तिवारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपव्यवस्थापक श्रीमती स्वरांजली थेटे यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. प्रीती देशमुखयांनी केले, यावेळी संस्थेचे सर्व कर्मचारी ग्राहक खातेदार व राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

# दोन दिवसीय 'टीच टू प्रायमरी टूल' प्रशिक्षण संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.२८ नोव्हेंबर - तालुक्यातील प्राथमिक,माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांसाठी दोन दिवसिय टीच टू प्रायमरी टूल' या प्रशिक्षणाचा बुधवार दि.२७ रोजी समारोप करण्यात आला.

शहरातील फातेमा कॉन्व्हेन्ट स्कुलच्या सभागृहात दि.२६ व दि.२७ रोजी दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न झाले.बुधवारी प्रशिक्षणाचा समरोप करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी नीता श्रीश्रीमाळ होत्या.यावेळी गटविस्तार अधिकारी सुनीता वेरूळकर, डी टी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मुख्याध्यापक,शिक्षक तसेच विद्यार्थ्यांसाठी सदरचे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल असे मनोगत व्यक्त केले .प्रशिक्षणासाठी सुलभक म्हणून,केंद्रप्रमुख अजीज शहा,केंद्रप्रमुख भिकन वनारसे,कौतिक सपकाळ,बाजीरावं ताठे, मुख्याध्यापक दिलीप गायकवाड,योगेश मुळे,अनिता जालनापूरकर यांनी काम पहिले.

साधन व्यक्ती म्हणून झिंगराव सपकाळ, संदीप कुलकर्णी,श्रीम. शेख मॅडम,विशेष तज्ञ प्रशांत अहिरराव यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान प्रशिक्षणाच्या पहिल्यादिवशी संविधान दिनाचे वाचन करून संविधान दिन साजरा करण्यात आला तर २६/११ रोजी दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.प्रशिक्षणाच्या सुरुवातीलाच बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा घेण्यात आली.प्रशिक्षणासाठी तालुक्यातील प्राथमिक माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक गटविस्तार अधिकारी सुनीता वेरूळकर,सूत्रसंचलन केंद्रप्रमुख अजीज शहा यांनी तर आभार गटविस्तार अधिकारी डी टी शिंदे यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## 'बाल विवाहमुक्त भारत' मोहिमेला भरभरून पाठिंबा

पुणे : हजारो लोकांनी भारत सरकारच्या 'बाल विवाहमुक्त भारत' मोहिमेला भरभरून पाठिंबा देत जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन (जेआरसी) युतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील मार्ग, शाळा, रस्ते आणि बाजारपेठांमध्ये गर्दी केली होती. ३१ जिल्ह्यांतील ३५५० गावांमध्ये बालविवाहाच्या विरोधात जनजागृती मोहिमा, मेणबत्ती लावून मोर्चे आणि रोड शो करण्यात आले. सामाजिक कार्यासाठी अभूतपूर्व एकजूट दर्शवत पोलिस ठाणे, न्यायालये, पंचायत सदस्य, धर्मगुरू, शाळकरी मुले, शिक्षक, बालविवाहपीडित मुले आणि महिला यांनी बालविवाह थांबविण्याची आणि त्याची माहिती काळविण्याची शपथ घेतली. जेआरसी युती मध्ये देशातील ४०० हून अधिक जिल्ह्यांतील २५० हून अधिक एनजीओ काम करीत असून ती महाराष्ट्रातील ३१ जिल्ह्यांमध्ये राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासनासोबत बालविवाह मुळासकट नष्ट करण्यासाठी काम करत आहे. मने वळवून आणि कायदेशीर हस्तक्षेप करून जेआरसी ने एकट्या २०२३-२४ मध्येच संपूर्ण भारतात २,५०,००० पेक्षा जास्त बालविवाह रोखलेले आहेत. 'बालविवाहाविरोधात सर्वतोपरी प्रयत्न करण्याची मी शपथ घेत आहे. माझ्या कुटुंबात, परिसरात किंवा समुदायात बालविवाह होणार नाहीत याची मी शपथ घेत आहे. बालविवाहाचा कोणताही प्रयत्न पंचायत आणि सरकारी अधिकाऱ्यांना कळविण्याचे वचन मी देत आहे, अशा शपथांची पुन्हा पुन्हा प्रतिध्वनी संपूर्ण राज्यभर पसरलेल्या या कार्यक्रमात ऐकू येत होती.

## भारतातील विविध राज्यांमधील त्यांच्या आवडत्या फूडबाबत!

थंडी सुरू झाली असताना आवडत्या ट्रीट्सचा आस्वाद घेण्याची उत्सुकता वाढली आहे. वर्षातील या थंडीच्या काळाचा आनंद घेण्यासाठी एण्ड टीव्ही कलाकार हिवाळ्यातील त्यांचे आवडते स्नॅक्स आणि आस्वाद घेणाऱ्या स्वादिष्ट मिष्टान्नांबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत आयुध भानुशाली (मालिका 'अटल'मधील यंग अटल), स्मिता साबळे (मालिका 'भीमा'मधील धनिया), योगेश त्रिपाठी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील दरोगा हप्पू सिंग) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अंगूरी भाबी). मालिका 'अटल'मध्ये यंग अटलची भूमिका साकारणारा आयुध भानुशाली म्हणाला, हिवाळ्यामध्ये मला माझ्या आईने बनवलेल्या स्वादिष्ट गुजराती पाककलांचा आस्वाद घ्यायला आवडतो. ती ताज्या हंगामी भाज्या, मेथी मुथिया (मेथीचे डम्पलिंग्स) व सुगंधी मसाल्यांसह बनववणारे उंधियू मला खूप आवडते. माझ्या टिफिनमध्ये ते नेहमी असते आणि माझे सह-कलाकार देखील या खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतात.

## विद्याच्या प्रसूतीला मिळाले एक नाट्यमय वळण

सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' ही मालिका वागले या मध्यमवर्गीय कुटुंबाच्या दैनंदिन संघर्षाचे आणि त्यांच्या यशापयशाचे चित्रण करते. गेल्या काही भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, साईदर्शन सोसायटी सर्व घरांना डिजिटल कुलुपे बसवते. पण जेव्हा विद्या (सुकन्या सुर्वे)ला प्रसूती वेदना सुरू होतात आणि दाराचे कुलूप अडकून जाते तेव्हा गोंधळ माजतो.सर्व जण मदतीसाठी गणपती बाप्पाचा धावा करू लागतात आणि नेमका त्याच वेळी एक मूषक (उंदीर) येतो आणि चमत्कार होऊन दार उघडते व विद्या थोडक्यात बचावते.

## स्वर्गीय शम्मी कपूरसोबत सोनेरी दिवस

झी टीव्हीवरील 'सा रे ग म प' दर आठवड्याला कला, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या अचूक मिलाफासह प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. प्रत्येक आठवड्याला जसजशी ही स्पर्धा कडवी होत आहे, तसतसे देशभरातील प्रेक्षक त्यांच्या स्क्रीन्सला खिळून राहत आहेत आणि अतिशय उत्कटपणे आपल्या आवडत्या स्पर्धकांना समर्थन देत आहेत. मेंटॉर सचिन-जिगर, सचेत परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली या भावी गायकांनी स्वतःला निव्वळ गायकामधून कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रुपांतरीत केले आहे. यांचे सांगीतिक कौशल्य मेंटॉर्स आणि प्रेक्षक अशा दोहोंना थक्क करत आहे. या उत्साहामध्ये भर टाकत या वीकेंडच्या खास भागामध्ये ख्यातनाम अभिनेत्री आशा पारेख या मंचाला भेट देणार आहेत.

## वाहन पसंतीक्रमांक शुल्क ऑनलाईन भरता येणार

शिर्डी, दि.२८ - नवीन वाहन खरेदी केल्यानंतर वाहनधारक पसंतीक्रमांक शुल्क आता ऑनलाईन भरता येणार असून या सुविधेचा लाभ वाहनधारकांनी घ्यावा, असे आवाहन श्रीरामपूर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी यांनी केले आहे. नवीन वाहन खरेदी केल्यानंतर वाहनधारक परिवहन कार्यालयात येऊन पसंती क्रमांक शुल्क भरणा करून त्यांच्या वाहनांकरिता पसंती क्रमांक घेत असतात. २६ नोव्हेंबर २०२४ पासून शासनाने parivahan.gov.in या संकेतस्थळावर पसंती क्रमांक शुल्क ऑनलाईन भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असल्याचेही उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे.

## आपल्याला टेनिस स्टार नोवाक जोकोविच आवडतो - अमिताभ बच्चन

छत्रपती संभाजीनगर - सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील कौन बनेगा करोडपती १६ या गेम शोमध्ये या आठवड्यात होस्ट अमिताभ बच्चन समोर असतील दिल्लीचे प्रेमस्वरूप सिंह नेगी. प्रेमस्वरूप हे डडइ चे निवृत्त जनरल अधिकारी असून घइउ मध्ये येण्याचे त्यांचे पूर्वीपासूनचे स्वप्न होते. प्रेमस्वरूप स्वतः टेनिसपटू असून टेनिस त्यांचा आवडता खेळ आहे. श्री. बच्चन यांच्याशी बोलताना त्यांनी आपले टेनिस-प्रेम व्यक्त करत हे देखील सांगितले की त्यांना एकदा टेनिस टूर्नामेंटमध्ये प्रेक्षक म्हणून जाण्याची संधी मिळाली होती. त्यावर हसून श्री. अमिताभ बच्चन म्हणाले, मला नोवाक जोकोविच फार आवडतो. त्याचा खेळ अप्रतिम आहे आणि तो इतर खेळाडूंची नक्कलही छान करतो.


संभाषणाच्या ओघात, श्री. बच्चन यांनी आपल्या न्यूयॉर्क दौऱ्याचा एक गंमतीदार पण अविस्मरणीय

किस्सा सांगितला. ते न्यूयॉर्कला टेनिस टूर्नामेंट बघायला गेले होते. ते म्हणाले, मी तिकडे काही

भारतीयांसमवेत बसलो होतो. त्या लोकांनी मला ओळखले आणि ते माझ्याकडे स्वाक्षरी मागू लागले. पण, त्यानंतर जे झाले, ते फार आश्चर्यकारक होते! जवळच बसलेल्या दोन अमेरिकन महिलांनी काही वेळ माझ्याकडे पाहिले आणि त्या म्हणाल्या, तुम्हाला भेटून आनंद वाटला, विजय अमृतराज.

बिग बी हसत हसत पुढे म्हणाले, त्यांना वाटले होते की मी माजी भारतीय टेनिसपटू विजय अमृतराज

आहे. कारण एक तर मी भारतीय आहे आणि आमची उंची तशी सारखीच आहे. आणि जर लोकांनी मला गराडा घातला असेल, तर मी कुणी प्रसिद्ध टेनिस स्टार असलो पाहिजे. मी हसून त्यांना उत्तर दिले की, मी कुणी टेनिसपटू नाही. मी फक्त इथे मॅच बघायला आलो आहे. मी खरा कोण आहे, हे काही मी त्यांना सांगितले नाही.हा गंमतीदार किस्सा ऐकून स्पर्धक प्रेमस्वरूप आणि उपस्थित प्रेक्षकांचेही खूप मनोरंजन झाले. मात्र या किश्शातून श्री. बच्चन यांची विनम्रता आणि अशा परिस्थितीत चमकलेली त्यांची विनोदबुद्धी पुन्हा एकदा दिसून आली. अमिताभ बच्चन यांच्यासोबत असे हलके-फुलके, गंमतीदार क्षण अनुभवण्यासाठी अवश्य बघा, कौन बनेगा करोडपती १६ दर सोमवार ते शुक्रवार रात्री ९ वाजता फक्त सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर!



## दिपक लालवानी यांचे निधन

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.२८ नोव्हेंबर : शहरातील सामाजिक कार्यकर्ते दिपक गोविंदराम लालवानी वय ५५ वर्ष यांचे दि.२८ रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखत निधन झाले. दिपक लालवानी हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी शहराध्यक्ष राहिलेले आहेत,त्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता,त्यांच्या पश्चात आई,दोन भाऊ,मुलगी,मुलगा,जावई असा परिवार आहे.

# ७२८ वा माऊली समाधी सोहळा जन्मभुमी आपेगावी संपन्न

तभा वृत्तसेवा

पैठण दि २८ :

**पाहूनी समाधीचा सोहळा ।**
**दाटला इंद्रायणीचा गळा**
**बाळ सिद्ध पाहता चिमुकला ।**
**कुणी गहिवरे कुणी हळहळे ।**
**भाळी लावून चरण रजाला चरणावरी लोळल।**
**चोखा गोरा आणि सावता।**
**निवृत्ती हा उभा एकटा ।**
**सोपानासह उभी मुक्ता अश्रूपुर लोटला**



सुमारे ७२८ वर्षांपूर्वी ज्या विरहाने इंद्रायणी हेलावली होती, तोच सोहळा हजारो वारकरी, भाविकांनी याची देही याच डोळा संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभुमीत वारकर्यांनी अनुभवला. माऊली संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर विष्णू महाराज यांच्या अमोघ वाणीतून समाधी सोहळ्याचे कीर्तन ऐकूण वैष्णवांचा सागर गहिवरला. भाविकांचे पाणावलेले डोळे त्याच प्रसंगाची प्रत्यक्ष अनुभुती करून देत होते.

किर्तणात याल तरी यावे लागे,अवघे माझ्या माघे माघे.

या अभंगातून माउलींच्या जीवनचरित्राची माहिती देत समाधी सोहळ्याचे वर्णन करताना अक्षरशः ज्ञानेश्वर दादा देखील भावनाविवश झाले. साडे बाराच्या सुमारास माऊलीच्या मुखावर सुर्य दर्शन झाले

आणि माउली नामाचा जयघोष करत श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा७२८ वा संजीवन समाधी सोहळा गुरुवारी पार पडला. राज्याच्या कानाकोपर्यातून आलेल्या हजारो भाविकांनी याची देही याच डोळा हा सोहळा आपल्या डोळ्यांत साठवत जन्मभुमीत असलेल्या माऊलीचे दर्शन घेतले.

सायंकाळी साडेचार ला दहिहंडीचे किर्तन होवून वारकरी,भाविकांच्या उपस्थितीत संस्थानच्या वतीने अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णू महाराज यांच्या वतीने दहिहंडी फोडून आपेगावी संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्याची सांगता करण्यात आली.


यावेळी मंदिर संस्थानच्या वतीने,तसेच अन्नदाते यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात येवून संध्याकाळी फटाक्यांच्या अतिषबाजी करुन माऊलीची पालखीतुन संपूर्ण गावात मिरवणूक काढण्यात आली.

याप्रसंगी मार्केट कमेटीचे चेअरमन राजुनाना भुमरे,दत्तात्रय गोर्डे,मनोज पेरे,पाचोडचे सरपंच शिवराज भुमरे, आप्पासाहेब निर्मळ, आपेगावचे सरपंच पाडुरंग औटे, संत एकनाथचे व्हॉ.चेअरमन प्रल्हाद औटे,आशोक औटे, प्रा.युवराज औटे सह तालुक्यातील भाविकांची उपस्थिती होती.

याप्रसंगी आपेगावात दानशूर भाविकांच्या वतीने कार्तिक काला यात्रानिमित्त श्री ज्ञानेश्वरादि चारी भावंडांचे जन्म मंदिर श्री क्षेत्र आपेगाव येथे हजारोच्या संख्येने वारकरी,भाविक उपस्थित आसतात भाविकांना माऊलीचा महाप्रसादास मिळावा म्हणून आपेगाव येथील महाप्रसाद दाते गावकरी सरसावले असुन गेल्या वर्षीपासुन प्रत्येक वर्षीच्या संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा अर्थात आपेगावचा कार्तिक काला यात्रा उत्सवात अण्णासाहेब मानसिंगराव औटे, कांतराव विश्वनाथ औटे, प्रल्हाद तात्या कल्याणराव औटे , अशोक कल्याणराव औटे, दिगंबर राव बापूसाहेब औटे,निवृत्ती शंकरराव औटे,नंदकुमार हरिश्चंद्र औटे, सुनील श्रीमंतराव औटे, रामेश्वर सुसे, सचिन औटे, महाप्रसादाचे आयोजन केले होते.

माऊली चरणी संकल्प करुन महाप्रसाद यांच्या वतीने काला प्रसाद वाटप करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर मंदिर न्यासाकडे प्रसाद यथाविधी पूर्वक सुपूर्त करण्यात आला.

# ओला इलेक्ट्रिक ओला गिग आणि ओला एस वन झेड श्रेणीच्या स्कूटर्स लाँच करण्याची केली घोषणा



छत्रपती संभाजीनगर, २८ नोव्हेंबर २०२४ : ओला इलेक्ट्रिक, भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले (ईवी) कंपनी, ने गिग आणि एस वन झेड श्रेणीच्या स्कूटर्स लाँच करण्याची घोषणा केली, ज्यामुळे लोकांमध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटी आणली गेली. स्कूटरच्या नवीन श्रेणीमध्ये ओला गिग, ओला गिग प्लस, ओला एस वन झेड आणि ओला एस वन झेड प्लस चा समावेश आहे ज्यांची किंमत अनुक्रमे ३९,९९९ रुपये (एक्स-शोरूम), रुपये ४९,९९९ (एक्स-शोरूम), रुपये ५९,९९९ (एक्स-शोरूम) आणि ६४,९९९ रुपये (एक्स-शोरूम) आहे. गिग आणि एस वन झेड मालिकेसाठी बुकिंग आज फक्त रुपये ४९९ पासून सुरू होते. या नवीन स्कूटर्स टिकाऊ, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या आहेत. त्यांच्याकडे ग्रामीण, निमशहरी आणि शहरी भागातील ग्राहकांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक गरजा पूर्ण करण्यासाठी काढता येण्याजोग्या बॅटरीसह येण्याची लवचिकता देखील आहे.

आपल्या नवीन स्कूटर्स आणि विद्यमान पोर्टफोलिओसह, ओला इलेक्ट्रिकचे उद्दिष्ट सर्व श्रेणींमध्ये परवडणारी ऑफर देऊन इलेक्ट्रिक वाहनांच्या सेगमेंटचा विस्तार करण्याचे आहे. या स्कूटर्स ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करतील आणि जनतेला इलेक्ट्रिक मोबिलिटी आणतील. ओला गिग आणि ओला एस वन झेड मालिकेचे वितरण अनुक्रमे एप्रिल २०२५ किंवा मे २०२५ मध्ये सुरू होईल.

ओला एस वन झेड वैयक्तिक गतिशीलता वाढवेल; हे विद्यार्थी, तरुण व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक इत्यादींसाठी डिझाइन केलेले आहे. ओला एस वन झेड प्लस हे ई-कॉमर्स/डिलिव्हरी भागीदार आणि हलके-मध्यम व्यावसायिक क्रियाकलापांसाठी डिझाइन केलेले आहे, वैयक्तिक आणि व्यावसायिक वापरासाठी चांगले. पॉवरपॉड ९,९९९ रुपये ला लाँच केला, जो एक इन्व्हर्टर आहे आणि ओलाच्या पोर्टेबल बॅटरीमधून घरांना उर्जा देऊ शकतो. ओला इलेक्ट्रिकचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर भाविश अग्रवाल म्हणाले, ओला येथे, आम्ही देशाच्या कानाकोपऱ्यात इलेक्ट्रिक मोबिलिटी आणण्यासाठी वचनबद्ध आहोत. आमचे ओला गिग आणि ओला एस वन झेड (ईवी) दत्तक घेण्यास गती देतील. या स्कूटर्स परवडणाऱ्या, विश्वासार्ह आणि सुरक्षित आहेत, विविध वैयक्तिक आणि व्यावसायिक गरजा पूर्ण करतात. त्यांची पोर्टेबल बॅटरी ओला पॉवरपॉडच्या मदतीने इन्व्हर्टर म्हणून काम करू शकते, जी घरगुती उपकरणांना वीज देऊ शकते.

# माझे माझ्या जिवाभावाच्या लोकांशी असलेले नाते कधीच तुटणार नाही : आ. शिवाजीराव कर्डिले



नगर : विधानसभा निवडणुकीतील सहाव्या विजयानंतर राहुरी विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार शिवाजीराव कर्डिले यांचा जनता दरबार पुन्हा सुरू झाला आहे. निकालानंतर मुंबईत पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी, सरकार स्थापनेच्या बैठका आटोपताच कर्डिले नगरला परतले असून आज बुधवारी बुऱ्हाणनगर येथील निवासस्थानी सकाळी सात वाजता त्यांचा जनता दरबार सुरू झाला आहे. तर ते आमदार झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मोठ्या संख्येने आलेल्या नागरिकांकडून सत्कार स्विकारतानाच अडचणी, प्रश्न घेऊन आलेल्यांना दिलासा देण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. गेली दोन महिने निवडणुकीसाठी पायाला भिंगरी बांधून प्रचंड मेहनत घेतली असली तरी कुठल्याही प्रकारचा थकवा त्यांच्या चेहऱ्यावर दिसला नाही.

राहुरी विधानसभा मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत कर्डिले यांनी पुन्हा विजयश्री खेचून आणत माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. निकालानंतर लगेचच त्यांनी अतिशय विनम्रपणे आपल्या विजयाचे श्रेय त्यांच्यावर ३० वर्षापासून प्रेम करणाऱ्या जनतेला दिले. सर्वसामान्य जनतेचा विश्वास आणि प्रेम यामुळेच माझ्यासारखा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्ती सहाव्यांदा आमदार झाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. निकाल घोषित झाल्यानंतर पक्षाच्या बैठका, नेत्यांच्या भेटीगाठी घेण्यासाठी ते मुंबईला रवाना झाले. तिथले सगळे सोपस्कार पूर्ण करून ते लगेचच आपल्या माणसांत परत आले. आणि बुधवारी सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी मतदारसंघातील जनतेने रिघ लावली होती . एकीकडे सत्कार स्वीकारत असतानाच ते फोनाफोनी करून लोकांच्या समस्या सोडवत होते. भावी मंत्री म्हणून अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. पण मंत्री असू किंवा नसू माझे माझ्या जिवाभावाच्या लोकांशी असलेले नाते कधीच तुटणार नाही असा संदेश देत त्यांनी आपले रोजचे काम त्याच तडफेने सुरू केले.


## विभागीय लोकशाही दिनाचे ९ डिसेंबर रोजी आयोजन

छत्रपती संभाजीनगर,दि. २८: विभागीय स्तरावरील लोकशाही दिनाचे डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी ९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. तसेच नियमित विभागीय लोकशाही दिन संपल्यानंतर विभागीय माहिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

तक्रार करण्यासाठीचे अर्ज विहित मुदतीत नमुना प्रप्रत्र-१ (क) मध्ये दोन प्रतीत आवश्यक त्या कागदपत्रासह विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवक शाखा प्रमुख (नायब तहसीलदार) यांच्याकडे स्विकारण्यात येणार आहेत. विहित नमुना अर्ज प्रप्रत्र-१ (क) आवक शाखेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. विभागीय महिला लोकशाही दिनासाठी पिडीत महिलांनी विहीत नमुन्यातील मुदत पुर्व अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, तथा सदस्य सचिव यांच्याकडे सादर करावेत. अर्जाच्या दोन प्रती विभागीय लोकशाही दिनाच्या दिवशी विभागीय आयुक्त यांच्याकडे समक्ष पुन्हा सादर कराव्यात. तसेच ज्यांनी यापुर्वीच्या विभागीय स्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेले असतील परंतू त्यांचे प्रकरणात अद्याप कार्यवाही झाली नाही, अशा प्रकरणात त्यांना पुन्हा अर्ज देता येणार नाही.

जिल्हास्तरावरील लोकशाही दिन कार्यक्रमात ज्या प्रश्नांची सोडवणूक होवू शकली नाही किंवा या प्रश्नाबाबत जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रारदाराचे समाधान झाले नाही, असे सर्व प्रश्न विभागीय स्तरावरील लोकशाही दिनामध्ये घेण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्त कार्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## भावाच्या पत्नीस वाचवितांना केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानाचा मृत्यू



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ नोव्हेंबर - पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील लाखेगाव येथे विहिरीत पडलेल्या भावाच्या पत्नीस वाचविण्यासाठी गेलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानाच्या डोक्याला मार लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना लाखेगाव ता.पैठण येथे घडली. करण छगन कच्छे वय २७ वर्षे रा.लाखेगाव ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर हा तरुण दिल्ली येथे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात कार्यरत असुन तो काही दिवसांपूर्वी गावी सुट्टीवर आला होता. आज दि २८ नोव्हेंबर रोजी २:३० वाजे दरम्यान त्याच्या भावाची पत्नी संगीता राहुल कच्छे वय ३२ या गावाजवळील सरकारी विहिरीत पडल्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी करण कच्छे याने विहिरीत उडी मारली मात्र त्यांच्या डोक्याला विहिरीतील दगड लागल्यामुळे त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असुन विहिरीत पडलेल्या वहीनींचे प्राण वाचले आहेत.या घटनेची माहिती बिडकीन पोलीसांना मिळतात घटनास्थळी जाऊन करन कच्छे यास ग्रामीण रुग्णालय बिडकीन आणले असता वैद्यकीय अधिकारी डॉ अस्मा शेख यांनी तपासून मृत्यू घोषित बिडकीन पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अशोक माने व सहाय्यक फौजदार जगन्नाथ उबाळे करत आहे.

## वेरुळ येथे पंडित राघव मिश्रा यांच्या महाशिवपुराण कथेस मोठा प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ येथील बारावी ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर च्या पवनभूमीत. संत जनार्दन स्वामी आश्रमातील भव्य अशा डोम मध्ये रविवारी (ता. २४) पंडितजी मिश्रा यांचे चिरंजीव पंडित राघवजी मिश्रा यांच्या महा शिवपुराणकथेस सुरुवात झाली असुन, सदरील कथा एक ते चारच्या दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. लासुर स्टेशन येथील घृष्णेश्वर प्रतिष्ठान हे या कथेचे आयोजक असुन, महिला पुरुष भाविकांनी कथा ऐकण्यासाठी मोठी गर्दी केली होती. वेरुळ येथील महाशिवपुराण कथा संबोधित करतांना पंडित राघवजी मिश्रा यांनी सांगितले की शिव भगवान हे सर्वत्र वसलेले असुन विवीध रुपात विविध अवतारात आहेत, जीवनात वेळेला खुप महत्व असुन, योग्य वेळी शिवपुजन, वंदन झाले पाहिजे. कर्म श्रेष्ठ असेल जीवन समर्पित झाल्यासारखे आहे.असुन, योग्य वेळी शिवपुजन, वंदन झाले पाहिजे. कर्म श्रेष्ठ असेल जीवन समर्पित झाल्यासारखे आहे. या कथेसाठी नाथ , आश्रम वेरूळ येथील प्रमुख , सद्गुरु अक्काताई महाराज , टाका स्वामी.

या कथेच्या आयोजनसाठी घृष्णेश्वर प्रतिष्ठानचे सोपान नारखेडे यांच्यासह विशाल मुंदडा, संतोष बिरुटे, रतन जानराव, कैलास हिंगमिरे, अतुल गुंजकर, सुनिल औटे हे परिश्रम घेत आहेत.

# बाणेरच्या मणिपाल हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी अत्याधुनिक पीओईएम शस्त्रक्रिया करुन वाचवले दुर्मिळ अशा गिळण्यास होणाऱ्या समस्येतून ३४ वर्षीय रुग्णाचे प्राण

छत्रपती संभाजीनगर - अगदी नुकत्याच घडलेल्या घटने मध्ये पुण्यातील बाणेर येथे असलेल्या मणिपाल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी गिळण्यास त्रास होत असलेल्या दुर्मिळ अशा समस्येशी झगडणा-या ३४ वर्षीय रुग्णावर यशस्वी उपचार केले आहेत. हा रुग्ण डिसफेजिया या आजाराने त्रस्त होता आणि त्यामुळे त्याला गिळण्यास त्रास हाणे, उलट्या होणे, मळमळणे, भूक न लागणे अशी लक्षणे दिसून येत होती त्याच बरोबर गेल्या सहा महिन्यांपासून हा त्रास असल्याने त्याच्या जीवनशैलीवर यांचा घातक परिणाम होत होता. त्याच बरोबर त्याची ही परिस्थिती पहाता त्याच्यावर एसोफॅगो-गॅस्ट्रो-ड्युओडेनोस्कोपी (ओजीडी स्कॉपी) ही करण्यात आली होती. यातून असे दिसून येते की त्याला अचलसिया कार्डियाचा सुध्दा त्रास आहे. त्याची तपासणी केल्यावर डॉ. प्रसाद भाटे आणि त्यांच्या चमूने त्याच्यावर पर ओरल एन्डोस्कोपिक म्योटोमी (पीओईएम) प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी अचलसिया कार्डिया हा आणखी एक दुर्मिळ असा लोअर एसोफेजियल स्फिंक्टर (एलईएस) आजार झाल्याचे निदान करण्यात आले. या आजारातील एसोफेगल रक्तवाहिन्या या घट्ट झाल्यामुळे एलईएस प्रसरण पावत नव्हते ज्यामुळे सेवन केलेले अन्न आणि द्रवपदार्थ हे पोटात जातच नव्हते. जगभरांत दर १ लाख लोकांमध्ये अचल्सिया कार्डियाच्या केवळ ८-१२ केसेसच सापडतात.

या केस बद्दल माहिती देतांना पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल चे कन्सल्टंट गॅस्ट्रोन्ट्रोलॉजिस्ट डॉ. प्रसाद भाटे यांनी सांगितले अचल्सिया कार्डिया ही खूपच जटील केस असल्याने त्यावर उपचार करणे खूपच कठीण काम असते. पीओईएम पध्दती ही मिनीमली इन्व्हेझिव्ह अशी एन्डोस्कोपिक प्रक्रिया असल्याने ओपन सर्जरी करण्याची शक्यता खूपच कमी होते. यामुळे रुग्ण लवकर बरा होतो आणि सुधारीत निष्कर्श प्राप्त होतो. आमचा रुग्ण तर सर्जरी झाल्यापासून अगदी दोन तासांत पाणी पिऊ लागला आणि काही दिवसातच द्रवरुपातील अन्न आणि दहा दिवसात मऊ भोजनही घेऊ लागला. एसोफिगल मॅनोमेट्री, हे हॉस्पिटलच्या नवीन बांधण्यात आलेल्या जीआय मोबिलिटी लॅबचे अत्याधुनिक निदान उपकरण असून यामुळे निदान हे अधिक सोप्या पध्दतीने करता येते. या टेस्ट मध्ये इसोफेगल पेशींच्या लवचिकतेसह एलइएस कार्यक्षमतेचा अभ्यास करुन गिळण्याच्या प्रक्रियेतील अचलेसिया सारख्या समस्यांवर इलाज करणे शक्य होते.

पीओईएम प्रक्रियेची सुरुवात ही संपूर्णत: एन्डोस्कोपिक पध्दतीने केली जाते आणि यामध्ये इसोफिगल मसल्सवर एक कट देऊन उद्भवणारी समस्या काढून सर्वसाधारण पणे गिळण्याची प्रक्रिया तयार केली जाते. पीओईएम मुळे आता परंपरागत अशा हेलर मायोटोमी आणि न्युमॅटिक डायलेशन सारख्या पध्दतींवर मात केली आहे, कारण या कमी जखम करणारी आणि वेगाने बरी होणारी प्रक्रिया आहे.

हॉस्पिटलच्या क्षमतांबद्दल बोलतांना पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल चे क्लस्टर डायरेक्टर श्री आनंद मोटे यांनी सांगितले बाणेर मधील मणिपाल हॉस्पिटल मध्ये आम्ही नेहमीच पीओईएम सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आमच्या रुग्णांना सर्वोत्कृष्ट उपचार देण्यावर भर देत असतो. यातून अत्याधुनिक तंत्रज्ञानासह रुग्ण केंद्रित दृष्टिकोना प्रती आमची प्रतिबध्दता दिसून येते. या केस मधील उपयुक्त उपचारांमुळे हॉस्पिटलचे जागतिक स्तरावरील गॅस्ट्रोइंटरस्टायनल केअर बद्दलचे नेतृत्व दिसून येते आणि त्याच बरोबर दुर्मिळ अशा वैद्यकीय स्थितीत सुध्दा क्रांतिकारी पर्याय उपलब्ध होण्यास मदत होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परभणी जिल्हयाला या मंत्रिमंडळात मंत्रीपद मिळण्याची अपेक्षा !




## परभणी विधानसभा निवडणूक : मंत्रिपदासाठी जिल्हयातील मतदारांची वाढली उत्कंठा

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी जिल्हयाच्या पदरी नेहमीच निराशा हाती लागली आहे. परंतू नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूकीत जिल्हयात महायुतीच्या तीन उमेदवारांनी आपला दणदणीत विजय मिळविला असून या तिन्ही उमेदवारांसह जिल्हयातील मतदारांना देखील जिल्हयात यंदा तरी तीन मंत्रिपद मिळण्याची दाट अपेक्षा असल्याचा सुर चर्चेतून ऐकावयास मिळत आहे.

परभणीकरांना या ''मंत्रिमंडळात'' स्थान मिळण्या चीं अपेक्षा!



परभणी ( प्रतिनिधी)विधासभा निवडणुकी मध्ये महायुती ने आपला विजयाचा झेंडा फडकवीला असून आता मुख्यमंत्री व त्याा सोबतच नवीन मंत्रिमंडळ स्थापन करण्याची लगबग सुरु आहे या नवीन मंत्री मंडळात परभणी जिल्ह्याला नक्की स्थान मिळेल अशी परभणी जिल्ह्यातील जनतेला अपेक्षा आहे. महराष्ट्रात युतीने विधान सभा निवडणुकीत अभूतपूर्व असे यश मिळविले त्यााच प्रमाणे परभणी जिल्ह्याने ही चांगले प्रदर्शन करत चार पैकी तीन मतदार संघात महा युतीचे तीन उमेदवार विजयी झाले. परभणी जिल्ह्या ला गेले अनेक वर्षा पासून मंत्री पद मिळाले नसून दर वेळी मंत्री पद मिळणार अशी वांझोटी चर्चा होते पण मंत्रिपद मात्र मिळत नाहीं. दर वेळेस पर जिल्ह्यातील पालक मंत्रिपद परभणी जिल्ह्यावर लादण्यात येते त्याालाा जिल्ह्याचा कोणताही अभ्यास नसतो केवळ सदरील पालकमंत्री फक्त झेंडावंदन साठी म्हणून वर्षातून दोनदा हजेरी लावतो त्याा मुळेच परभणी जिह्याचा विकास खुंटला असल्याची भावना जिल्ह्यातील जनतेची झाली आहे. जिंतूर मतदार संघात महायुती च्या आमदार सौ मेघना बोर्डीकर साकोरे या विजयी झाल्या असून ही त्यांची दुसरी टर्म आहे या पूर्वी २०१९च्या विधानसभा निवडणुकीम ध्ये त्याा विजयी झाल्या होत्याा. गंगाखेड मतदार संघातून आमदार डॉ. रताकर गुट्टे हे विजयी झाले असून गुट्टे चीं ही विधासभेत जाण्याची ही दुसरी वेळ आहे पाथरी विधान सभा मतदार संघातून महायुती चे आमदार राजेश विटेकर हे विजयी झाले असून ते विद्यम ान विधानपरिषद सदस्य आहेत. वरील तीनही निवडून आलेले उम ेदवार अभ्यासू असून उच्चशिक्षित आहेत. त्याा मुळे तिघांपैकी किमान एका ला तरी मंत्रिपद मिळावे ही परभणीकरांची रास्त अपेक्षा आहे.

## श्रीराम प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांना ईएसएफईकडून स्टार एज्युकेशन अवॉर्ड

**सेलू,/प्रतिनिधी:** श्रीराम प्रतिष्ठान संचालित एल.के.आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश सीबीएसई स्कूलचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांना शाळेतील अभिनव उपक्रमांसाठी ईएसएफईकडून स्टार एज्युकेशन अवॉर्ड प्रदान करण्यात आला.

सदरिल पुरस्कार मंगळवार २६ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे आयोजित एका विशेष सम ारंभात देण्यात आला.

डॉ. रोडगे यांनी शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नवीन उपक्रम राबवले आहेत. यात रोबोटिक्स लॅब, मोबाईल एक्सपेरिमेंटल लॅब, विद्यार्थी गेमिंग झोन आणि इंग्लिश लँगवेज लॅब यांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक विषयांबरोबरच नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळत आहे.

या पुरस्कारासाठी डॉ. रोडगे यांना शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थीवर्ग तसेच श्रीराम प्रतिष्ठान संचलित घटक संस्थेतील प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या .श्रीराम प्रतिष्ठान ही शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारी संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून अनेक शाळा आणि महाविद्यालये चालवली जातात.

## संक्षिप्त वृत्त...

### लाच प्रकरणातील दोघांना पोलिस कोठडी

**परभणी,/प्रतिनिधी-** विद्युत रोहित्र बंद पडल्याचा अहवाल देण्यासाठी शेतकऱ्याकडून १५ हजार रुपयांची लाच स्विकारल्याच्या प्रकरणातील दोघांना न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सूनावली आहे.

मानवत तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या शेतातील विद्युत रोहित्र बंद पडल्याचा अहवाल देण्यासाठी महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्याने संबंधिताकडे २० हजाराची लाच मागून तडजोडीअंती मंगळवारी (दि.२६) कंत्राटी तंत्रज्ञामार्फत १५ हजार रूपये स्विकारल्याने त्याा दोघांना सापळा रचून अटक करण्यात आली. बुधवारी (दि.२७) या गुन्ह्यातील दोन्ही अटक आरोपींना न्यायालयासमक्ष हजर केले असता न्यायालयाने तपासकामी एक दिवसाची पोलीस कोठडी सूनावली आहे. आरोपींमध्ये कनिष्ठ अभियंता मोहम्मद तलहा मोहम्मद हिमायत ( महावितरण ग्रामीण शाखा १ मानवत रा.आलमगीर कॉलोनी, परभणी) आणि कंत्राटी तंत्रज्ञ महेश शिवरुद्र कोल्हेकर (महावितरण ग्रामीण शाखा १ मानवत रा.मानवत) यांचा समावेश आहे.

### क्रीडा भारतीकडून ऑनलाईन क्रीडा ज्ञान परिक्षेचे ८ डिसेंबर रोजी होणार आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** क्रिडा भारती परभणीच्या वतीने ८ डिसेंबर रोजी राज्यस्तरीय ऑनलाईन क्रिडा ज्ञान परिक्षेचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयातील मुख्याध्यापक, क्रिडा शिक्षक व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा अध्यक्ष डॉ. अशोकराव सेलगांवकर यांनी केले आहे.

या परिक्षेत ५० प्रश्न विचारण्यात येणार त्याकरीता २५ मिनिटांचा कालावधी असणार आहे. ८ डिसेंबर रोजी सकाळी ५ ते सायंकाळी ५ या वेळेत स्पर्धक आपल्या वेळेनुसार स्पर्धेत सहभागी होवू शकतो. स्पर्धेकरीता १२ ते ८० वर्षांपर्यंत वयोमर्यादा असणार आहे. सहभागाकरीता २० रुपये नोंदणी फिस आकारण्यात येणार असून ३० नोव्हेंबर पर्यंत ती ऑनलाईनद्वारे भरावी लागणार आहे. नोंदणी वैयक्तिक किंवा सामूहीक करता येईल.

या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक १ लाख रुपये देण्यात येणार आहे. द्वितीय ५० हजाराचे पारितोषिक दोन विजेत्यांना दिले जाणार आहे. तृतीय पारितोषिक हे २५ हजारांचे असून ते ६ विजेत्यांना दिले जाणार आहे. तर चतुर्थ पारितोषिक हे ११ हजाराचे असून ते ११ विजेत्यांना दिले जाणार आहे. पारितोषिके ही केवळ २५ वर्षापर्यंतच्या स्पर्धकांनाच देण्यात येणार आहेत. दरम्यान, अधिक माहितीसाठी कृष्णा कवडी ९४२३४४३३२१, मंगेश इंगळे ८६९८३०१५३०, संभाजी शेवटे ९८६०९८७०२७, बाळासाहेब कापरे ७७५७९२७७२३, ढोबळे ९४२०९६३६५९ यांच्याशी संपर्क साधावा तसेच जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालय यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा अध्यक्ष डॉ. अशोकराव सेलगांवकर यांनी केले आहे.

### सुशिक्षित बेरोजगारांना काम वाटपाची सुवर्ण संधी


**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेराजगार सेवा सहकारी संस्थांना शासन निर्णयानुसार तीन लाख रुपयांपर्यंतची कामे देण्यात येत होती. सदर शासन निर्णयामध्ये वित्तीय मर्यादेत सुधारणा करून कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाने शासन निर्णय दि.२८ ऑगस्ट २०२४ अन्वये कामाची रक्कम १० लाख रुपयांपर्यंत केली आहे. भविष्यात जिल्ह्यातील विविध शासकीय/ निमशासकीय विभागाकडून १० लक्षापर्यंतची कामे जिल्हा कौशल्य विकास विभागाकडे प्राप्त होतील. त्यामुळे जिल्ह्यातील कार्यरत सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थांनी लेखापरीक्षण अहवाल २०२३-२४, संस्थेतील सर्व सभासदांचे चालू नाव नोंदणी प्रमाणपत्र, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात संस्थेची काम करण्याची तयारी असल्यास संस्थेचे इच्छापत्र, मागील वर्षाचे वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व कागदपत्रे इ. बाबी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, परभणी शासकीय त्रां प्रशाला केंद्र, नारायण चाळ, स्टेडीअम जवळ परभणी येथे ५ डिसेंबर २०२४ रोजीपर्यंत दाखल कराव्यात, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## प्रिन्सची तनिष्का अखिल भारतीय विज्ञान सेमिनारमध्ये ठरली राष्ट्रीय उपविजेती

**सेलू,/प्रतिनिधी:** नेहरू विज्ञान केंद्र मुंबई येथे नॅशनल कौन्सिल ऑफ सायन्स म्युझियम्स आयोजित राष्ट्रीय विज्ञान संगोष्ठी (नॅशनल सायन्स सेमिनार )२०२४ मध्ये श्रीराम प्रतिष्ठान संचलित एल.के.आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी तनिष्का तेलभरे यांनी उपविजेतेपद प्राप्त केले. ''कृत्रिम बुद्धिमत्ता - संभाव्यता व सरोकार'' या विषयावर आयोजित या स्पर्धेत भारतभरातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रथम परीक्षा, नंतर प्रस्तुतीकरण आणि शेवटी प्रश्नोत्तरे या तीन टप्प्यांतील स्पर्धेत तनिष्काने उत्कृष्ट कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले या यशासाठी तनिष्काच्या मार्गदर्शक शिक्षक प्रा. नारायण चौरे यांनी विशेष योगदान दिले. तनिष्काच्या राष्ट्रीय विज्ञान सेमिनारमधील उपविजेतेपदाच्या यशाने संपूर्ण शालेय कुटुंबात उत्साह निर्माण झाला आहे. या यशात डॉ. संजय रोडगे यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणा मोलाची ठरली आहे. श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष असलेले डॉ. रोडगे यांनी तनिष्काच्या कठोर परिश्रम आणि निष्ठेचे खूप कौतुक केले.तनिष्काच्या या उल्लेखनीय यशानिमित्त श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी अभिनंदन केले. विशेष म्हणजे, मुंबई येथील ताज हॉटेलमध्ये विद्यार्थ्यांना विशेष स्नेह भोजन देऊन हे यश साजरे करण्यात आले. यावरून दाखवते की शाळा आपल्या विद्यार्थ्यांच्या यशावर किती अभिमान बाळगते. डॉ रोडगे यांनी तनिष्काला फक्त शैक्षणिक विषयातच नाही तर आत्मविश्वास वाढविण्यातही मदत केली. त्यांनी तनिष्काला नेहमीच प्रोत्साहन दिले आणि तिच्यातील वैज्ञानिक क्षमता ओळखून तिला घडवण्यासाठी प्रयत केले. त्याांच्या मार्गदर्शनामुळे तनिष्काला स्वतः वर विश्वास वाटला आणि तिने या स्पर्धेत उतरून आपल्या शाळेचे नाव उंचावले. श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय रोडगे, संस्थेच्या सचिव डॉ. सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे, प्रिंसिपल कार्तिक रताला, प्रगती क्षिरसागर आणि इतर शिक्षकवर्ग यांनीही तनिष्काच्या यशाला उजळणी दिली व अभिनंदन केले. डॉ संजय रोडगे, प्रगती क्षीरसागर व तनिष्काचे पालक अनंत तेलभरे या कार्यक्रमासाठी मुंबई येथे उपस्थित राहून या घवघवीत यशाचे साक्षीदार झाले.




## पशुगणनेस प्रारंभ : पशुपालकांनी माहिती द्यावी



**परभणी,/प्रतिनिधी:** केंद्र पुरस्कृत पंचवार्षिक २१ वी पशुगणना दिनांक २५ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालवधीत होणार असून सोमवारपासून (दि.२५) पशुगणनेस प्रारंभ झाला आहे. सदर कालावधीत पशुसंवर्धन विभागामार्फत नेमण्यात आलेले प्रगणक घरोघरी जाऊन, पशुधनाची माहिती घेणार आहेत.

सदर पशुधनाच्या माहितीमध्ये कुंटूबामध्ये असलेल्या गाय वर्ग, म्हैसवर्ग, शेळी व मेंढी, वराह, घोडे व गाढवे, कुक्कुट पक्षी इत्यादीच्या संख्येची नोंद करण्यात येणार आहे. या पशुगणनेमध्ये पशुधन संख्येसोबतच पशुधनाच्या प्रजाती, लिंग, वय, इत्यादी बाबीची नोंद करण्यात येणार आहे. या पुर्वीची पशुगणनाही टॅबद्वारे करण्यात आलेली होती. तथापि आताची मोबाईल वरील ॲपद्वारे करण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र ॲपची निर्मिती केलेली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत असलेल्या पशुगणनेमुळे पशुपालकांना शासकीय योजनांचा लाभ घेणे (पशुरोग प्रतिबंधक लसीकरण, वैरण बियाणे, पशुखाद्य, पशु औषधी, मुरघास, खनिज मि श्रण, पशुधन विमा इत्यादी) सुलभ होणार आहे. त्याचप्रमाणे नैसर्गीक आपत्ती, वन्यजीवाकडून मृत्यू, गोशाळेतील पशुधनास अनुदान, पशु सांसर्गिक रोग प्रादुर्भावामुळे मृत्यू, विजेच्या संपर्कमुळे मृत्यू इत्यादी कारणाने पशुपालकांना मिळणाही नुकसान भरपाई मिळणेही सोईचे व सुलभ होणार आहे.

## नेताजी सुभाष माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**मानवत,/प्रतिनिधी:** येथील नेताजी सुभाष शिक्षण संस्थेच्या नेताजी सुभाष माध्यमि क व उच्चमाध्यमिक विद्यालया मध्ये भारतीय संविधान दिन म ोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक २६/११/२०२४ रोजी नेताजी सुभाष मध्यामिक व उच्च माध्यमिक विद्यालय मानवत.येथे ''भारतीय संविधान दिन'' मोठ्या उत्सहाने साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुखयाध्यापक श्री संजय लाड सर,पर्यवेक्षक श्री. व्ही.पी.बुधवंत तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवराज नाईक ,श्री शेषेराव ढगे श्री अशोक काळे श्री डी. एस.कौसाईतकर ,क्रीडा शिक्षक श्री माणिक शिसोदे ,श्री.अशोक हारकाळ श्री केशव बाभळे , श्रीमती.कुसुमताई कनकुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुरवातीला मान्य मान्यवरांच्या हस्ते महामानव विश्वरत,भारत रत,डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन आणि संविधानाचे पूजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आले. संविधान दिनानिमित्त श्रीमती कुसूमताई कनकुटे यांनी. विद्यार्थ्यांना ''संविधानाच्या निर्मिती बद्दल'' आणि ''महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अथक असे परिश्रम आपल्या भारतीय जनता साठी किती म ोलाचे आहे.



**परभणी- प्रभाग क्रमांक १५ मधील शंकर नगर कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यासाठी शिवसेना पक्षाचे महानगर प्रमुख प्रविण देशमुख यांनी अल्पसंख्याक निधीतून मंजूर करून आणले. या कामाचे भूमिपूजन संपन्न झाले. याप्रसंगी प्रवीण देशमुख,बाळासाहेब पानपट्टे, नितीन वट्टमवार, डॉ.अजय चव्हाण, डॉ. रमेश राठोड,डॉ. डुब्बेवार साहेब,संतोष गायकवाड,छोटूभाई,जावेदभाई.रफिकभाई. नारायण पानपट्टे.गजानन मस्के.प्रभाग १५ मधिल डॉ. कार्ले, डॉ.डुब्बेवार, आदी दिसत आहेत.**

## बाजार समिती जिंतूरच्या मार्केट यार्डात जाहिर लिलावात कापसाला रू.७५२१/- भाव

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर/ प्रतिनिधी-** कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर मध्ये मोठ्या प्रम ाणावर कापुस विकीस येत आहे. आज दिनांक २६.११.२०२४ रोजी जाहिर लिलावात कापसाला उच्चांक ७हजार ५२१/- रूपये दर मिळला. तरी सर्व शेतकऱ्यांना टॉवेल, टोपी, श्रीफल देण्यात आले.

दरम्यान शेतकऱ्यांनी एफ.ए.क्यु. दर्जाचा माल विक्रीसाठी आणावा जेणे करूण शेतकऱ्यांना हमीभावाचा फायदा होईल. शेतकऱ्यांनी आपला कापुस बाजार समिती मार्केट यार्डत सकाळी १०.०० वाजेपर्यंत घेऊन यावा. तसेच कापुस जाहिर लिलाव सुरू झाल्याने शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे फायदा होत आहे. तसेच जाहिर लिलावात सी.सी. आय. खरेदी करीत असल्याने हम ीभावाने सुध्दा कापुस खरेदी होत आहे. तसेच बाजार समितीकडून असे अवाहन करण्यात येते की, सर्व कापुस उत्पादक शेतकऱ्यानी कापुस लिलावास अणते वेळेस काडी-कचरा विरहीत व आर्दता कमी असलेला कापुस विक्री करीता आणावा असे अवाहन सभापती गंगाधर बोर्डीकर यांनी केले.



सी.सी.आय. खरेदी केंद्रावर कापुस विक्री करीता आणताना आधार कार्डशी लिंक असलेले बैंक पासबुक झेरॉक्स, आधार कार्ड, सातबारा व आठ (अ) सोबत आणावे. तसेच सन २०२४-२०२५ च्या सातबारा उताऱ्यावर कापुस पिकाची नोंद असणे आवश्यक आहे. कापुस विक्रीच्या वेळी शेतकऱ्यांनी स्वतः हजर राहावे. शेतकऱ्यांकडून ८ ते १२ टक्के आर्दता असलेला कापुस हमीभावाने खरेदी केला जाईल. तसेस हेक्टरी ३० क्विंटल कापुस उत्पादकता ग्राह्य धरण्यात येईल असे सी.सी.आय. ग्रेडर श्री. पवनकुमार महारिया यांनी स्पष्ट केले. यावेळी बाजार समितीचे सभापती गंगाधर बोर्डीकर, उपसभापती सुंदरराव चव्हाण, संचालक सचिन देवकर, रमण तोष्णीवाल कापुस जिनींगचे मालक घनश्याम अग्रवाल, सत्यानारायण दरगड, गुंजनकुमार, पंकज तोष्णीवाल, संतोष दरगड, बाजार समिती सचिव गणेश हरगांवकर, अश्विन कारंजकर, सुदाम सरकटे, अशोक पवार, प्रविण देशमुख, संदिप कुटे, प्रमोद राठोड इ. सर्व कर्मचारी व सौ. शोभाबाई कदम, भिमराव खापरे, प्रकाश घुगे, संजय चव्हाण, जनार्धन घुगे, मुंजाजी जावडे, शिवाजी चौधरी,

### प्रा.धोंडगे यांना रासेयो पुरस्कार

**जिंतूर,/प्रतिनिधी-** येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रो. डॉ. पंढरीनाथ धोंडगे यांना नुकताच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा 'राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी' पुरस्कार जाहीर झाला आहे.

डॉ. धोंडगे हे ज्ञानोपासक महाविद्यालयात मागील चार वर्षांपासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी म्हणून काम पाहत आहेत. प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. धोंडगे व डॉ. निवृत्ती पोपतवार, प्रा. संतोष कदम यांनी कोरोना काळात जिंतूर तालुक्यात कोविड लसीकरण जनजागृती मोहीम प्रभावीपणे राबवली होती. तसेच कोविड लसीकरण शिबिराचेही आयोजन केले होते. याशिवाय मागील तीन वर्षांत महाविद्यालय परिसर व दत्तक घेतलेल्या अंबरवाडी आणि येनोली या गावांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता अभियान राबविले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# उल्लेखनीय दायित्वाच्या कामाचे प्राधान्यक्रम ठरवून प्रस्ताव सादर करा

## अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या सूचना



**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**

जिल्हा वार्षिक योजनेत चालू वर्षासाठी ४० टक्के तरतूद प्राप्त झाली आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने जिल्हा वार्षिक योजनेतील उल्लेखनीय दायित्वाच्या कामाचे प्राधान्यक्रम ठरवून प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी आयोजित आढावा बैठकीत दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, समाज कल्याणचे सहायक आयुक्त यादव गायकवाड यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

चालू वर्ष सन २०२४-२५ साठी निधी मागणी व प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. सन २०२५-२६ चे प्रारुप आराखडे परिपूर्ण स्वरुपात सादर करावेत. तसेच सदरचे आराखडे आयपासवर अपलोड करावेत. मागील वर्ष सन २०२३-२४ च्या दायित्वाचे प्रस्ताव विलंबाच्या सुस्पष्ट कारणासह सादर करावेत. ज्या विभागाचे उपयोगिता प्रमाणपत्र राहिलेले आहेत, त्यांनी तातडीने उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावेत, अशा सूचना विभाग प्रमुखांना अपर जिल्हाधिकारी श्री. परदेशी यांनी यावेळी दिल्या .

यासोबतच अपर जिल्हाधिकारी श्री. परदेशी यांनी मृद व जलसंधारण, पशुसंवर्धन, मत्स्यविभाग, वनीकरण विभाग, जलयुक्त शिवार, पंजाबराव देशमुख कृषी व्याज सवलत योजना, पाटबंधारे, पूरनियंत्रण, क्रीडा, पाणीपुरवठा, स्वच्छता, नगरविकास, पर्यटन, ऊर्जा, महिला व बालकल्याण, रस्ते व पूल, पर्यटन विकास आदी विविध योजनांसह अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनांचा आढावा घेऊन सूचना केल्या. यावर्षी संविधानाचा अमृत महोत्सव वर्षभर साजरा करण्यात येणार आहे. या अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर संविधान अभियान' राबविण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालये यासह सर्व शासकीय कार्यालयांनी आपल्या कार्यालयात दर्शनी भागात संविधान उद्देशिका लावण्यात यावी. तसेच शाळा, महाविद्यालयामध्ये संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करावेत. विविध स्पर्धा, व्याख्याने आयोजित करावेत. ही मोहिम लोकचळवळ स्वरुपात राबवून ही मोहीम यशस्वी करावी, अशा सूचना केल्या.

तसेच मुख्य सचिव व विभागीय आयुक्तांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे संविधान दिवस व अन्य कार्यक्रम घेणे, जिल्हा व तालुकास्तरावर संविधान भवन निर्माण करणे, पर्यटन विभागाच्या योजना, विकास कामे, जलयुक्त शिवार अभियान यासह जिल्ह्यात राबविण्यात येत असलेले मोठे प्रकल्प, पाणीपुरवठा योजना, रस्ते, रेल्वे प्रकल्प, बंधारे, मनरेगा, सिंचन विहिरी, शेततळे, ग्रामसडक योजना, मागेल त्याला सौर पंप, सिंचन प्रकल्प, पिक विमा योजना, वार रुम प्रकल्प (भूसंपादन), सीएम डॅशबोर्ड, ई-ऑफिस, ग्रीव्हन्स रिड्रेसल आदी कामाचा मुद्देनिहाय माहिती तात्काळ सादर करावी, अशा सूचनाही श्री. परदेशी यांनी यावेळी दिल्या.

# बालविवाहमुक्त भारत अभियानांतर्गत विविध ठिकाणी जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील मसोड येथील ग्रामपंचायत कार्यालय व हिंगोली तालुक्यातील खानापूर (चित्ता) येथील विद्यासागर विद्यालयात तसेच हिंगोली येथील सरजुदेवी भिकुलाल भारूका बाल विवाहमुक्त भारत या अभियानाअंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी बाल कल्याण समितीचे सदस्य परसराम हेंबाडे यांनी बाल विवाहमुक्त भारत करण्यासाठी जबाबदार यंत्रणा आणि त्यांचे योगदान या विषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील दामिनी पथकातील श्री. सरनाईक व आरती साळवे यांनी डायल ११२ व पोलिसांची भूमिका याबाबत उपस्थितांना मागदर्शन केले. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी बाल विवाह प्रतिबंध कायदा २००६ विषयी सविस्तर मार्गदर्शन केले व उपस्थित गावातील नागरिक व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांसोबत बाल विवाह प्रतिबंधासाठी प्रतिज्ञा घेतली. यावेळी गावातील ग्रामसेवक, सरपंच, अंगणवाडी सेविका, आरोग्य क्षेत्रातील डॉ. पठाण उपस्थित होते. त्यानंतर विद्यासागर विद्यालय, खानापुर (चित्ता) येथे बाल विवाह मुक्त भारत अंतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. बाल संरक्षण अधिकारी (संस्थाबाह्य) जरीब खान पठाण यांनी आंतरराष्ट्रीय दत्तक महिना नोव्हेंबर २०२४ निमित्त उपस्थित गावकऱ्यांना कायदेशीर दत्तक प्रक्रिया, प्रतिपालकत्व, नको असलेल्या नवजात बाळाचे सुखरुप समर्पण कसे करता येईल याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अनाथ, सोडून दिलेले परित्याग केलेले बाळ इत्यादी बालकांसंदर्भात माहिती मिळाल्यास तात्काळ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय हिंगोली यांना संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ता रामप्रसाद मुडे, समुपदेशक सचिन पठाडे, प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे, समुपदेशक अंकुर पाटोडे, इसार संस्थेचे अधिकारी, कर्मचारी, गावातील नागरिक व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सामाजिक न्याय विभागाच्यावतीने संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम घेऊन संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भारतीय संविधानास ७४ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ पासून संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्यानिमित्त समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड व परभणी येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव अर्चना ताम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, हिंगोली व संविधान चौक येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन संविधानाचे वाचन करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच प्रती वर्षाप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सांस्कृतिक सभागृहात संविधान दिन कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी राजू एडके होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी यु. डी. राजपूत, सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड, बार्टीचे जिल्हा प्रकल्प अधिकारी सिध्दार्थ गोवंदे, आर्थिकदृष्ट्या मागास व मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल वर्षा घुगे, नवीन मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल सुलोचना ढोणे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महामानवाच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना संविधानाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन समतादूत सुरेश पठाडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी २०० ते २५० विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- रेल्वे विभागाने कोट्यावधी रूपये खर्च करून रेल्वे स्टेशनचा चेहरा मोहरा बदलून कायापालट केला आहे. परंतु रेल्वे स्थानकाकडे येणाऱ्या तसेच रेल्वे स्थानक परिसरातील रस्त्यांवर मात्र मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहन चालक, प्रवाशी तसेच नागरिकांना या खड्ड्यातून रेल्वे स्थानकात येतांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात तर या परिसरात पाणी साचल्यामुळे प्रवाशांचे हाल होतात. याकडे रेल्वे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोली रेल्वे स्थानकात लवकरच कॅन्टीन होणार



हिंगोली- येथील रेल्वे स्थानकातील कॅन्टीनवर एका व्यक्तीने ताबा घेतला होता परंतु याठिकाणी कॅन्टीन सुरू झाली नाही. त्यामुळे प्रवाशांना सुविधा मिळत नव्हती अखेर दि २८ नोव्हेंबर रोजी पोलिस बंदोबस्तात रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी हा ताबा उठवला असून लवकरच आता प्रवाशांसाठी कॅन्टीन सुरू होणार असून या कॅन्टीनमधून प्रवाशांना खाद्यपदार्थ, चहा विकत घेता येणार आहे. या कारवाईचे प्रवाशांमधून स्वागत होत आहे.

### हजरत जिन्दाशाह मदार संदल मिरवणूक संपन्न



हिंगोली- शहरातील डीवायएसपी कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या हजरत जिन्दाशाह मदार यांच्या मजारवर दि २५ नोव्हेंबर रोजी चादर चढविण्यात आली. त्यानंतर शहरातून घोड्यावरून संदल मिरवणुक काढण्यात आली. ही मिरवणुक इंदिरा चौक, गांधी चौक, हरण चौक आदी भागातून उत्साहात काढण्यात आली. यानिमित्त अन्नदान करण्यात आले. यावेळी दर्गा खादीम व मुतवल्ली पठाण अतिकखान ताहेरखान यांच्या नेतृत्वाखाली व सोफीसंत अफसर पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी शेख रियाज, शेख मोसीन, शेख अकील, अब्दूल रहेमान, शेख शाहरूख, शेख ईरशाद, एजाज पठाण, शेख आवेज, शेख सलीम आदींनी परिश्रम घेतले.

### पंधरा वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- जिल्ह्यात अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरूध्द पोलिसांच्यावतीने जिल्हाभरात दि २७ नोव्हेंबर रोजी कारवाई करण्यात आली. यावेळी पंधरा वाहन चालकांविरूध्द कारवाई करीत त्यांच्याकडून ८८५० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# मेरा युवा भारत हिंगोलीच्यावतीने भारतीय संविधान दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**

येथील नेहरू युवा केंद्र व मेरा युवा भारत युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकारच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन जूनियर कॉलेज ऑफ एंट्रन्स ऑफ सायन्स अँण्ड आर्ट्स हिंगोली या ठिकाणी जिल्हा युवा अधिकारी आशिष पंत यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गुरुसुडे रावसाहेब हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संविधानाची मूलभूत कर्तव्य ही आपल्या दररोजच्या जीवनामध्ये अंगीकारली पाहिजेत व त्याचे आचरण सुध्दा केले पाहिजे, असे आवाहन प्राचार्य गुरुसुडे रावसाहेब यांनी यावेळी केले. संविधान दिनाच्या निमित्ताने 'भारतीय संविधानाचे महत्त्व' या विषयावर भाषण स्पर्धा घेण्यात आली. त्याचबरोबर संविधान पदयात्रा करण्यात काढण्यात आली. महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी खूप चांगल्या पद्धतीने संविधान या विषयावर उत्तम रीतीने आपल्या भाषणातून मनोगत व्यक्त केले.

भाषण स्पर्धेतील प्रथम पारितोषिक विजेती समृद्धी कदम, द्वितीय पारितोषिक विजेते बजरंग कदम व तृतीय पारितोषिक विजेत्या ममता जैस्वाल यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार गजानन आडे यांनी केले आहे. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पशुवैद्यकीय दवाखान्यात कर्मचाऱ्यांची कमतरता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ नोव्हेंबर**

अनेक वर्षाच्या प्रतिक्षेनंतर येथील पलटण भागातील पशुवैद्यकीय दवाखाना नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत झाला आहे परंतु या दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांची रिक्तपदे असल्यामुळे कर्मचाऱ्यांची कमतरता भासत आहे. त्यामुळे पशुपालकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. हिंगोली सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्यात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे पशुंवर उपचार करण्यासाठी वेळ लागत आहे. तसेच याठिकाणी आवश्यक साहीत्यही उपलब्ध नसल्यामुळे कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

# मुख्याधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे नगर परिषद कर्मचाऱ्यांची दांडी





**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २८ नोव्हेंबर**

वसमत नगर परिषद येथे मुख्याधिकारी यांचा कर्मचाऱ्यांवर वचक नसल्याने कार्यालयीन वेळेत कुठल्याच टेबलवरचे कर्मचारी उपस्थित राहत नसल्याचा प्रकार तरुण भारतच्या निदर्शनास आला आहे. दि २८ नोव्हेंबर रोजी वसमत येथील नगरपरिषद येथे चार वाजल्यापासूनच कर्मचारी आपल्या केबिनला कुलूप लावून गेले असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या सर्व प्रकाराला जबाबदार मुख्याधिकारी असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

थंडीचे दिवस असल्यामुळे अप डाऊन करणारे कर्मचारी हे चार वाजल्यापासूनच गावाकडे जाण्याच्या वाहनाच्या प्रतीक्षेत असल्याने कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वीच कार्यालय सोडण्याचे पहावयास मिळत आहे. याचा फटका मात्र नागरिकांना नक्कीच बसत आहे.शासनामार्फत शासकीय कामात गुणवत्ता वाढवावे म्हणून विविध उपाय योजना राबविण्यात येत आहे परंतु वसमत नगर परिषद येथील कर्मचारी हे दांडी मारून आपल्या सोयीनुसार ये जा करत असल्याचे पहावयास मिळत आहे याप्रसंगी संबंधित मुख्याधिकारी यांना तरुण भारत वृत्तपत्राच्या प्रतिनिधींनी फोन द्वारे संपर्क साधला असता ते म्हणाले की मी आत्ताच ऑफिस मधून निघालो बाकीचे कर्मचारी हे कुठेतरी गेले असतील असे सांगून आपली जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. परंतु तरुण भारतच्या प्रतिनिधींनी हा सर्व प्रकार तरुण भारत कॅमेरात कैद केला आहे आता याकडे जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी यांनी कारवाईचा बडगा उचलतात का? हे पाहणे देखील तितकेच गरजेचे आहे.

एकेकाळी बायोमेट्रिक मशीन असल्यामुळे कर्मचाऱ्यांना वेळेवर येणे वेळेवर हजेरी लावणे बंधनकारक होते परंतु कोरोना काळापासून ह्या मशिनी धुळ खात पडल्याने जुन्या परंपरे प्रमाणे हजेरीपटावर हजेरी लावणे सुरू झाल्याने कर्मचारी हे लग्गा लावून हजेरी तर लावत नाही ना? यात देखील शंका निर्माण होत आहे. आता जिल्हा अधिकाऱ्यांनी सर्व शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक मशीन तात्काळ सुरू करण्याचे आदेशित करावे जेणेकरून दांडी बहाद्दर कर्मचाऱ्यांवर याची वचक बसून कार्यालयीन कामकाज योग्य वेळी पूर्ण होईल.